# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग

**मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठरावाचे इतिवृत्तांत**
**विषय/ठराव क्रमांक-1701 ते विषय/ठराव क्रमांक-1800**

**दि.:-26.11.2024 ते दि.:-03.02.2025**

**प्रस्ताव क्रमांक 1701/2024:-** **( कार्यकारी अभियांता रस्ते विभाग)** **(दि.26.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कैलासनगर स्मशानभुमी समोरील 18.00 मीटर रुंद डी.पी. रस्त्यामध्ये कैलासनगर येथील स्मशानभुमिची संरक्षित भिंत, बर्नींग शेड व स्मशानभुमीचे मुख्य गेट आणि कमान बाधीत होत आहे. त्यामुळे रस्त्याचे पुढील बांधकाम करण्यात अडचणी निर्माण होत आहे. करीता कैलासनगर स्मशानभुमीची संरक्षित भिंत लांबी सुमारे 70.00 मीटर व सरासरी उंची 2.00 मीटर इतकी निष्कासीत करणे तसेच अस्तीत्वातील RCC बींग शेडचे तीन कॉलम बाधीत होत असल्यामुळे संपुर्ण शेड निष्कासीत करणे तसेच स्मशानभुमीचे मुख्य गेट व कमान बाधीत होत असल्यामुळे ते देखील निष्कासीत करणे आवश्यक आहे. त्याशिवाय 18.00 मीटर रुंद डी. पी. रस्त्याचे विकसीत करण्याचे काम करता येऊ शकत नाही.

करीता कैलासनगर येथील 18.00 मीटर डी.पी. रस्ता विकसीत करणेसाठी सदर ठिकाणी असलेल्या कैलासनगर स्मशानभुमीची संरक्षित भिंत, बर्नंग शेड व गेट आणि कमान निष्कासीत (तोडणेसाठीचा) करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1701/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर स्मशानभुमी समोरील 18.00 मीटर डी.पी. रस्त्यामध्ये कैलासनगर येथील स्मशानभुमीची संरक्षित भिंत, बर्नींग शेड व स्मशानभुमीचा मुख्य गेट आणि कमान निष्कासीत (तोडण्यासाठी) करणेसाठी सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1702/2024:-** **( कार्यकारी अभियंता विद्युत विभाग)** **(दि.26.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे गोपाल टी कॉर्नर उस्मानपुरा ते गाडेचौक पीरबाजार येथील नविन रस्त्यांमधील महावितरण कंपनीचे एच.टी./एल.टी. लाईन रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरत असुन त्वरीत स्थलातरीत करणे आवश्यक आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र. जिनिस/जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासाठी र.रु.7 कोटीचा निधी प्राप्त झाला आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत विकसीत होत असणाऱ्या रस्त्यांच्या मध्ये अडथळा निर्माण करणारे पोल व डि.टी.सी.स्थंलातरीत करण्याचे काम महानगरपालिकेतर्फे म.रा.वि.वि. कंपनीस 1.3% देखरेख शुल्क भरुन करण्यात येणार आहे. त्यानुसार गोपाल टी कॉर्नर उस्मानपुरा ते गाडेचौक पीरबाजार येथील कामा बाबत म.रा.वि.वि.कंपनीकडुन 1.3% Supervision Charges अंतर्गत अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

तरी र.रु.35,25,630/- चा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवावयच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1702/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटीअंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे गोपाल टी कॉर्नर उस्मानपुरा ते गाडेचौक पीरबाजार येथील नविन

रस्त्यांमधील महावितरण कंपनीचे एच.टी./एल.टी.लाईन त्वरीत शिफ्ट करण्यासाठी अंदाजपत्रकीय र.रु.35,25,630/- सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1703/2024:-** **(कार्यकारी अभियंता विद्युत विभाग)** **(दि. 26.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील पाळीव प्राण्यांकरीता (मृत) गॅस दाहीनी विकसित करण्यासाठी पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे नव्याने विकसित होत असलेल्या श्वान स्मशानभुमी (गॅस दाहिनी) बाबत पाळीव प्राण्यांच्या मागील तीन वर्षापासून शहरात श्वान दंश किंवा त्यापासुन होणाऱ्या आजाराने एकही मृत्यु झालेला नाही ही बाब अतिशय समाधानकारक आहे. त्याचप्रमाणे शहर रेबिज मुक्त करण्यासाठी नागरीकांच्या सहकार्याने लसीकरण मोहीम देखिल आयोजित करण्यात येते.

अश्या प्रकारे महानगरपालिकेच्या पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र याठिकाणी गॅस दाहीनी उभारण्याच्या कामासाठी र.रु.90,18,705/- अंदाजप त्रक तयार करण्यात आले आहे. या कामासाठी अर्थसंकल्पामध्ये 80.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे. पशुवैद्यकीय विभागाने र.रु.75,13,500/- + 18% GST या रक्कमेस प्रस्तावात मान्यता घेतली आहे. त्यानुसार उर्वरीत 10.18 लक्ष ची रक्कम रु. येत्या वार्षिक सुधारीत अर्थसंकल्प मध्ये समावेश करण्यात येईल.

त्यानुसार छत्रपती संभाजीनगर शहरातील पाळीव प्राण्यांकरीता (मृत) गॅस दाहीनी स्थापित करण्याचे खर्च र.रु.90,18,705/- चा सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1703/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पाळीव प्राण्यांकरीता (मृत) गैस दाहीनी विकसित करण्यासाठी पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे नव्याने विकसित होत असलेल्या श्वान स्मशानभुमी (गॅस दाहीनी) या प्रकल्पासाठी लेखाशिर्ष श्वान स्मशानभुमी विकसित करणे लेखाशिर्षका अंतर्गत राबविण्यात येईल. अंदाजपत्रकीय र.रु.90,18,705/- रुपये सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1704/2024:-** **(विधी विभाग)** **(दि. 26.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सालम बीन सईद चाऊस, कनिष्ठ लिपीक, विधी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्वतःच्या (हृदयाचे आजार व रक्तदाब) यावर उपचार करण्या साठी आयकॉन हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर. येथे दि.01.01.2024 ते दि.04.01.2024 या कालावधीत उपचार केलेला असुन एकुण र.रु.2,04,800/- इतका खर्च केलेला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन हृदयाचे आजार व रक्तदाब या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे. मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | एकुण खर्च | रु 2,04,800/- |
| 2 | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | रु.28,975/- |
| 3 | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | रु.1,75,825/- |
| 4 | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | रु.1,58,242/- |
| 5 | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1 च्या रक्कमेवर | रु.10,240/- |
| 6 | संबंधितास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | रु.1,48,002/- |

वरील तक्ताप्रमाणे संबंधितास निव्वळ देय र. रु.1,48,002/-

संबंधिताने उपचार घेतलेले आयकॉन हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर हे असून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/ मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी दि.16.11.2011 पर्यंत मधील प्रसिध्द

रुग्णालय यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिफारस केलेली आहे.

करीता श्री.सालम बीन सईद चाऊस, कनिष्ठ लिपीक, विधी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,48,002/- एवढी येते. दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधितास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार फक्त) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1704/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सालम बीन सईद चाऊस, कनिष्ठ लिपीक, विधी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्वतःच्या (हृदयाचे आजार व रक्तदाब) या आजारावर केलेला खर्च त्यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार फक्त) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1705/2024:-</u> ( झोन क्र.5, आस्था-2 विभाग)** **(दि.27.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.नारायण सांडु वाघमारे, सफाई मजूर, झोन क्र.५. महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा मुलगा नामे आजीनाथ नारायण वाघमारे याच्या अपघाताच्या आजारावर उपचारासाठी एम्स हॉस्पीटल, दुखाने हॉस्पीटल व सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर या तीन खाजगी रुग्णालयात र.रु.10,46,350/- इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली असून अपघाताच्या आजारावर उपचारार्थ एकुण र.रु.10,46,350/- इतका खर्च केलेला आहे परंतु सदरील रुग्णालय हे महाराष्ट्र शासन यादीत नसल्यामुळे संबंधीतास रु.1,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष मात्र) पर्यंतच परतावा देय आहे. त्या मधुन 5% र.रु.5,000/- मनपा फंडात जमा करुन व अनुज्ञेय रक्कमेतुन वजा करुन उर्वरीत र.रु.95,000/- वैद्यकिय परतावा स्वरुपात अदा करावयाची आहे.

संबंधीताने एम्स हॉस्पीटल, दुखाने हॉस्पीटल व सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर या तीन खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.33/11/राकावि-2, मत्रालय मुंबई 32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ठ-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी मा. वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करिता श्री.नारायण सांडू वाघमारे, सफाई मजूर, झोन क्र.5 महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असेलेल्या रु.95,000/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1705/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.नारायण सांडु वाघमारे, सफाई मजूर, झोन क्र.५ महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा मुलगा नामे आजीनाथ नारायण वाघमारे याच्या अपघाताच्या आजारावर एम्स हॉस्पीटल, दुखाने हॉस्पीटल व सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर या तीन खाजगी रुग्णालयात येथे उपचार घेतलेले आहे. नियमाप्रमाणे एकुण रु.रु.95,000/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1706/2024:-</u> ( यांत्रिकी विभाग)** **(दि.27.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 ची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. या अभियाना अंतर्गत राज्यातील सर्व शहरे कचरा मुक्त करण्याचे मुख्य उदिष्ट असुन, या अंतर्गत शहरातील सर्व प्रकारच्या घनकच-याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन व शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणे समाविष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र स्वमअ-2024/सीएन- 853129 (25) /नवि-34 दि.04.10.2024 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस MRF Center उभारणी करण्यासाठी रु.12,64,26,091/- च्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये सेंट्रल नाका, चिकलठाणा (एमआयडीसी) व कांचनवाडी या 03 ठिकाणी MRF Center ची उभारणी करण्याचे प्रस्तावीत आहे. सदर 03 ठिकाणी MRF Center उभारणी साठी आवश्यक मशिनरींचा पुरवठा करणे, उभारणी करणे (एक वर्ष वॉरंटी सह) हे काम करण्याच्या दृष्टीने (स्थापत्य कामाशिवाय) दरपत्रके मागविण्यात आली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Sr.No. | Name of agency | Amount (01 set) | Amount (03 set) |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Mayo Vessels & Machines Pvt. Ltd. | 1,11,62,800/- | 3,34,88,400/- |
| 2 | M/s ENV 5R | 1,17,05,600/- | 3,51,16,800/- |
| 3 | M/s Shree Balaji Enterprises | 1,17,29,200/- | 3,51,87,600/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे मायो वेसल्स ॲन्ड मशिन्स प्रा.लि. यांचे दर कमी असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्राहय धरण्यात आले आहेत. सदरील दरपत्रकात प्रस्तावित प्रत्येक ठिकाणी खालील प्रमाणे यंत्रणा उभारणी करणे समाविष्ठ आहे

1. Trommel
2. Feeding Conveyor (Through Type)
3. Rejection Oversize Conveyor (Incline Type)
4. Sorting Conveyor (Horizontal Type)
5. Prefabricated RDF Compartment & Ladder
6. Twin Shaft Shredder Machine
7. RDF Briquette Machine
8. Balling Machines
9. Zatak Machine

शहरामध्ये MRF Center उभारणीसाठी (स्थापत्य कामाशिवाय) मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणी करणे (एक वर्ष वॉरंटी सह) या कामाकरीता प्राप्त न्युनतम दरपत्रकानुसार प्रत्येक ठिकाणी रु.1,11,62,800/- प्रमाणे प्रस्तावित 03 ठिकाणी र.रु.3,34,88,400/- खर्च अपेक्षित आहे. अंदाज पत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवुन MRF Center यंत्रणा उभारणी करण्यात येईल.

करीता छत्रपती संभांजीनगर शहरामध्ये, 03 ठिकाणी MRF Center उभारणीसाठी (स्थापत्य कामाशिवाय) मशिनरी पुरवठा करणे, उभारणी करणे (एक वर्ष वॉरंटी सह) या कामाकरीता र.रु.3,34,88,400/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1706/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये 03 ठिकाणी MRF Center उभारणीसाठी (स्थापत्य कामाशिवाय) मशिन खरेदी करणे, पूरवठा करणे (एक वर्ष वॉरंटी सह) या कामाकरीता र.रु.3,34,88,400/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1707/2024:-</u> (उपआयुक्त-6 विभाग) (दि.27.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, AM Ventures Pvt. Ltd. प्लॉट क्र.114, यु.जी.फोअर, गणेश आर्केड, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर, या कंपनीला महानगरपालिकेच्या सर्व आस्थापना वरील स्थायी कर्मचारी, शिक्षक, आरोग्य विभाग, अग्णीशमन विभाग, सर्व कंत्राटी, रेडडी कंपनी, महाराणा एजन्सी, गॅलक्सी एजन्सी, बचतगट व ईतर सर्व महानगरपालिका कर्मचा-यांसाठी हजेरी प्रणाली लागू करण्यासंदर्भात विचारधीन आहे.

या ॲप्लिकेशन मध्ये विकसित केलेली हजेरी मोबाईल व वेब आधारित ॲप्लिकेशन एक अत्याधुनिक प्रणाली आहे. जी फेशियल रिकग्नेशन आणि जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञान वापरुन कर्मचारी उपस्थिती नोंदवते. या प्रणालीद्वारे आपले कार्यालयातील तसेच बाहेरील कार्यरत कर्मचारी दोघांच्याही हजेरीचे व्यवस्थापन करणे सहज सोपे होईल.

सदर कंपनीने जिल्हा परिषद, छत्रपती संभाजी नगर, येथे सुध्दा काम केल्याचा अनुभव आहे, या बाबतचा कार्यादेश संचिकेत जोडण्यात आलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

AM Veatures Pvt.Ltd या कंपनीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात अप्लिकेशन चा खर्च र.रु.730/- + GST 131.40 असे एकुण र.रु.861.40/- प्रती कर्मचारी प्रती वर्ष ईतका असुन मनपा सर्व आस्थापना वरील स्थायी कर्मचारी, शिक्षक, आरोग्य विभाग, अग्णीशमन विभाग, सर्व कंत्राटी, रेड्डी कंपनी, महाराणा एजन्सी, गॅलक्सी एजन्सी, बचतगट व इतर सर्व महानगरपालिका कर्मचारी यांची संख्या जवळपास 5000 इतकी आहे. या अनुषंगाने 5000X861.40=43,07,000/- इतका अंदाने खर्च अपेक्षित आहे.

या ॲपमध्ये App Face Installation, 1 year maintance (After deployment), Server Cost, On the go feature, Face registration and Geo Fencing Cost ईत्यादी सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर कंपनीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार दि.20.09.2024 रोजी दुपारी 01.30 वाजता आयुक्त दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय, मा.मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी श्री.संतोष बाहुळे साहेब, उपआयुक्त 5 तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.रविंद्र जोगदंड साहेब, मा.वैद्यकीय अधिकारी श्री.पारस मंडलेचा साहेब, कंपनीचे मालक व इतर सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीत कंपनीच्या मालक व प्रतीनीधींनी यांच्याकडून सदरील हजेरी ॲप कसे काम करते, या बाबत सविस्तर माहिती घेण्यात आली.

या बाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन उपरोक्त ॲपच्या र.रु.730/- दरांमध्ये आणखीन दर कमी करण्यात येऊन मोबाईल ॲप्लिकेशन हे मनपाला सर्विसेस देत असल्याने GST लागु होत नसल्याचे सुचित करण्यात आले.

या अनुषंगाने र.730/-+GST या दरांमध्ये कंपनीचे मालक यांनी रक्कम रुपये 10/- कमी करण्यात येऊन सदर ॲप र.रु.720/- प्रती कर्मचारी प्रती वर्ष ईतका करण्यात येईल असे कळविले असता, मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यांना मान्यता देण्यात येऊन सदर ॲप तातडीने 01 नोव्हेंबर 2024 पासून सुरु करण्यात यावे, व सदरिल ॲप कर्मचाऱ्यांसाठी अती आवश्यक असल्याने मनपा अधिनियम-1949 चे कलम 67 (3) (c) मध्ये तातडीने करण्यात यावे. तसेच सदर ॲप्लिकेशन साठी देण्यात येणारा खर्च प्रती महिना प्रमाणे देण्यात यावा. असे सुचविण्यात आले.

उपरोक्त करण्यात आलेल्या चर्चेतील वाटाघाटी नुसार AM Ventures Pvt.Ltd या कंपनीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास हजेरी ॲप्लिकेशनचा खर्च र.रु.720/- प्रती कर्मचारी प्रती वर्ष इतका करण्यात येऊन या अनुषंगाने सर्व कर्मचारी यांची अंदाजे संख्या 5000X720= 36,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये छत्तीस लाख मात्र) इतका खर्च अंदाजे अपेक्षित आहे.

सदर खर्च हा महानगरपालिका मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन 2023-24 करीता सुधारीत व सन 2024-25 आर्थिक वर्षाकरीता मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक नुसार पृष्ठ क्र.E-3 अ-3 अन्य

प्रशासकीय खर्च “अनुक्रमांक 06 वरील इतर प्रशासकीय खर्च” ‘सांकेतांक क्र.03222900030’ या लेखाशिर्षा अंतर्गत करणे योग्य.

करीता महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी सदरील ॲप कर्मचाऱ्यांसाठी अती आवश्यक असल्याने AM Ventures Pvt.Ltd या कंपनीला हजेरी ॲप्लिकेशन चा एक वर्षाकरीता अपेक्षित खर्च अंदाजे र.रु.36,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये छत्तीस लाख मात्र) इतका खर्च हा महानगरपालिका मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन 2023-24 करीता सुधारित व 2024-25 आर्थिक वर्षाकरीता मुळ अर्थसंकल्पीय अर्थसंकल्प पृष्ठ क्र.E-3 अ-3 अन्य प्रशासकीय खर्च “अनुक्रमांक 06 वरील इतर प्रशासकीय खर्च” ‘सांकेतांक क्र.03222900030’ या लेखाशिर्षा अंतर्गत मनपा अधिनियम-1949 चे कलम 67(3)(c) मध्ये तातडीने करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1707/2024:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या कामात सुसुत्रता आणण्यासाठी सदरील अप कर्मचाऱ्यांसाठी अती आवश्यक असल्याने AM Ventures Pvt. Ltd या कंपनीला हजेरी ॲप्लिकेशन चा एक वर्षाकरिता अपेक्षित खर्च अंदाजे र.रु.36,00,000/- (छत्तीस लक्ष) इतका खर्च हा महानगरपालिका मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन 2023-2024 करिता सुधारीत व 2024-2025 आर्थिक वर्षा करीता मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक नुसार पृष्ठ क्र.E-3, अ-3 अन्य प्रशासकीय खर्च "अनुक्रमांक 06 वरील ईतर प्रशासकीय खर्च" सांकेतांक क्र.03222900030' या लेखाशिर्षा अंतर्गत मनपा अधिनियम 1949 चे कलम 67(3)(c) मध्ये तातडीने करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1708/2024:-** **(महिला व बाल कल्याण विभाग)** **(दि.27.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास शा.नि.क्र.एम.यु.एम.2011/प्र.क्र. 385/नवि-14 दि.29 मार्च 2022 च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका मध्य एकुण वार्षिक उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसुलातील 5% तरतुदीमधुन महिलांना सक्षम करण्यासाठी विविध योजना/कार्यक्रम इ. कामे राबविण्यास शासनाकडून सुचना प्राप्त आहे.

त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने महिला व मुलींना विविध व्यावसायीक, तांत्रिक आणि कौशल्य विकास बाबत प्रशिक्षण देणे तसेच महिला बचतगटांना स्वयंरोजगार निर्मिती करणे बाबत प्रशिक्षण देणे इ.योजना राबविण्याचा मानस आहे. या प्रशिक्षणाद्वारे मुलींना, महिलांना व महिला बचतगटातील सदस्य महिलांना स्वयंरोजगार व विधि उद्योगाकरीता संधी प्राप्त महिलांचे सक्षमीकरण होण्या मदत होइल.

खादी व ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार KVIC ही केंद्र शासनाच्या MSME Ministry अंतर्गत स्थापना झालेली Statutory Body आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी राबविण्यात येणारे विविध प्रशिक्षण हे खादी व ग्रामोद्योग आयोग, भारत सरकार KVIC कार्यालयामार्फत राबविण्याबाबत प्राचार्य/निर्देशक यांना दि.16.01.2023 चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदर पत्रासोबत प्राप्त झालेल्य प्रशिक्षणाच्या यादीत नमुद 34 प्रशिक्षणांपैकी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत 11 प्रशिक्षणासाठी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर 1 प्रशिक्षणासाठी किमान 40 लाभार्थी असणे आवश्यक आहे. असे संस्थेमार्फत पत्राद्वारे कळविण्यात होते. त्यानुसार दि.15.01.2024 आणि दि.01.02.2024 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन लाभार्थ्यांचे प्रशिक्षणनिहाय अर्ज मागविण्यात आले. सद्यस्थितीत 11 प्रशिक्षणासाठी एकुण 2685 लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार प्रशिक्षण निहाय लाभार्थी संख्या आणि अपेक्षित खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे. खादी व ग्रामोद्योग आयोग भारत सरकार KVIC ही केंद्र शासनाच्या MSME Ministry ही अंतर्गत स्थापन झालेली भारत सरकार Statutory Body आहे.

महाराष्ट्रात पुणे, बोरीवली, डहाणु व नाशिक येथे KVIC अंर्तगत प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. खादी व ग्रामोद्योग आयोग भारत सरकार यांच्या मार्फत खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे प्रशिक्षण देण्यात येणारे आहेत.

| अ क्र | प्रशिक्षणाचे नाव | कालावधी (दिवसात) | प्रशिक्षणाकरीता प्रति लाभार्थी एकुण फिस | एकुण प्राप्त लाभार्थी | एकुण प्रशिक्षण शुल्क | लाभार्थी (10% शुल्क) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ॲडव्हान्स फॅशन टेलरिंग | 30 दिवस | 4750/- | 340 | 16,15,000/- | 161500/- |
| 2. | बेसिक टेलरिंग | 30 दिवस | 4300/- | 249 | 10,70,700/- | 107070/- |
| 3. | बेसिग ब्युटिपार्लर | 30 दिवस | 6300/- | 282 | 1776600/- | 177660/- |
| 4. | ॲडव्हान्स ब्युटिशियन | 30 दिवस | 9300/- | 267 | 2483100/- | 248310/- |
| 5. | ॲडव्हान्स बेकरी कोर्स | 10 दिवस | 5300/- | 247 | 1309100/- | 130910/- |
| 6. | बेसिक कॉम्प्युटर कोर्स विथ टॅली | 30 दिवस | 5300/- | 245 | 1298500/- | 129850/- |
| 7. | मसाला व फुड प्रोसेसिंग | 5 दिवस | 3800/- | 246 | 934800/- | 93480/- |
| 8. | जीएसटी प्रॅक्टिशनर | 7 दिवस | 4300/- | 247 | 1062100/- | 106210/- |
| 9. | कॉप्युटर बेसिक कोर्स/डाटा एन्ट्री ऑपरेटर | 30 दिवस | 5300/- | 295 | 1563500/- | 156350/- |
| 10. | सॉफ्ट टॉय मेकिंग | 10 दिवस | 4300/- | 244 | 1049200/- | 104920/- |
| 11. | दुध प्रोडक्टस | 5 दिवस | 4300/- | 23 | 98900/- | 9890/- |
| | | | | 2685 | 1,42,61,500/- | 14,26,150/- |

उपरोक्त प्रमाणे एकुण 2685 लाभार्थ्यांना संबंधीत 11 प्रशिक्षणे देण्यात येणार आहेत. प्रशिक्षणाचा एकुण खर्च र.रु.1,42,61,500/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बेचाळीस लक्ष एकसष्ठ हजार पाचशे मात्र) इतका अपेक्षित आहे.

करीता महिला व मुलींना विविध प्रशिक्षण हे खादी व ग्रामोद्योग आयोग, भारत सरिकर यांच्या मार्फत देणे तसेच एकुण 11 प्रशिक्षणाकरीता एकुण खर्च र.रु.1,42,61,500/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बेचाळीस लाख एकसष्ठ हजार पाचशे मात्र) बाबतच्या खर्चास मंजुरी मिळणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 1708/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला व मुलींना विविध व्यावसायीक, तांत्रिक आणि कौशल्य विकास बाबत प्रशिक्षण देणे तसेच महिला बचत गटातील महिलांना स्वयंरोजगार निर्मिती करणे बाबत प्रशिक्षण देणे करीता खादी व ग्रामोद्योग आयोग, भारत सरकर KVIC यांच्या संस्थेमार्फत एकुण 11 प्रशिक्षणाकरीता एकुण खर्च र.रु.1,42,61,500/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी बेचाळीस लाख एकसष्ठ हजार पाचशे मात्र) बाबतच्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1709/2024:-</u> (कार्य.अभि.विद्युत विभाग)** **(दि.28.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे देवळाई चौक ते आर. के. वॉशिंग सेंटर रस्त्यांमधील महा वितरण कंपनीचे एच.टी./एल.टी.लाईन शहराच्या वाढत्या विस्तारामुळे त्वरीत स्थलातरीत करण्या साठी यापुर्वी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 1321/2024 दिनांक 09.03.2034 अन्वये मान्यता प्राप्त असुन मे.रिलायबल इलेक्ट्रीकल यांच्यातर्फे काम प्रगतीपथावर आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र.जिनिस/ जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्हयातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासाठी र.रु. 7 कोटीचा निधी प्राप्त झाला आहे. व एकुण 14 रस्त्याच्या या कामासाठी र.रु.7 कोटीची तरतुद उपलब्ध असुन त्यामधुन 22.4 लक्ष रुपयांचे निधी तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2024-25 यातुन 50 लक्ष रक्कम रुपये असे एकुण 72.48 रक्कम रुपयेच्या निधीतुन सदरील काम प्रस्तावित आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 1321/2024 दिनांक 09.03.2024 अन्वये अं.प. रक्कम रुपये 2,19,89,263/- मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त आहे. या समवेत अतिरीक्त साहित्यांच्या 33 केव्ही केबलसाठी भुमिगत केबल टाकणे आवश्यक असल्याने जास्तीच्या (Extra Item) मध्ये त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरील ठिकाणी केबल जुनी असल्यामुळे तसेच Single Run असल्यामुळे या केबलला भरपुर ठिकाणी ज्वॉईंट आहेत. भविष्यात ते धोकादायक असुन जिवित हानी होवु शकते. त्या अनुषंगाने एकत्रित स्वंतत्र 1.7 किमी केबल टाकण्यासाठी महावितरण कंपनीचे अभिप्राय प्राप्त आहे. त्या अनुषंगाने सदर अंदाजपत्रक मंजुरी क्र.CE/AZ/T/Estimate/1.3% DDF Shifting/2024-25/10 Date 20.09.2024 त्यानुसार अतिरीक्त बाब (Extra Itam): र.रु.72,48,241/- चा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1709/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे देवळाई चौक ते आर. के. वॉशिंग सेंटर रस्त्यांमधील महावितरण कंपनीचे 33 केव्ही केबलसाठी भूमिगत केबल टाकणेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24/2024-25 या लेखाशिर्षका अंतर्गत अंदाजपत्रकीय रक्कम अतिरीक्त बाब (Extra Itam): र.रु.72,48,241/- सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1710/2024:-</u> (लेखा विभाग)** **(दि.28.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.अंकुश आत्माराम पांढरे, प्रबंधक, भारतीय खाद्य निगम, औरंगाबाद यांची प्रतिनियुक्तीने उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका या पदावर नेमणूक झालेली आहे. भारत सरकारचे कार्यालयीन आदेश दि.17.06.2010 मधील तरतूदीनुसार श्री.अंकुश आत्माराम पांढरे यांना प्रतिनियुक्तीच्या पूर्वी भारतीय खाद्य निगम येथे कार्यरत असतांना मिळत असलेले वेतन व त्यावर मुळ वेतनाच्या 32% अतिरिक्त भत्ते मिळत होते. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन सरंक्षित करुन त्यांना अदा करण्यासाठी उचित कार्यवाही करावी, असे अवर सचिव, नगर विकास विभाग, नवि-14, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि.17.10.2024 अन्वये कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 45(3) नुसार, कलम 45 (1) खाली नेमलेल्या अधिकाऱ्यास नियमाखाली विहित करण्यात येतील अशा अर्हता आणि त्यास महानगरपालिका, राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निश्चित करील, असे मासिक वेतन व भत्ते मिळतील. तथापि, त्याच्या पदाच्या कालावधीत त्याच्या वेतनात, अहितकारक होईल अशा रितीने फेरबदल करता येणार नाही, अशी तरतूद आहे.

करिता श्री.अंकुश आत्माराम पांढरे, उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या पूर्वी भारतीय खाय निगम येथे कार्यरत असतांना मिळत असलेले वेतन व त्यावर मुळ वेतनाच्या 32% अतिरिक्त भत्ते छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे सेवेत रुजू झालेल्या दिनांका पासून अदा करण्या बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1710/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अंकुश आत्माराम पांढरे, उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या पूर्वी भारतीय खाद्य निगम येथे कार्यरत असतांना मिळत असलेले वेतन व त्यावर मुळ वेतनाच्या 32% अतिरिक्त भत्ते छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे सेवेत रुजू झालेल्या दिनांकापासून अदा करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1711/2024:-</u> (भांडार विभाग)** **(दि.28.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभागासाठी Fire extinguisher साहित्याची निविदा क्र.2024_AMCA_981905_3 नुसार र.रु.7,08,960/- इतक्या रक्कमेची निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार तीन निविदाधारकांना पात्र ठरवण्यात आलेले होते. त्यापैकी मे.अभय ट्रेडर्स हे L1

आलेले होते. त्यानुसार मे.अभय ट्रेडर्स यांची निविदा अंतिम करण्यात आलेली असून त्यांचे दर खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशील (कंपनीच्या नावासह)** | **प्रमाण** | **अंदाजपत्रकीय दर सर्व करांसहित (बाजार भावानुसार)** | **मे. अभय ट्रेडर्स यांचे निविदेतील दर सर्व करांसहित** | **वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करांसहित** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Fire extinguisher Co2-नग 9 Kg | नग | 13400 | 17400 | |
| 2 | Fire extinguisher Co2-नग 4.5 Kg | नग | 7080 | 9200 | निविदेतील प्राप्त कमी दरापेक्षा 7% कमी दर |
| 3 | Fire extinguisher ABC-4 Kg | नग | 3068 | 4050 | |

उपरोक्त स्तंभ 6 मध्ये वाटाघाटी अंती मंजूर झालेल्या दराने माहे मार्च-2024 मध्ये मे. अभय ट्रेडर्स यांना रु. 8,93,730/- चा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. तसेच विविध विभागांच्या मागणीनुसार वरील मंजूर दराने माहे जुलै-2024 मध्ये संबंधित पुरवठाधारकास पुनःश्च रु. 10,62,153/- चा पुरवठा आदेश दिला होता. पुरवठा आदेशातील सर्व साहित्य विविध विभागांच्या मागणीनुसार वितरीत करण्यात आलेले आहे. सदरील खर्च अग्निशमन विभाग ई-01, बी-1 मधील (5) रेस्क्यु साहित्य खरेदी या लेखाशिर्षातून झालेला आहे.

तसेच शिक्षण अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये एकूण 345 Fire Extiguisher ABC-4 KG बसविणे बाबत कळविलेले होते. त्यानुसार विविध शाळा मध्ये Fire Extiguisher ABC-4 KG बसविणेसाठी अग्निशमन विभागाचा तांत्रिक अहवाल घेण्यात आल आहे. त्याअनुषंगाने अग्निशमन विभागाने सर्व शाळांमध्ये Fire Extiguisher ABC-4 KG तसेच शाळेतील संगणक रुमसाठी किमान एका शाळेमध्ये प्रत्येकी 2 Co2 Type Fire Extiguisher Co2-4.5 Kg बसविणे बाबत अहवाल दिलेला आहे.

त्यानुसार शिक्षण विभागाने महानगरपालिकेच्या 50 शाळांमध्ये एकूण 100 नग Co2 Type Fire Extiguisher Co2-4.5 Kg व 50 शाळामध्ये एकूण 345 नग Fire Extiguisher ABC-4 KG बसविणे बाबत कळविलेले आहे. त्यानुसार सदरील दर हे एक वर्षासाठी मंजूर (माहे फेब्रुवारी 2025 पर्यंत) असून निविदेतील अटी शर्तीनुसार सदर मंजूर दराने महानगरपालिकेच्या विविध शाळामध्ये Fire Extiguisher बसविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | साहित्याचे नांव (निकषासह) | खरेदी संख्या | दर सर्व करांसाहित | प्रमाण | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Fire extinguisher Co2-4.5 Kg | 100 | 9200 | नग | 920000 |
| 2 | Fire extinguisher ABC-4 Kg | 345 | 4050 | नग | 1397250 |
| | | | | **एकुण** | **2317250** |
| | | | | **वाटाघाटी अंती 7% कमी** | **-162208** |
| | | | | **एकुण** | **2155042** |

उपरोक्त साहित्य खरेदी रु.21,55,042/- इतका खर्च होणार आहे. सदर खरेदी सन 2024-25 मध्ये क-17 प्राथमिक शिक्षण व सेवा अंतर्गत "साहित्य खरेदी" (52124800002 E-18) या लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यात येत आहे. निविदेतील अटी शर्तीनुसार सदर वर एक वर्षासाठी (माहे फेब्रुवारी 2025 पर्यंत) मंजूर आहेत. त्यानुसार यापूर्वी झालेला खर्च रु.8,93,730/- रु.10,62,153/ व शाळांसाठी होणारा अधिकचा खर्च रु.21,55,042/- असे एकूण रु.41,10,925/- च्या खर्चास व मंजूर दर असलेल्या निविदाधारकांकडून सदर साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1711/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षणविभागाच्या मागणीनुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साहित्य पुरवठा करणेसाठी सन 2024-25 मध्ये क-17 प्राथमिक शिक्षण व सेवा अंतर्गत "साहित्य खरेदी" (52124800002 E-18) या लेखाशिर्षातून प्रस्तावित असून निविदेतील अटी शर्तीनुसार सदर दर एक वर्षासाठी (माहे फेब्रुवारी 2025 पर्यंत) मंजूर असल्याने यापुर्वी झालेला खर्च र.रु.8,93,730/- र.रु.10,62,153/- व शिक्षण विभागाने मागणी केल्यानुसार व अग्निशमन विभागानी दिलेल्या अहवालानुसार महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये Fire extinguisher बसविण्यासाठी होणारा अधिकचा खर्च रु.21,55,042/- असे एकूण रु.41,10,925/- च्या खर्चास व मंजूर दर असलेल्या निविदाधारकांकडून सदर साहित्य खरेदी करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1712/2024:- (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.28.11.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.67 मधील मनपा अर्थसंकल्प सन 2022-23 मधील खालील कामासाठी मा.खासदार, श्री.सय्यद इम्तीयाज जलील यांच्या निधीतुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. करीता सदर कामाचे स्थळ बदल करुन त्याच वाडांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करणेचे काम रहिवाशीयांच्या सुविधेसाठी करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

| **कामाचे पान क्र.व अ.क्र** | **कामाचे नाव** | **स्थळ बदल कामाचे नाव** |
|---|---|---|
| सन 2022-23 मधील Zone-02-New-Work- P No. 12 Sr. No. 40. 10.00 Lakhs. | वार्ड क्र.67 सिल्लेखाना अंतर्गत बडा तकीया मध्ये विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीट करणे बाबत. अं.प.र.रुपये 9,99,971/- | वार्ड क्र.67सिल्लेखाना अंतर्गत छोटा तकीया मस्जीद समोरचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. अं.प.र.रुपये 9,99,971/- |

**ठराव क्रमांक 1712/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.67 मधील मनपा अर्थसंकल्प सन 2022-23 मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवाशीर्याच्या सुविधेसाठी स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| कामाचे पान क्र.व अ.क्र | कामाचे नाव | स्थळ बदल कामाचे नाव |
|---|---|---|
| सन 2022-23 मधील Zone-02-New-Work- P No. 12 Sr. No. 40. 10.00 Lakhs. | वार्ड क्र.67 सिल्लेखाना अंतर्गत बडा तकीया मध्ये विविध ठिकाणी सिमेंट काँक्रीट करणे बाबत. अं.प.र.रुपये 9,99,971/- | वार्ड क्र.67सिल्लेखाना अंतर्गत छोटा तकीया मस्जीद समोरचा रस्ता सिमेंट काँक्रीट करणे. अं.प.र.रुपये 9,99,971/- |

**प्रस्ताव क्रमांक 1713/2024:- (कार्य.अभि.पापु विभाग)** **(दि.02.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विषयांकीत प्रकरणी छत्रपती संभाजीनगर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत प्रगतीपथावर आहे. संबंधितांमार्फत 2500 मीमी व्यासाची पोलादी जलवाहीनी टाकण्याचे काम प्रगती पथावर असून ढोरकीन येथे जलवाहीनी 2 मालमत्ताधारकांच्या हद्दीमध्ये येत असून त्यांच्या मालमत्तेचे जलवाहीनीच्या कामात नुकसान होत आहे. यातील जमीन मालक श्री.रविंद्र मुळे यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.को. 739 वरील अस्तित्वातील घराचे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे ढोरकीन येथील दुसरे मालमत्ताधारक श्री.इब्राहिम गफूरभाई शेख यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.1739 वरील बांधकामाचे नुकसान होत आहे. उपरोक्त मालमत्तेमध्ये 2500 मीमी व्यासाची जलवाहीनी संबंधितांच्या मालमत्तेमध्ये टाकणे शिवाय इतर पर्याय उपलब्ध नसल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने निदर्शनास आणून दिले आहे. तसेच उपरोक्त दोन्ही मालमत्ता धारकांनी नुकसान भरपाई मिळाल्या शिवाय पुढील काम करण्यासाठी सहमती दिली नाही, त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला या ठिकाणी काम करता आले नाही.

दि.10.08.2024 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली स्मार्ट सिटी कार्यालय येथे विषयांकीत प्रकरणी बैठक आयोजीत करण्यात आली होती.

या बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अभियंते, सरपंच व ग्रामविकास अधिकारी ढोरकीन तसेच बाधीत होणाऱ्या मालमत्तेच्या मालकांची उपस्थिती होती.

बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी प्रकरणा संदर्भाने पुढील प्रमाणे माहिती सादर केली. शहर पाणी पुरवठा प्रकल्पाच्या 2500 मीमी व्यासाच्या एम.एस.पाईप लाईनचे काम ढोरकीन येथे सुरु आहे, पाईप लाईनचे काम करण्यासाठी जमीन मालक श्री.रविंद्र मुळे यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.ढो.139 वरील अस्तित्वातील घराचे नुकसान होणार आहे, त्याचप्रमाणे ढोरकीन येथील दुसरे मालमत्ताधारक श्री.इब्राहिम गफूरभाई शेख यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.739 वरील बांधकामाचे नुकसान होत आहे, उपरोक्त मालमत्तेमध्ये 2500 मीमी व्यासाची जलवाहीनी संबंधितांच्या मालमत्तेमध्ये टाकणे शिवाय इतर पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे दोन्ही मालमत्ताधारकांनी नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय पुढील काम करण्यासाठी सहमती दिली नाही, त्यामुळे काम करता आले नाही. संबंधित ग्रामविकास अधिकारी यांनी वर नमुद दोन्ही मालमत्ता कायदेशिर असल्याचे मत दिले. त्यावर सदर दोन्ही मालमत्तांच्या बाधीत क्षेत्राचे मुल्यांकन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेवून प्रस्ताव सादर करता येईल असे कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांनी चर्चेत नमुद केले.

अनुषंगाने प्रकरणात इतर कुठलाही पर्याय उपलब्ध नसल्यामुळे ढोरकीन येथे टाकावयाच्या 2500 मीमी व्यासाच्या जलवाहीनीमुळे या दोन्ही मालमत्ता धारकांच्या बाधीत होणाऱ्या मालमत्तांची नुकसान भरपाई देण्यासाठी दोन्ही संबंधितांना त्यांच्या बाधीत होणाऱ्या मालमत्तापोटी नविन आर.सी.सी. बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चा एवढी रक्कम महानगरपालिके मार्फत देण्यासंदर्भाने दोन्ही बाधीत मालधारकांनी बैठकीमध्ये मागणी केली.

त्यानंतर विषयांकीत प्रकरणी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून खालीलप्रमाणे मुल्यांकन करुन घेतलेले आहे.

| अ. क्र | घरमालकाचे नाव व पत्ता | मिळकतीची माहिती | मुल्यांकनाप्रमाणे वाचित घराची किंमत रु. | नविन बांधकाम करण्यासाठीची किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रविंद्र साहेबराव मूळे, रा.ढोरकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | ग्रा.प.मिळकत क्र.ढो.139 क्षेत्र 119.4. चौ.मी. पैकी 77.40 चो.मी.बाधीत बांधकाम मौजे ढोरकीन, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | 8,39,685.00 | 22,60,080.00 |
| 2 | श्री.इब्राहिम गफूरभाई शेख, रा. ढोरकीन, ता पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | ग्रा.प. मिळकत क्र.ढो.739 क्षेत्र 46.2 चौ.मी. पैकी 28.61 चौ.मी. बाधीत बांधकाम मौजे ढोरकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर | 2,94,762.00 | 7,52,443.00 |

दि.02.09.2024 रोजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी प्रकरणाबाबत संबंधित मालमत्ता धारकांना मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती समोर त्यांचे म्हणने मांडण्या साठी तसेच समितीने याबाबत योग्य निर्णय घेण्याचे आदेशित केले. याबाबत दि.18.09.2024 रोजी संपन्न झालेल्या समितीच्या बैठकीत मालमत्ता बाधीत झालेल्या व्यक्तिचे म्हणने ऐकून घेतल्यानंतर समिती अध्यक्ष यांनी दोन्ही मालमत्ता धारकांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार बाधीत घराच्या किंमतीपोटी नुकसान भरपाई देण्याबाबत आदेशित केले. तसेच संबंधितांनी याबाबत लेखी स्वरुपात सहमती सादर करण्याचे निर्देश दिले. अनुषंगाने संबंधितांनी लेखी सहमती सादर केली आहे.

प्रकरणात मा.विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील गठीत समितीच्या आदेशानुसार तसेच या पुर्वी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या मुल्यांकनानुसार तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रानुसार 1) श्री.रविंद्र साहेबराव मुळे, रा.ढोरकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना र.रु.8,39,685/- तसेच 2) श्री.इब्राहिम गफूरभाई शेख, रा.ढोरकीन, ता

पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना र.रु.2,94,762/- इतकी रक्कम महानगरपालिके मार्फत अदा करण्याबातत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1713/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजनेचे काम लक्षात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेतलेल्या मुल्यांकनानुसार 1) श्री.रविंद्र साहेबराव मुळे,रा.ढोरकीन,ता.पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर यांना र.रु.8,39,685/- तसेच 2) श्री.इब्राहिम गफूरभाई शेख, रा.ढोरकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना र.रु.2,94,762/- इतकी रक्कम बाधीत होणाऱ्या मालमत्तापोटी महानगरपालिके मार्फत अदा करण्याबाबत प्रस्तावास मान्यता देण्यात येते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1714/2024:-** **(कर निर्धारक व संकलक विभाग)** **(दि.02.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या टप्पा क्र.03 इमारतीत मालमत्ता कर व पाणीपट्टी संकलनासाठी नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले आहे. सदर कक्षात Video Wall Creation and Other यंत्रणा पुरवठा करणे, कार्यान्वीत करणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता निविदा क्र.2024_AMCA_1081998_1 नुसार र.रु.23,99,859/- इतक्या रक्कमेची निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार तीन निविदाधारकांना पात्र ठरविण्यात आले होते. त्यानुसार M/s Sunrise Computers and Multy Services यांची निविदा अंतिम करण्यात आलेली असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

| Sr. no. | Particulars | Qts | Sunrise Computer and Multi Services | |
|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount |
| 1. | Video Wall 55" screen 4K Resolution LCD Diegital Display Vibrant VIVID and Versatile Monitoring Display Beze Gap 3.5 mm Brightness 500cd/m2Dimension 1211.4*682.2*118mm Resolution 1920*1080VGA*1,HDMI*1, DVI1 Video (BNC)*1 Matrix from 1x2 up to 20x20 Setup Multiple Output like Laptop, Mobile, Projector etc. | 9 | 115000 | 1035000 |
| 2. | 2 Wall Mount Fix Bra | 9 | 18000 | 162000 |
| 3. | Video Wall Controller Complete and Centric Controller Control Decives with intrgrated Software Smart Switching and Converting Screen to Multiple 4K Matrix | 1 | 190000 | 190000 |
| 4. | 4K HDMI | 9 | 3500 | 31500 |
| 5. | High Quality Cat-6 Patch Cord For Integration Device | 9 | 1500 | 13500 |
| 6. | Interactive Display Managaement software Centrally Management IFPD's Remotely IDM's Magangement Remotely Control your IFPD Devices at Various Location Share up to 16x9 sc | 1 | 125000 | 125000 |
| 7. | One Time Service and Installation | 1 | 75000 | 75000 |
| 8. | Warranty and Service extend for 2 year Video Wall Controller Devices Software Accessories | 1 | 215000 | 215000 |
| 9. | AIO Interactive Flat Panel Display 65" T29866-a TRUEBOARD 65" aio ifpd SITP V1<br>➢ 65" INCH 4k ifpd-<br>➢ Android 11 (upgradable to Android 13)<br>➢ 8GB RAM/128 GB Memory<br>➢ 20 Touch Point/450 nits/commercial Panel 24x7 / Zero Bonding/with iDMS<br>➢ (3 years License)/wth 3 years<br>➢ Onsite Warranty*/Advance Android Own Market Place<br>➢ Option /with Wall Mount Stand | 1 | 125000 | 125000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | OPS 11th Gen T29990-A<br>➢ OPS-Core i5/11th Gen>8GB RAM<br>➢ 256 GB SSD HDD+Option to connect additional SATA HDD/with License Trueboard Software | 1 | 55000 | 55000 |
| 11. | Floor IFPD Mount Movable Bracket for 65 inch T23601-AMaterial :<br>Color : Black<br>Suit for : 40-86" Monitor | 1 | 6779 | 6779 |
| | | | **Total** | **2033779** |
| | | | **18% GST** | **366080** |
| | | | **Total** | **23,99,859** |

उपरोक्त मंजुर झालेल्या दराने माहे दि.25.09.2024 रोजी M/s Sunrise Computers and Multy Services यांना कार्यदिश देण्यात आले होते. या सर्व कामासाठी अंदाजित खर्च हा 24.00 लक्ष होता. तथापि, कर संकलन विभागाच्या मागणीनुसार कक्षात ऐनवेळी नवीन साहित्याची मागणी करण्यात आली, हे साहित्यकिंवा साहित्यच्या संख्येत वाढ ही निविदा व्यतिरिक्त होती, त्यास अतिरिक्त खर्च र.रु.644280/- इतका झालेला आहे. साहित्य तपशिल खालील प्रमाणे आहे

| **Sr. no.** | **Particulars** | **Qts** | **Sunrise Computer and Multi Services** | |
|---|---|---|---|---|
| | | | **Rate** | **Amount** |
| 1. | Video Wall 55" screen 4K Resolution LCD Diegital Display Vibrant VIVID and Versatile Monitoring Display Beze Gap 3.5 mm Brightness 500cd/m2Dimension 1211.4*682.2*118mm Resolution 1920*1080 VGA*1,HDMI*1, DVI1 Video (BNC)*1 Matrix from 1x2 up to 20x20 Setup Multiple Output like Laptop, Mobile, Projector etc. | 3 | 115000 | 345000 |
| 2. | 2 Wall Mount Fix Bra | 3 | 18000 | 54000 |
| 3. | 4K HDMI Cable Hevy Duty | 12 | 3500 | 42000 |
| 4. | High Quality Cat-6 Patch Cord For Integration Device | 12 | 1500 | 18000 |
| 5. | Interactive Display Managaement software Centrally Management IFPD's Remotely IDM's Magangement Remotely Control your IFPD Devices at Various Location Share up to 16x9 sc | 1 | 75000 | 75000 |
| 6. | Vga Cable | 10 | 1200 | 12000 |
| | | | **Total** | **546000** |
| | | | **18% GST** | **98280** |
| | | | **Total** | **644280** |

उपरोक्त कामासाठी सन 2024-25 च्या अर्थसंकल्पात लेखाशिर्ष नवीन्यपुर्ण विविध प्रकल्प संगणक कक्षाची आवश्यक दुरुस्ती व श्रेणीवाढ तरतुद र.रु.2.00 कोटी मधुन प्रस्तावित आहे. मंजुर दरा नुसार मुळ खर्च र.रु.23,99,859/- व अधिकचा खर्च र.रु.6,44,280/- असे एकुण र.रु.30,44,139/- खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1714/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागाच्या मागणीनुसार कक्षात Video Wall Creation and Other यंत्रणा पुरवठा करणे, कार्यान्वीत करणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता सन 2024-25 च्या अर्थसंकल्पात लेखाशिर्ष नाविन्यपुर्ण विविध प्रकल्प संगणक कक्षाची आवश्यक दुरुस्ती व श्रेणीवाढ तरतुद र.रु.2.00 कोटी या लेखाशिर्षातुन प्रस्तावित असुन निविदेतील अटी शर्तीनुसार मंजुर दरानुसार मुळ खर्च र.रु.23,99,859/-व अधिकचा खर्च र.रु.6,44,280/- असे एकुण र.रु.30,44,139/- खर्चास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1715/2024:-</u>** **(कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.02.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.17, विशालनगर सम्यक क्रांती समाज मंदिर ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, वॉचमन रुम बांधणे व इतर कामे करणे या कामाचे

अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.34,96,154/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 मधील मंजुर रेखांकनात मुलभुत सुविधा पुरविणे-रस्ते Other Capital Works Page No.03 Sr.No.03 (1) तरतुद र.रु.18 कोटी 70 लक्षमधुन करण्यात येईल तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.34,96,154/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1715/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.17, विशालनगर सम्यक क्रांती समाज मंदिर ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, वॉचमन रुम बांधणे व इतर कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.34,96,154/- अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1716/2024:-</u> ( बाजार परवाना विभाग)** **(दि.05.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील रस्त्यावर बसुन चामड्याच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्त करणाऱ्या गटाई (चांभार) कामगारांना बैठे पिच परवाना देण्या बाबतचे अधिकार शासन निर्णयान्वये महानगरपालिकेस आहेत.

दि.11.09.2018 रोजी झालेल्या मा.सर्वसारधारण सभेत महानगरपालिका कार्यक्षत्रामध्ये रस्त्या लगत बसुन चामड्याच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्त करणाऱ्या गटाई (चांभार) कामगारांना बैठे परवाना पिच देणेसाठी निर्णय देण्यात आला व शासन निर्णयाच्या अधिन राहुन वार्षिक र.रु.99/- शुल्क आकारुन बैठे परवाना देण्यास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. उक्त अनुषंगाने मागील काही वर्षात नवीन पिच परवाना व नुतनीकरण करणेसाठी वार्षिक बैठे पिच परवाना शुल्क र.रु.99/- त्यावर 18 टक्के जीएसटी असे एकुण र.रु.117/- आकारण्यात यावी.

मागील 8 वर्षापासून बैठे पिच परवाना दरात वाढ झालेली नाही नियमानुसार दर 3 वर्षांनी दरात नैसर्गिक 10 टक्के वाढ होणे गरजेचे आहे. ती नैसर्गिक 10 टक्के वाढ करुन म्हणजे र.रु.99/- त्यात नैसर्गिक वाढ 10 टक्के वाढ र.रु.10/- असे एकुण र.रु.109/- व त्यावर 18 टक्के जीएसटी रु.20/- असे एकुण रु.130/- आकारण्यास मंजुरी देण्यात यावी.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1716/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील रस्त्यावर बसुन चामड्याच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्त करणाऱ्या गटाई (चांभार) कामगारांना बैठे पिच परवाना देण्या बाबतचे अधिकार शासान निर्णयान्वये महानगरपालिकेस आहेत.

मागील 8 वर्षापासून बैठे पिच परवाना दरात वाढ झालेली नाही नियमानुसार दर 3 वर्षांनी दरात नैसर्गिक 10 टक्के वाढ होणे गरजेचे आहे. ती नैसर्गिक 10 टक्के वाढ करुन म्हणजे र.रु.99/- त्यात नैसर्गिक वाढ 10 टक्के वाढ र.रु.10/- असे एकुण र.रु.109/- व त्यावर 18 टक्के जीएसटी रु.20/- असे एकुण रु.130/- आकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1717/2024:-</u> (आरोग्य विभाग)** **(दि.11.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी नियमित लसीकरण सत्राकरीता लसीकरणा पश्चात Syp.Paracetamol च्या वापरा बाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेले आहेत. त्यानुषंगाने मनपा आरोग्य विभागाअंतर्गत लसीकरण कार्यक्रम अधिकारी यांनी 0 ते 2 वर्ष वयोगटातील लाभार्थींची संख्या नुसार नियमित लसीकरण सत्राकरीता Syp.Paracetamol (125 mg/5ml/60 ml Bottle) च्या एकुण 1,46,678 Bottle उपलब्ध करुन देणे बाबत पत्राद्वारे मागणी केलेली आहे.

Ministry Of Health & Family Walfare Government Of India Guidelines On Use Of Syrp.Paracetamol Following Vaccinations च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे नियमित लसीकरण सत्राकरीता लसीकरणा पश्चात Syp.Paracetamol (125 mg/5ml/60 ml

Bottle) खरेदी करण्यासाठी, शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.01.12.2016 (शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्य पध्दतीची सुधारित नियम पुस्तिका) च्या विहीत निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत व्यवसाय संस्था हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ, मर्या.मुंबई व हाफकिन अजिंटा फार्मास्युिटीकल लि.जळगाव या संस्थेत उत्पादित होणारी औषधी, निविदा प्रक्रिया न राबविता थेट खरेदी करता येऊ शकतात. प्रस्तावित औषधी हाफकिन महामंडळाकडून थेट खरेदी करण्याकरीता हाफकिन महामंडळाचे आर्थिक वर्ष सन 2024-25 च्या दरानुसार खालील प्रमाणे अपेक्षित खर्च राहील.

| अ. क्र. | औषधींची नावे | खरेदी करावयाची संख्या | हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ यांचे वर्ष सन 2024-25 चे दर | खर्चाची अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | Syp.Paracetamol 60 ml Bottle | 1,46,678 Bottle | र.रु.22.22 प्रति बॉटल | र.रु.32,59,185/- |
| **एकुण रक्कम रुपये बत्तीस लक्ष एकोणसाठ हजार एकशे पंच्याऐंशी फक्त** | | | | |

**सदरील खरेदीसाठी**
**लेखाशिर्ष क-3 सार्वजनिक दवाखाने अ.क्र.2औषधी खरेदी/साहित्य खरेदी**
**सांकेतांक क्र.62125320002 तरतुद र.रु.4 कोटी या मधुन प्रस्तावित करण्यात येत आहे.**

उपरोक्त प्रस्तावित नुसार र.रु.32,59,185/- (रक्कम रुपये बत्तीस लक्ष एकोणसाठ हजार एकशे पंच्याऐंशी फक्त) करीता हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ, मर्या.मुंबई यांच्याकडून नियमित लसीकरण सत्रासाठी थेट औषधी खरेदीसाठी खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1717/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, र.रु.32,59,185/- (रक्कम रुपये बत्तीस लक्ष एकोणसाठ हजार एकशे पंच्याऐंशी फक्त) करीता हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ, मर्या.मुंबई यांच्याकडून नियमित लसीकरण सत्रासाठी थेट औषधी खरेदीसाठी खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1718/2024:-</u> (पीएमएवाय विभाग)** **(दि.11.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "सर्वांसाठी घरे-2022" या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रा तील वास्तव्यास असलेले अर्जदार ज्यांना स्वत:चे घर नाही व ज्यांचे र.रु.03 लक्ष वा त्याहून कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्यार अर्जदारांकरीता 30 चौ.मी.चटई क्षेत्राचे पक्के घरकुल बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून एकुण र.रु.2.50 लक्ष एवढे अनुदान मिळणार आहे.

मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.736 दि.10.03.2023 नुसार मौजे पडेगाव, तिसगाव, सुंदरवाडी व ठराव क्र.839 दि.28.06.2023 नुसार मौजे हर्सुल येथील शासकीय जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत शासन निर्णय क्र.प्रआयो/2017/प्र.क्र.12/गृनिधो-2 /शिकाना दि.11 जानेवारी 2018 मधील तरतुदीनुसार सर्वाजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर खाजगी विकासकाची नेमणुक करणे करीता निविदा मागविण्याचा ठराव पारित आहे.

"प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3" अंतर्गत गृहप्रकल्प राबविण्यासाठी मौजे पडेगाव येथील गट क्र.69 मधील 3.16 हे.आर.जमिन दि.08.02.2022 रोजी व मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 मधील अनुक्रमे 4.46 हे.आर. व 11.32 हे.आर.जमीन दि.07.03.2022 रोजी तसेच मौजे तिसगाव गट क्र.225/1 मधील 15.05 हे.आर.जमिन दि.08.02.2022 रोजी मौजे तिसगाव गट क्र.227/1 मधील 86.25 हे.आर.जमिन दि.02.03.2022 रोजी व हर्सुल गट क्र.216 मधील 1.02 हे.आर.दि.08.02.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी यांनी प्रदान केली आहे. तसेच उक्त जागेवर गृहप्रकल्प उभारणी करीता

सविस्तर प्रकल्प अहवालास SLSMC (राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती) तसेच CSMC (केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती) ची मंजुरी प्राप्त आहे.

त्याप्रमाणे घटक क्र.3 अंतर्गत परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी मौजे पडेगाव गट क्र.69, मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 मौजे तिसगाव येथील गट क्र.225/1 व 227/1 तसेच मौजे हर्सुल येथील गट क्र.216 येथील जागेवर प्रस्तावित असलेल्या गृह प्रकल्पांकरीता पारदर्शक पध्दतीने सोडत (Lottery System) राबवुन पात्र लाभार्थ्यांची निवड करुन पुढील आवश्यक अनुषंगीक कार्यवाही करण्याकरीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करण्यासाठी ठराव क्र.1659 दि.11.10.2024 नुसार निविदा मागविण्याच्या ठरावास मंजुरी प्राप्त आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या मार्गदर्शक तत्वात (सप्टें-2024) सदनिकांचे वाटप करतांना शासन निर्णयात घटकानुसार टक्केवारी नमुद नाही. मार्गदर्शक तत्वात विधवा महिला, एकल महिला, दिव्यांग, तृतियपंथी, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, रस्त्यावरील विक्रेता, बांधकाम कामगार, कुशल कारागिर, अल्पसंख्यांक, वयोवृध्द नागरीक यांना सदनिका वाटप करतांना प्राधान्य देणेबाबत नमुद आहे.

म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार परवडणाऱ्या गृहप्रकल्पांत महाराष्ट्र राज्यातील लोकसभा, विधानसभा, विधान परिषदेचे प्रतिनिधीत्व करणारे विद्यमान व माजी सदस्य, सेवानिवृत्त केंद्र शासनाचे कर्मचारी, शासकीय निवासस्थानात राहणारे कर्मवारी, राज्य शासनाच्या संविधानिक मंडळ, महामंडळे इ.चे कर्मचारी व अगोदर निवृत्त झालेले कर्मचारी, शासन स्वेच्छा निवृत्ती कर्मचारी असे विविध घटकांचे आरक्षण नमुद केलेले आहे. तथापि, PMAY अंतर्गत प्रामुख्याने र.रु.3.00 लक्ष पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या घटकांना लाभ देण्यात येतो. त्यामुळे म्हाडाचे आरक्षणाबाबतचे प्रचलित धोरण लागु करणे संयुक्तिक नाही. महाराष्ट्र राज्य प्रशासकीय सेवा नियम क्र.8 2004 नुसार शासकीय कर्मचाऱ्यांची सर्वसाधारण भरती करते वेळी लागु असलेले आरक्षण धोरण तपासले असता, त्यामध्ये अनुसुचित जाती करीता 13%, अनुसुचित जमाती साठी 7%, विमुक्त जमाती (A) 3%, भटक्या जमाती (B) 2.5%, भटक्या जमाती (C) 3.05%, भटक्या जमाती (D) 2%, विशेष मागास प्रवर्ग 2%, इतर मागास प्रवर्गा करीता 19%, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी 10% व सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता 10% या प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या भरती करीता आरक्षण लागु आहे.

परंतु प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थी र.रु.3 लक्ष पेक्षा कमी उत्पन्न गटा करीता असल्याने सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता 10% आरक्षण ठेवणे उचित राहणार नाही. या आरक्षणा ऐवजी महापालिकेद्वारे होणारे विकास कामा दरम्यान विस्थापित होणाऱ्या (निवासी बांधकाम) नागरीकांना आरक्षण देणेस प्रस्तावित करण्यात येते. याशिवाय प्रचलित आरक्षण धोरणातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (EWS) हा संवर्ग सुध्दा आर्थिक निकषांप्रमाणे असल्याने त्या प्रवर्गासाठी आरक्षण वेगळ्या पध्दतीने ठेवणे उचित राहणार नाही. करीता, उपरोक्त नुसार खालील प्रमाणे आरक्षणे व प्राधान्य क्रम प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | अनुसुचित जाती | 13% |
| 2. | अनुसुचित जमाती | 7% |
| 3. | विमुक्त जमाती (A) | 3% |
| 4. | भटक्या जमाती (B) | 2.5% |
| 5. | भटक्या जमाती (C) | 3.5% |
| 6. | भटक्या जमाती (D) | 2% |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग | 2% |
| 8. | इतर मागास प्रवर्ग | 19% |
| 9. | मनपा विकास कामा दरम्यान बाधीत | 5% |
| 10. | खुला वर्ग | 43% |

उपरोक्त प्रमाणे विविध घटक/प्रवर्गासाठी आरक्षणाची टक्केवारी प्रस्तावित करण्यात येत असुन, ज्या प्रवर्गाचे लाभार्थी उपलब्ध होणार नाहीत, त्या प्रवर्गासाठी आरक्षित केलेली घरकुले इतर प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देणे प्रस्तावित करण्यात येते. म्हणजेच आरक्षणाची घरकुले आंतर परिवर्तणीय असतील.

वरील प्रमाणे प्रस्तावित विविध संवर्गातील आरक्षणात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मार्गदर्शक तत्वे (सप्टेंबर 2024) नुसार नमुद सामाजिक असुरक्षित घटकांकरिता खालील प्रमाणे प्राधान्य देणेकरिता प्रस्तावित करण्यात येते.

| प्राधन्य क्रम | सामाजिक असुरक्षित घटक |
|---|---|
| 1. | प्रकल्प ग्रस्त |
| 2. | विधवा महिला |
| 3. | एकल महिला |
| 4. | दिव्यांग |
| 5. | तृतियपंथी |
| 6. | सफाई कामगार |
| 7. | अंगणवाडी सेविका |
| 8. | रस्त्यावरिल विक्रेता |
| 9. | बांधकाम कामगार |
| 10. | कुशल कारागिर |
| 11. | अल्पसंख्याक |
| 12. | वयोवृध्द नागरिक |

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित आरक्षणास मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1718/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.3 अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या परवडणाऱ्या गृहप्रकल्पाकरिता खालील प्रमाणे आरक्षणे व प्राधान्य क्रम.नमुद करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | अनुसुचित जाती | 13% |
| 2. | अनुसुचित जमाती | 7% |
| 3. | विमुक्त जमाती (A) | 3% |
| 4. | भटक्या जमाती (B) | 2.5% |
| 5. | भटक्या जमाती (C) | 3.5% |
| 6. | भटक्या जमाती (D) | 2% |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग | 2% |
| 8. | इतर मागास प्रवर्ग | 19% |
| 9. | मनपा विकास कामा दरम्यान बाधीत | 5% |
| 10. | खुला वर्ग | 43% |

**(B) सामाजिक असुरक्षित घटक प्राधान्य क्रम.**

| प्राधन्य क्रम | सामाजिक असुरक्षित घटक |
|---|---|
| 1. | प्रकल्प ग्रस्त |
| 2. | विधवा महिला |
| 3. | एकल महिला |

| | |
|---|---|
| 4. | दिव्यांग |
| 5. | तृतियपंथी |
| 6. | सफाई कामगार |
| 7. | अंगणवाडी सेविका |
| 8. | रस्त्यावरिल विक्रेता |
| 9. | बांधकाम कामगार |
| 10. | कुशल कारागिर |
| 11. | अल्पसंख्याक |
| 12. | वयोवृध्द नागरिक |

ज्या प्रवर्गाचे लाभार्थी उपलब्ध होणार नाही, त्या प्रवर्गासाठी आरक्षीत केलेली घरकुले इतर प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. म्हणजेच आक्षणाची घरकुले आंतर परिवर्तणीय असतील. तरी प्रस्तावित आरक्षण व सामाजिक असुरक्षित घटकांच्या प्राधान्य क्रम यांस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1719/2024:-</u> ( आस्थापना-2 विभाग)** **(दि.11.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.उदय दिगंबरराव मानवतकर, अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या आईच्या नामे श्रीमती सुरेखा दिगंबरराव मानवतकर (Bypass Surgery) यावर उपचार करण्यासाठी मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे दि. 21.01.2024 ते 05.02.2024 या कालावधीत उपचार केलेला असुन एकूण रक्कम रु.4,67,530/- इतका खर्च केलेला आहे. अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (Bypass Surgery) या आजारावर उपचारार्थ खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रकमेचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | एकूण खर्च | रु.4,67,530/- |
| 2 | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | रु.1,35,043/- |
| 3 | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | रु.3,32,487/- |
| 4 | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | रु.2,99,238/- |
| 5 | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1 च्या रकमेवर) | रु.23,376/- |
| 6 | संबंधितास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | रु.2,75,862/- |

वरील तक्ताप्रमाणे संबंधितास निव्वळ देय रक्कम रु.2,75,862/-

संबंधिताने उपचार घेतलेले मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर हे असून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची दि.16.11.2011 पर्यतच्या अद्ययावत प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिका-यांना शिफारस केलेली आहे.

करिता श्री.उदय दिगंबरराव मानवतकर, अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या आईच्या नामे श्रीमती सुरेखा दिगंबरराव मानवतकर (Bypass Surgery) यावर उपचार करण्यासाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.2,75,862/- एवढी आहे. परंतु दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अधिकारात रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधितास रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा

फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार मात्र) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1719/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.उदय दिगंबरराव मानवतकर, अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या आईच्या नामे श्रीमती सुरेखा दिगंबरराव मानवतकर (Bypass Surgery) या आजारावर केलेल्या खर्च त्यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार मात्र) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1720/2024:-** **( कार्यकारी अभियांता पा.पु विभाग)** **(दि.11.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर 100 दलली योजनेवरील नवीन जायकवाडी पंपगृह येथे 490 अ.श. क्षमतेचे ऑईल लुब्रीकेटेड Jyoti Make कंपणीचे एकूण 6 व्ही.टी पंप आहेत. सदरील पंप हे 1991 म्हणजे 33 वर्षापासून कार्यरत आहेत. सदरील देखभाल व दुरुस्ती करीता वारंवार (Consumable) लागणारे सुटे भाग स्थानिक बाजारात सहज उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदरील पंपाच्या स्पेअर पार्टची एकत्रित खरेदी करुन खात्याच्या भांडारात ठेवण्यात येतात. जेणे करुन आवश्यकतेनुसार या सुट्या भागाचा वापर करुन तातडीने पंपाची दुरुस्ती करणे सोयीचे होते. पंपासाठी आवश्यक सुटे भाग यापुर्वी मार्च 2023 मध्ये खरेदी करण्यात आले होते. नवीन जायकवाडी येथील पंप 24 तास कार्यरत असल्याने येथील पंपाचे घर्षण होऊन स्पेअर पार्टस् खराब होतात. यामुळे दुरूस्तीसाठी लागणारे स्पेअर पार्टस् तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी काम सुरु करण्यात आलेले आहे. सदरील योजना पूर्ण होऊन कार्यान्वीत होण्यासाठी सर्वसाधारणपणे 1 ते 2 वर्षाचा कालावधी लागू शकतो असे इकडील मत आहे. तो पर्यन्त शहराचा पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता सद्यस्थितीतील 100 दलली योजना सुस्थितीत कार्यान्वीत ठेवणे गरजेचे आहे. सध्या भांडारामध्ये वारंवार (Consumable) लागणारे सुटे भाग अल्प प्रमाणात शिल्लक असुन काही पार्टस् उपलब्ध नसल्याने पाणी पुरवठा करण्यास व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सदर पंपाच्या स्पेअर पार्टची खरेदी करुन खात्याच्या भांडारात ठेवल्यास भविष्यातील अनुषंगीक पंपाच्या दुरुस्ती करण्यासाठी सोईचे होईल.

वरील प्रमाणे नवीन जायकवाडी येथील 490 अ.श.व्ही.टी.पंपाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.32,82,613/- चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. मान्यता मिळाल्यास ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागवुन सदरील Jyoti Make पंपाच्या स्पेअर पार्टस्ची खरेदी करण्यात येईल. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1720/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवीन जायकवाडी येथील 490 अ.श.व्ही.टी.पंपाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् खरेदी करण्यासाठी र.रु.32,82,612/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. प्रस्तावित साहीत्य खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1721/2024:-** **(कर निर्धारक संकलक विभाग)** **(दि.13.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वर्ष 2024-25 या आर्थीक वर्षाकरीता देण्यात आलेले कर वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कर वसुली प्रणालीत नवीन तत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येऊन नवनव्या योजनांचा अवलंब करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने संगणक प्रणालीचा वापर करुन माहिती अपडेट करणे इ.कर वसुली विषयक कामे करण्यासाठी वसुली कर्मचाऱ्यांना टॅब उपलबध करुन देण्याकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1633/2024 दि.07.10.2024 नुसार र.रु.40.00 लक्षची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

उपलब्ध संगणक प्रणालीचा प्रभावी वापर करुन कर वसुलीत आधुनिकता आणण्याच्या दृष्टिने महानगरपालिके अंतर्गत मालमत्ता कर नियंत्रण कक्ष व कर वसुलीकरीता कार्यरत कर्मचाऱ्यांना वापरण्यासाठी विहीत रचनेचे व तांत्रिक क्षमतेचे टॅब आवश्यकतेनुसार पुरविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव व अर्थसंकल्पातील तरतुदीचे अधिन राहून विहीत रचनेचे व तांत्रिक क्षमतेचे टॅब पुरविण्या साठी दि.07.10.2024 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठी निविदेत दिलेल्या अटी शर्तीची पुर्तता करणाऱ्या एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा सादर करण्याऱ्यांचे नाव | दिलेला दर (प्रतीनग) |
|---|---|---|
| 1. | महावीर मोबाईल शॉपी, उस्मानपुरा | र.रु.24,750/- |
| 2. | अभय ट्रेडर्स, प्रिया मार्केट औरंगपुरा | र.रु.26,000/- |
| 3. | यश ट्रेडिंग, दत्त नगर | र.रु.28,000/- |

प्राप्त निविदांमधुन दिलेल्या अटी शर्तीची पुर्तता करणाऱ्या व सर्वात कमी दर असलेल्या महावीर मोबाईल शॉपी, उस्मानपुरा यांची निविदा अंतिम करण्यात आली आहे. नियंत्रण कक्ष व कर वसुली करीता कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी सध्या 100 (शंभर) टॅबची आवश्यकता आहे. तरी निविदा अंतिम झालेल्या महावीर मोबाईल शॉपी, उस्मानपुरा यांना निविदेत निश्चित करण्यात आलेल्या नमुन्याचे एकुण 100 (शंभर नग) टॅब र.रु.24,750/- प्रती नग प्रमाणे (एकुण र.रु.24,75,000/-) पुरविण्याचे कार्यादेश देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1721/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महावीर मोबाईल शॉपी, उस्मानपुरा यांना मालमत्ता कर नियंत्रण कक्ष व कर वसुली करीता कार्यरत कर्मचाऱ्यांना वापरण्यासाठी निविदेत निश्चित करण्यात आलेल्या नमुन्याचे एकुण (100 नग) टॅब र.रु.24,750/- प्रती नग प्रमाणे पुरविण्याचे कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1722/2024:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.13.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागा तील 214 वाहने व औरंगाबाद स्मार्ट सिटीच्या 100 बसेस करीता Digitalized Fleet Management Software System चा अवलंब करावयाचा आहे. सद्यस्थितीत यांत्रिकी विभाग व औरंगाबाद स्मार्ट सिटी बस विभागातील वाहनांचे Management, Maintenance, History Book Record Keeping, Insurance, Registration इ.सर्व कामे Manual पध्दतीने होत आहेत. ही सर्व कामे Digitalized पध्दतीने करण्यासाठी Digitalized Fleet Management Software System विकसीत करणे आवश्यक आहे. Fleet Management Software System चा अवलंब केल्यास वाहनांच्या नियोजनावर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य होईल. तसेच सर्व कामे Digitalized पध्दतीने झाल्यामुळे कार्यालयीन कामाचा वेग वाढून कार्यक्षमता वाढणार आहे.

उपरोक्त Digitalized Fleet Management Software System या प्रणालीने काम सुरु करण्यासाठी औरंगाबाद स्मार्ट सिटीने Maha Infoech Pvt.Ltd. (MIPL) या Project Managemtn Consultant (PMC) यांची नियुक्ती केली असुन PMC या ने कामासाठी दरपत्रके घेऊन न्युनतम दराच्या दरपत्रकानुसार र.रु.5,21,06,700/- रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

PMC ने सादर केलेल्या अंदाजपत्रकास व Fleet Management Software System चा अवलंब करण्यास मान्यता मिळाली तर PMC द्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. करीता र.रु.5,21,06,700/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1722/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागातील 214 वाहने व औरंगाबाद स्मार्टसिटी च्या 100 बसेस यांचे योग्य नियंत्रण करण्यासाठी Fleet Management Software System कार्यपध्दती राबविण्यासाठी र.रु.5,21,06,700/- च्या अंदाज पत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1723/2024:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.13.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 ची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. या अभियाना अंतर्गत राज्यातील सर्व शहरे कचरा मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट असुन या अंतर्गत शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन व शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणे समाविष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-2024/सीएन-853129 (25)/नवि-34 दि.04.10.2024 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्लॅन्ट उभारणी करण्या साठी र.रु.11,30,66,835/- च्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये चिकलठाणा येथे 100 टीपीडी क्षमतेचे कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्लॅन्ट ची यंत्रणा उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर ठिकाणी सी ॲण्ड डी प्लॅन्टची यंत्रणा उभारणी करण्याच्या दृष्टिने (स्थापत्य कामाशिवाय) नियुक्त प्रकल्प सल्लागार मे.मार्स प्लॅनिंग ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि.यांनी दरपत्रके मागविली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे.पिक्सॉन कन्स्ट्रक्शन इक्वीपमेंटस प्रा.लि. | र.रु.3,84,23,153/- |
| 2. | मे.मायो व्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. | र.रु.3,95,89,000/- |
| 3. | मे.सी.डी.ई.एशिया लि. | र.रु.4,50,00,000/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे.पिक्सॉन कन्स्ट्रक्शन इक्वीपमेंटस प्रा.लि. यांचे दर कमी असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत. सदरील दरपत्रकात प्रस्तावित ठिकाणी Hoppers, Vibratory Segergator, Fidders, Recycles, Conveyors, Control Pannel, All Electrical Items व इतर अनुषंगिक यंत्रणा पुरवठा करुन उभारणी करणे (01 वर्षे वॉरंटी सह) समाविष्ठ आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवुन कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्लॅन्टची यंत्रणा उभारणी करण्यात येईल.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्लॅन्टची ची यंत्रणा 1 वर्षे वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी र.रु.3,84,23,153/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1723/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमोलेशन (सी ॲण्ड डी) प्लॅन्टची ची यंत्रणा 1 वर्षे वॉरंटीसह पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी र.रु.3,84,23,153/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1724/2024:-** **(काय.अभि.विदयुत विभाग)** **(दि.13.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नवीन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे एम.आय.टी.चौक ते मराठवाडा केमिकल डि.टी.सी. रस्त्यां मधील महावितरण कंपनीचे एच.टी./एल.टी. लाईन रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरत असुन त्वरीत स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र. जिनिस /जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासाठी र.रु.7 कोटीचा निधी प्राप्त झाला आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत विकसीत होत असणाऱ्या रस्त्यांच्या मध्ये अडथळा निर्माण करणारे पोल व डि.टी.सी. स्थलांतरीत करण्याचे काम महानगरपालिकेतर्फे म.रा.वि.वि.कंपनीस 1.3% देखरेख शुल्क

भरुन करण्यात येणार आहे. त्यानुसार एम.आय.टी.चौक ते मराठवाडा केमिकल डि.टी.सी.येथील कामा बाबत म.रा.वि.वि.कंपनीकडून 1.3% Supervision Charges अंतर्गत अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

तरी र.रु.79,15,789/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1724/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नवीन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे एम.आय.टी.चौक ते मराठवाडा केमिकल डि.टी.सी. रस्त्यां मधील महावितरण कंपनीचे एच.टी./एल.टी. लाईन त्वरीत शिफ्ट करण्यासाठी अंदाजपत्रकीय र.रु.79,15,789/- यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1725/2024:-</u> (कार्य.अभि.पापु.विभाग)** **(दि.16.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या आवारात असलेला अस्तित्वातील उंचावरील जलकुंभ सन-1988 मध्ये बांधलेला असुन 1.5 लक्ष ली.क्षमतेचा आहे. सदर जलकुंभावरजाण्याच्या पायऱ्या पुर्णपणे तुटलेल्या असुन आर.सी.सी.कॉलम तसेच सिमेंट कॉंक्रीटचा भाग निखळून पडत आहे. हा जलकुंभ मागच्या 15 वर्षा पासून वापरात नाही. सदर जलकुंभ सध्या जिर्ण स्थितीत आहे. सदरील ठिकाणी शाळेच्या आवारात लहान मुले खेळतात. जलकुभाच्या बांधकामाच्या काही लाहन अथवा मोठा भाग पडून दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिवीत हानी होऊ शकते. सद्यस्थितीत शहराकरीता सुरु असलेल्या वाढीव पाणी पुरवठा योजनेमध्ये सुध्दा या जलकुंभाचा भविष्यात वापर करण्यात येणार नाही. त्यामुळे सदर जलकुंभ निष्काशीत करुन ही जागा शाळेसाठी वापरता येईल.

करीता, मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेच्य आवारात असलेला जुना व जिर्ण झालेला उंचावरील जलकुंभ निष्काशीत करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1725/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या आवारात असलेला जुना व जिर्ण झालेला उंचावरील जलकुंभ निष्काशीत करुन ही जागा शाळेसाठी वापरण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1726/2024:-</u> (कार्य.अभि.इमारत, उद्यान विभाग)** **(दि.23.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्यालयातील संगणक कक्षाची दुरुस्ती व श्रेणीवाढ करण्याचे काम करण्यात येत आहे. सदरचे काम करीत असतांना संबंधीत विभागाच्या मागणी नुसार Granite, Partition Door, Steel Grill for Window, Furniture & Furniture Accessories, Orissa Pan, Flooring Tiles & Dado Tiles, WashBasin, Bib Cock Plumbing, Waterproffing for W.C.Solid Core Door, इ.स्थापत्य कामे तसेच विद्युती करणाची कामे जसे की, Exhaust fan, Call bell, Dinner, PVC Insulated Wire, G.I. Wire, Anchor Fastner इ. कामे आवश्यक असल्याने करुन घेण्यात आलेली आहेत. जे अतिरीक्त बाबींचे काम करुन घेण्यात आलेले आहेत ते संगणक विभाग महत्वाचा कार्यालयीन विभाग असल्याने काम प्रदान करण्यात आलेले नियुक्त कंत्राटदार M/sBuildwell Construction यांच्याकडून अतिरीक्त बाबींचे काम वरीष्ठांच्या सुचनेनुसार तातडीची कामे असल्याने कार्योत्तर स्वरुपाने करुन घेण्यात आले आहे. सदरचे अतिरीक्त बाबींसह सुधारीत अंदाजपत्रक र.रु.31,00,782/- तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा वाढीव खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2024-25 मधुन प्रशासकीय इमारत देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता, सदरच्या सुधारीत अंदाजपत्रक र.रु.31,00,782/- यास तसेच या कामातील अतिरीक्त बाबींचे काम मंजुर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.10% कमी दराने मुळ कामाचे

नियुक्त कंत्राटदार M/s Buildwell Construction यांच्याकडून करुन घेतल्याच्या बाबीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1726/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्यालयातील संगणक कक्षाची दुरुस्ती व श्रेणीवाढ करणे या कामाचे अतिरीक्त बाबींसह सुधारित अंदाजपत्रक र.रु.31,00,782/- यास तसेच हे काम नियुक्त कंत्राटदार M/s Buildwell Construction यांच्याकडून अतिरीक्त बाबींचे काम मंजुर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.10% कमी दराने करुन घेल्याच्या बाबीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1727/2024:-</u> (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.23.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर, मयुरबन कॉलनी येथील मनपा केंद्रीय शाळेमध्ये सिंथेटिक टर्फ तयार करण्याच्या कामाचे र.रु.36,17,600.00 च्या अंदाज पत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.1203/2024 दि.06.02.2024 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तद्नंतर र.रु.30,65,739/- च्या मर्यादेत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता, यामध्ये पात्र L1 निविदाधारक नाज डेव्हलपर्स यांचे दर निविदा रक्कमेपेक्षा 11.11% मी. दराने प्राप्त असुन सदर निविदा दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.1390/2024 दि.15.03.2024 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

उक्त नमुद काम हे महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी कामांपैकी एक असुन या कामाची तातडी व तत्परता पाहता सदरील काम विहीत कालावधीत पुर्ण आले आले आहे. तथापि, सदरील काम प्रगतीपथावर असतांना स्थळ परिस्थितीनुसार कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र.01,03,04 आणि 05 या बाबींच्या परिमाणामध्ये 25% पेक्षा अधिक वाढ झाली असुन पर्यायाने कामावर होणारा खर्च हा 10% पेक्षा जास्त होत आहे. यास MPW Mannual चे Clause 134 नुसार अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने उक्त नमुद कामाचे अतिरीक्त बाबींसह सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या राज्य दरसुचीनुसार र.रु.59,38,114.00 (18% जी.एस.टी.सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाअंतर्गत फुटींग, कॉलम, बिम, विट बांधकाम करणे, प्लास्टर करणे, रंगकाम इ.कामे करणे आवश्यक ठरल्याने व ही बाब मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने या अंदाजपत्रकात मुळ निविदेतील बाबी व्यतिरीक्त अतिरीक्त बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट अतिरीक्त बाबींची कामे ही मुळ मंजुर निविदा दराऐवजी अंदाज पत्रकीय दराने देणे बाबत संबंधीत कंत्राटदार नाज डेव्हलपर्स यांनी कार्यालयास लेखी कळविले आहे. तथापि, सदर कामासाठी अतिरीक्त बाबींसह तयार करण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रका नुसार अतिरीक्त आर्थिक तरतुद करणे आवश्यक आहे.

करीता, उक्त नमुद प्रमाणे झोन क्र.08 अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर, मयुरबन कॉलनी येथील मनपा केंद्रीय शाळेमध्ये सिंथेटिक टर्फ तयार करण्याच्या कामाच्या मुळ मंजुर निविदेतील बाबींच्या परिमाणा मध्ये 25% पेक्षा अधिक वाढ होणार असुन पर्यायाने कामावर होणाऱ्या खर्चात 10% पेक्षा जास्त वाढ होत असल्यामुळे MPW Mannual चे Clause 134 नुसार अतिरीक्त बाबींसह सुधारित अंदाजपत्रक र.रु.59,38,114.00 (18% जी.एस.टी.सह) चे प्रशासकीय मान्यता, सदर सुधारित अंदाज पत्रकात समाविष्ट कामे मुळ कंत्राटदार नाज डेव्हलपर्स यांच्या मार्फत मंजुर निविदा दराने म्हणजेच 11.11% कमी दराने करुन घेणे तसेच या कामासाठी आवश्यक अतिरीक्त आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देणे बाबतचा कार्योत्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1727/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर, मयुरबन कॉलनी येथील मनपा केंद्रीय शाळेमध्ये सिंथेटिक टर्फ तयार करण्याच्या कामाअंतर्गत स्थळ परिस्थितीनुसार कामे पुर्ण

करण्यात आलेली असल्याने यामुळे मुळ मंजुर निविदेतील बाबींच्या परिमाणा मध्ये 25% पेक्षा अधिक वाढ होणार असुन पर्यायाने कामावर होणाऱ्या खर्चात 10% पेक्षा जास्त वाढ होत आहे.

करीता, अतिरीक्त बाबींसह सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या राज्य दरसुचीनुसार र.रु.59,38,114.00 (18% जी.एस.टी.सह) यास MPW Mannual चे Clause 134 नुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारित कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येते.

तसेच सदर सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ठ कामे मुळ कंत्राटदारनाज डेव्हलपर्स यांच्या मार्फत मंजुर निविदा दराने म्हणेजच 11.11% कमी दराने करुन घेणे व या कामासाठी आवश्यक अतिरीक्त आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1728/2024:-</u> (यांत्रिकी पापु.जायकवाडी विभाग) (दि.23.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा जायकवाडी व शहर यांत्रिकी विभागा अंतर्गत असलेल्या विविध पंपगृह येथील निरुपयोगी/भंगार साहित्याचे लिलावाबाबात आयुक्त यांची दि.26.07.2023 रोजी मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार शहरातील विविध पंपगृहावरील व जायकवाडी पाणीपुरवठा (यांत्रिकी) विभागा अंतर्गत विविध पंपगृहातील निरुपयोगी/भंगार साहित्य फारोळा पंपगृह येथे एकत्रित करण्यात आले. जमा केलेले साहित्य मुल्यांकन व पुढील लिलाव प्रक्रियेसाठी साहित्याच्या प्रकारानुसार लॉट मध्ये वर्गीकरण करण्यात आले. निरुपयोगी /भंगार साहित्याचे मुल्यांकन करण्यासाठी शासकीय मान्यता प्राप्त मुल्यांकनकर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणे यांचे नियुक्ती आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यात आली. मुल्यांकन कर्त्याने दि.19.09.2024 रोजी फारोळा पंपगृह येथील LOTWISE केलेल्या निरुपयोगी/भंगार साहित्यांची प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली. सदर स्थळ पाहणी वेळी शासकीय मुल्यांकन कर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणे यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या

1. एम.एस.मटेरियल एकत्रित करणे.
2. कॉपर (Auto Transformer मधील कॉपर वेगळे करुन) एकत्रित करणे.
3. सी.आय.साहित्य एकत्रित करणे.
4. सर्व मोटार अ.श.नुसार एकत्रित ठेवणे.
5. विविध कॅपेसिटरचा वाजन करणे.

वरील प्रमाणेच्या मुल्यांकनकर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणे यांच्या सुचनेनुसार भंगार प्रकारानुसार एकूण 16 प्रकारात भंगार साहित्यचे वर्गीकरण (16 लॉट) करण्यात आले. त्याप्रमणे वजन करणे शक्य असलेल्या निरुपयोगी/भंगार साहित्याचे प्रत्यक्ष वजन करण्यता आलेले आहे. तर शक्य नसलेल्या भंगार साहित्याचे या विभागाने पुर्वी निश्चित केलेले वजन व मुल्यांकनकर्ता आणि या कामाशी निगडित अनुभवी व्यक्तीशी चर्चा करुन अंदाजीत वजन गृहीत धरण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने मुल्यांकन कर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणे यांनी पुन्हा एकवेळी प्रत्यक्षस्थळी पाहणी करुन निरुपयोगी/भंगार साहित्याचे दि.10.10.2024 रोजी पुढीलप्रमाणे दर सादर केले आहे.

| S N | Description | Types of Material | Approx. Total Weight M. Ton & Nos | Estimated Rate In Inr Per M.Ton & Nos | Estimated Reserve Price For Auction In Inr |
|---|---|---|---|---|---|
| 1. | All Typer Of Valve (Sluice Valve & NRV) | Cast Iron | 6.5 | 32000/- | 208000 |
| 2. | Old Pump Assembly | Cast Iron | 7 | 32000/- | 224000 |
| 3. | Oil Drum (210 Ltr.Each) Empty | Mild Steel | 202 | 350/- | 70700 |
| 4. | Colmn Pipe & Misc.Material | Mild Steel | 2 | 30000/- | 60000 |
| 5. | Foundation Plate+Shutter etc. | Mild Steel | 3 | 30000/- | 90000 |
| 6. | Varioius Panel Box | Mild Steel | 1.5 | 30000/- | 45000 |
| 7. | Light Fitting+Do Assembly | Mild Steel+ | 1.5 | 24000/- | 36000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Ceramic | | | |
| 8. | Breaker+Electrical Parts | -- | 3 | 40000/- | 120000 |
| 9. | All Types Of Motors | Cast Iron + copper | 6 | 50000/- | 300000 |
| 10. | Hand Pump Material (Lot-2) | Mild Steel+Galvanized Iron | 28 | 30000/- | 840000 |
| 11. | Armoured Cables | PVC+Aluminium | 1.5 | 55000/- | 82500 |
| 12. | Reduction Gear Box | Cast Iron | 0.8 | 36000/- | 28800 |
| 13. | Bearing | Stainless Steel | 0.25 | 42000/- | 10500 |
| 14. | SS Shaft + Sleeves | Stainless Steel | 1.2 | 45000/- | 54000 |
| 15. | Capacitors | Aluninium Ceramic, Plastic Films | 3.5 | 50000/- | 175000 |
| 16. | Oil Drum With Contaminated Oil (210 Ltr.Each) | Mild Steel+Oil | 14 | 4000/- | 56000 |
| | **Total Rs.** | | | | **2400500** |
| **ESTIMATED RESERVE PRICE FOR AUCTION IS RU[EES TWENTY FOUR LAKHS FIVE HUNDRED ONLY** | | | | | |

सदरील प्राप्त दर अंतिम करण्यासाठी या कामी गठीत निर्लेखन समितीच दि.03.12.2024 रोजी अतिरिक्त आयुक्त-1 यांच्या अध्यक्षतेखाली फारोळा पंपगृह येथे पाहणी व बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मुल्यांकनकर्ता प्राप्त निरुपयोगी/भंगार साहित्याच्या दराबाबत समिती अध्यक्ष व सर्व समिती सदस्य यांचेमध्ये चर्चा होऊन सध्या बाजारात चालु असलेल्या दराबाबत माहिती प्राप्त करुन घेऊन दोन्ही दरामधील तुलना करुन पुढील बैठकीत दर अंतिम करणेबाबत सर्वानुमते मान्यता दिली

त्याप्रमाणे निर्लेखन समितीच्या बैठकीत सर्वानुमते सुचविल्याप्रमाणे भंगार साहित्याचे सध्या बाजारात चालु असलेल्या दराबाबत माहिती प्राप्त करुन घेणेसाठी दरपत्रक मागविण्यात आले. सदर दरपत्रक व महानगरपालिकेने नियुक्त केलेले शासनमान्य मुल्यांकनकर्ता यांच्याकडून प्राप्त मुल्यांकन याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. तुलनात्मक मुल्यांकनावर चर्चा करुन अंतिम करण्या साठी अथवा निर्लेखन समिती निश्चित करेल ते दर अंतिम करण्यासाठी निर्लेखन समितीची दि.10 डिसेंबर 2024 रोजी अतिरीक्त आयुक्त-1 यांचे दालन येथे बैठक संपन्न झाली. समिती अध्यक्ष व सर्व सदस्यांनी एकुण 16 प्रकारच्या सर्व भंगार साहित्याच्या दरासंदर्भात तुलनात्मक तक्त्याचा आढावा घेऊन समिती अध्यक्ष व सदस्यांच्या झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेने नियुक्त केलेले शासनमान्य मुल्यांकनकर्ता मे.ए.व्ही.शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणेयांनी भंगाराच्या प्रकार निहाय दिलेले किमान दर निश्चितीस सर्वानुमते मान्यता दिली. उक्त किमान दर हे निविदा प्रकिया अंतर्गत बोली निश्चित करण्यास किमान दर म्हणुन ग्राह्य धरावे असे सर्वानुमते ठरले.

या दरम्यान निरुपयोगी/भंगार साहित्याच्या लिलाव प्रक्रियेसाठी शासनमान्य ई-ऑक्शन मे.शंकर रामचंद्र ऑक्शनर यांना आयुक्त यांची दि.14.10.2024 रोजी मान्यता प्राप्त आहे. दि.10.12.2024 रोजीच्या निर्लेखन समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार केलेले किमान दर ग्राह्य धरुन ई-ऑक्शन मे.शंकर रामचंद्र ऑक्शनर यांच्या समवेत करारनामा करुन निरुपयोगी भंगार साहित्याच्या ई-लिलाव व पुढील प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

**<u>ठराव क्रमांक 1728/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा जायकवाडी व शहर पाणीपुरवठा यांत्रिकी विभागाअंतर्गत असलेल्या विविध पंपगृह येथील निरुपयोगी/भंगार साहित्याचा लिलाव करणे, शासनमान्य मुल्यांकनकर्ता मे.ए.व्ही. शेवडे ॲण्ड असोसिएटस् पुणे यांनी भंगाराच्या प्रकारनिहाय दिलेले किमान दर निश्चितीस व उक्त किमान दर हे निविदा प्रक्रिया अंतर्गत बोली निश्चित करण्यास किमान दर म्हणुन ग्राह्य धरणे आणि

सदरील साहित्याचा ई-लिलाव करण्यासाठी ई-ऑक्शनर मे.शंकर रामचंद्र ऑक्शनर यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1729/2024:-** **(यांत्रिकी विभाग)** **(दि.23.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्जदार श्री.सुनिल गंगाराम बकले, मजुर, पाणी पुरवठा यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिक यांनी त्यांच्या मुलांच्या श्री.ललित सुनिल बकले (Right Knee PCL Tear Pre-op-Physiotherapy) यावर उपचार करण्यासाठी मनीपाल हॉस्पीटल, पुणे येथे दि.02.01.2024 ते दि.05.01.2024 या कालावधीत उपचार केलेला असुन एकुण र.रु.2,43,700/- इतका खर्च केलेला आहे. अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून बकले (Right Knee PCL Tear Pre-op-Physio therapy) या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1. | एकुण खर्च | र.रु.2,43,700/- |
| 2. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | र.रु.1,04,268/- |
| 3. | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | र.रु.1,39,432/- |
| 4. | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | र.रु.1,25,488/- |
| 5. | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1च्या रक्कमेवर) | र.रु.12,185/- |
| 6. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | र.रु.1,13,303/- |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.1,13,303/-

संबंधीताने उपचार घेतलेले मनीपाल हॉस्पीटल, पुणे हे असुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची दि.16.11.2011 पर्यंतच्या अद्ययावत प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्ती साठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिफारस केलेली आहे.

करीता, अर्जदार श्री.सुनिल गंगाराम बकले, मजुर, पाणी पुरवठा यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या मुलाच्या श्री.ललित सुनिल बकले, (Right Knee PCL Tear Pre-op-Physiotherapy) यावर उपचार करण्यासाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,13,303/- एवढी आहे. परंतु दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1729/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुनिल गंगाराम बकले, मजुर, पाणी पुरवठा यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या मुलाच्या श्री.ललित सुनिल बकले, (Right Knee PCL Tear Pre-op-Physiotherapy) या आजारावर केलेल्या खर्च त्यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1730/2024:-</u> (कार्य.अभि.विद्युत विभाग)** **(दि.23.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहरातील आमखास मैदानालगत पश्चिमेकडे महानगरपालिकेने सन-1996 साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर तारांगण उद्यानाची उभारणी केलेली आहे. सदर उद्यान हे अंदाजे दिड एकर क्षेत्रात विकसीत करण्यात आलेले आहे. सदर उद्यानात सुरक्षा व्यवस्था आणि स्थापत्य, विद्युत विषयक कामाची देखभाल दुरुस्ती अभावी नागरीक/ पर्यटकांना उद्यानाचा उपभोग घेता येत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनोरंजन उद्यानात पथदिवे व अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे या कामाचे र.रु.33,99,971/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त आहे. तसेच विषय क्र.1434/2024 दि.24.06.2024 अन्वये मा.स्थायी समिती ठराव मंजुर असुन असुन जा.क्र./मनपा/विद्युत/48/2024 दि.14.10.2024 अन्वये मे.पुजा इलेक्ट्रिकल्स यांना कार्यादेश देण्यात आला आहे.

सदर कामासाठी शासन निर्णय क्र.:-मनपा-2023/प्र.क्र.2023/प्र.क्र.628/नवि-16, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.30.08.2023 नुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई-सुविधांच्या विकासा साठी विशेष तरतुद या योजनेअंतर्गत प्राप्त शासन निधीमधून र.रु.2.00 कोटी वितरीत करण्यात आले आहे. प्रस्तावित केल्यानुसार उद्यानाच्या स्थापत्याच्या कामात बराच बदल झाला असून सदर ठिकाणी साहसी खेळा अंतर्गत रोप-वे सायक्लिंग व इतर साहसी खेळांसाठी मनोरे उभारण्यात आले आहेत. तसेच जुन्या अंदाजपत्रकातील बाबींच्या प्रमाणात बदल झाला आहे. परंतु अंदाजपत्रकीय खर्च पुर्वीच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी आहे.

- 5m High Octangle Poles
- LED Food Light Max 50 W IP65
- Supplying and Erecting Integrated LED Round Burial Light
- Supplying and Erecting Concealed Type Foot/Step Light Max 5W

वरील कामे नव्याने तयार करण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तारांगण उद्यानात पथदिवे व अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे या कामाचे र.रु.33,99,949/- ची सुधारित अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1730/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तारांगण उद्यानात पथदिवे व अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे या कामाचे सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.33,99,949/- च्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1731/2024:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.24.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोतीवालानगर येथील महानगरपालिका उद्यान सुस्थितीत करणे/उद्यानाचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव असुन या कामांअंतर्गत (1) उद्यानाच्या पश्चिमेकडील भिंतीची दुरुस्ती करणे (2) अंतर्गत भागातील नाल्याच्या दगडी भिंती दुरुस्ती करुन त्यावर आर.सी.सी. ढापे बसविणे (3) दर्शनी भागात पेव्हर ब्लॉक बसविणे, (4) नवीन जॉगिंग ट्रॅकची उभारणी करणे, (5) लहान मुलांसाठी खेळणी बसविणे, (6) अस्तित्वातील पागोड्यास फरशी बसविणे, (7) आर.सी.सी. बेंचेस बसविणे, (8) संपुर्ण परिसरात रंगकाम इ.कामांचा समोवश करण्यात आला आहे. सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याची दरसुची सन 2022-23 तसेच काही बाबी मंजुर कोटेशन आधारे तयार करण्यात आलेल्या र.रु.37,38,249/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.1322/ 2024 दि.09.03.2024 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

प्राप्त मान्यतेनुसार सदर कामासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. ई-निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत नऊ निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, सर्व निविदाधारक पात्र होते. त्यानुसार सर्व निविदेचे देकार (Price Bid) उघडण्यात आले. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | प्राप्त दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|
| 1. | श्री.मुबारक पठाण | 31.01% कमी |
| 2. | श्री.प्रभाकर मोहिते | 26.86% कमी |
| 3. | मे.पद्मावती कन्स्ट्रक्शन | 26.51% कमी |
| 4. | मे.हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन | 23.75% कमी |
| 5. | श्री.शेख सलिम गुलाम मो. | 22.89% कमी |
| 6. | मे.खुशी कन्स्ट्रक्शन | 22.77% कमी |
| 7. | मे.एम.आय.इन्फ्रा | 19.20% कमी |
| 8. | श्री.संतोष रुपचंद चव्हाण | 15% कमी |
| 9. | मे.आर.यु.सी.कन्स्ट्रक्शन | 14.01% कमी |

मनपाच्या मोतीवालानगर उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामासाठी प्राप्त उक्त नऊ निविदां पैकी श्री.मुबारक पठाण यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.01% कमी आहे. करीता श्री.मुबारक पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.01% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1731/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या मोतीवालानगर उद्यानाचे नुतनीकरण करणे (अंदाजपत्रक र.रु.37,38,249/-) या कामासाठी ई-निविदेद्वारे प्राप्त सर्वात कमी म्हणजेच अंदाजत्रकीय दरापेक्षा 31.01% कमी दराच्या श्री.मुबारक पठाण यांच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1732/2024:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.24.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासना पुरस्कृत “माझी वसुंधरा 3.0” अभियान दि.16 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2023 या कालावधीत राबविण्यात आले. सदर अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने केलेल्या कामांच्या गुणानुक्रमानुसार र.रु.2.00 कोटी बक्षिस दि.05.06.2023 च्या शासन निर्णयानुसार मिळाले आहे. सदर बक्षिस रक्कमेचा विनियोग हा निसर्गाच्या पंचतत्वाचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्याच्या उपाय योजनांची कामे हाती घेणे बाबत सुचना आहे.

उक्त बक्षिस रक्कमेमधुन हाती घ्यावयाच्या कामांसाठी दि.05.06.2023 च्या शासन निर्णयात नमुद मार्गदर्शक सुचनेनुसार प्रथम सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे गरजेचा होता. सदर प्रकल्प अहवालास महानगरपालिकेने तांत्रिक मान्यता देऊन तसा प्रस्ताव मा.सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल यांच्या अध्यक्षेते खाली गठीत समितीसमोर सादर करावयाचा आहे.

विहीत कालमर्यादित शासनास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे गरजेचे असल्याने अशा कामांचा नाशिक महानगरपालिका व राज्यातील विविध नगरपरिषदे करीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्याचा अनुभव असलेले तसेच छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी “माझी वसुंधरा 2.0” मध्ये काम केलेले अर्बनसिटी स्मार्ट सोल्युशन प्रा.लि.वाशी, नवी मुंबई यांची प्रस्तुत प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी प्रकल्प रक्कमेच्या 1.50% सल्लागार शुल्क/मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे. सविस्तर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी शासन निर्णयात नमुद मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तावित कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार रकणे, प्रकल्पात वेळोवेळी मार्गदर्शन करणे, शासनाच्या सुचनांची पुर्तता करण्यासाठी निधारित कामे करणे, प्रत्यक्ष स्थळावर कामे करुन घेणे इ.कामे करारवयाची आहेत.

करीता, शासन पुरस्कृत “माझी वसुंधरा 3.0” अभियाना अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस मिळालेल्या र.रु.2.00 कोटी बक्षिस रक्कमेचा विनियोग अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी अर्बनसिटी स्मार्ट सोल्युशन प्रा.लि. नवी मुंबई यांच्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता होणे, त्यांना प्रकल्प रक्कमेच्या 1.50% रक्कम सल्लागार शुल्क (Consultancy Charges) म्हणुन अदा करणे आणि अर्बनसिटी स्मार्ट सोल्युशन प्रा.लि.यांना

महानगरपालिकेच्या पॅनलवर सामावुन घेणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1732/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन पुरस्कृत “माझी वसुंधरा 3.0” अभियाना अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस मिळालेल्या र.रु.2.00 कोटी बक्षिस रक्कमेचा विनियोग अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी अर्बनसिटी स्मार्ट सोल्युशन प्रा.लि. नवी मुंबई यांच्या कार्योत्तर नियुक्तीस मान्यता देण्यात येते, तसेच अर्बनसिटी स्मार्ट सोल्युशन प्रा.लि. यांना प्रकल्प रक्कमेच्या 1.50% रक्कम सल्लागार शुल्क (Consultancy Charges) म्हणुन अदा करणे आणि त्यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर सामावुन घेणेस देखील मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1733/2024:- (यांत्रिकी वाहने विभाग)** **(दि.24.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्जदार श्रीमती सुंदराबाई संतोष फुले यांनी त्यांच्या पतीच्या स्व.संतोष आश्रुबा फुले, हेल्पर यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (फुफ्फुसाचे विकार) यावर उपचार करण्यासाठी मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे दि.13.12.2023 ते 16.12.2023 या कालावधीत उपचार केलेला असून एकुण र.रु.1,54,822/- इतका खर्च केलेला आहे. अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (फुफ्फुसाचे विकार) या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1. | एकुण खर्च | र.रु.1,54,822/- |
| 2. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | र.रु.19,609/- |
| 3. | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | र.रु.1,35,213/- |
| 4. | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | र.रु.1,21,691/- |
| 5. | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1च्या रक्कमेवर) | र.रु.7,741/- |
| 6. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | र.रु.1,13,950/- |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.1,13,950/-

संबंधीताने उपचार घेलेले मेडीकव्हर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर हे असुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयातप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची दि.16.11.2011 पर्यंतच्या अद्ययावत प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्ती साठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिफारस केलेली आहे.

करीता, स्व.संतोष आश्रुबा फुले, हेल्पर यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (फुफ्फुसाचे विकार) यावर उपचार करण्यासाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,13,950/- एवढी आहे. परंतु दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अधिकारात र.रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो. त्यानुसार संबंधीतास र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1733/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सुंदराबाई संतोष फुले यांनी त्यांच्या पतीच्या स्व.संतोष आश्रुबा फुले, हेल्पर यांत्रिकी विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (फुफ्फुसाचे विकार) या आजारावर केलेल्या खर्च त्यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.1,00,000/- च्या 5 टक्के रक्कम मनपा

फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1734/2024:-</u> (आस्थापना -1 विभाग)** **(दि.26.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संजय कोंडीराम रगडे, वरिष्ठ लिपीक, समान्य् प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या (हृदय रक्तवाहिन्यांचे आजार) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1. | एकुण खर्च | र.रु.2,12,893/- |
| 2. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | र.रु.21,202/- |
| 3. | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | र.रु.1,91,691/- |
| 4. | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | र.रु.1,72,521/- |
| 5. | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1च्या रक्कमेवर) | र.रु.10,644/- |
| 6. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | र.रु.1,61,877/- |
| 7. | (-) अग्रिम रक्कम | र.रु.1,50,000/- |
| **एकुण देय रक्कम (अ.क्र.6 मधुन अ.क्र.7 अग्रिम रक्कम वजा जाता निव्वळ अनुज्ञेय रक्कम)** | | **र.रु.11,877/-** |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.11,877/- अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार केलेले रुग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्ययावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्ती साठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

**<u>ठराव क्रमांक 1734/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संजय कोंडीराम रगडे, वरिष्ठ लिपीक, समान्य् प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना अनुज्ञेय र.रु.1,61,877/- मधुन अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.11,877/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा हजार आठशे सत्याहत्तर फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1735/2024:-</u> (कार्य.अभि.पापु विभाग)** **(दि.26.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-5 जलकुंभ परिसरात काँक्रीट पेव्हमेंट करणे व पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप ड्रेन बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 दरसुची नुसार र.रु.1,08,80,700/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2024-25 च्या सुधारित अर्थसंकल्पात या कामा साठी तरतुद उपलब्ध करुन घेण्यात येईल. करीता, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,08,80,700/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1735/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-5 जलकुंभ परिसरात काँक्रीट पेव्हमेंट करणे व पाणी वाहून जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप ड्रेन बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,08,80,700/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1736/2024:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.27.12.2024)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, गट क्र. 708/पी मौजे चिकलठाणा येथील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्र 5371.84 चौ.मी.क्षेत्र मुळ रेखांकन धारकाचे मुख्यत्यार मे.सिमर प्राईड व्हेंचर्स, एल.एल.पी.द्वारे महानगरपालिकेस दि.08.02.2018 रोजीच्या हक्कसोड दस्ताऐवजाद्वारे हस्तांतरीकत करण्यात आलेले आहे.

असे की, या रेखांकनामध्ये माय वर्ल्ड अपार्टमेंट ओनर्स अपेक्स असोसिएशन नावाची वसाहत निर्माण झाली असून सदरील खुली जागा विकासीत करण्याच्या दृष्टिने स्थानिक सहिवासी यांनी माय वर्ल्ड अपार्टमेंट ओनर्स अपेक्स असोसिएशन द्वारे UDCPR नियमावलीतील नियम क्र.3.4.2 नुसार रेखाकंनातील खुली जागा एकुण क्षेत्र 5371.84 चौ.मी.उक्त सोसायटीला हस्तांतरीत करावी अशी विनंती केली आहे.

आयुक्त, महानगरपालिका याद्वारे सदरील खुली जागा हक्कसोड पत्राद्वारे महानगरपालिकेस निहीत झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (अ) नुसार अभिहस्तांतरीत करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्ताव सादर करीत आहे.

सदर खुल्या जागेचे क्षेत्र मुळ मालक किंवा मुख्यारनामा धारण करणारी व्यक्तीस सुधारित हक्कसोड प्रमाणपत्र करुन माय वर्ल्ड अपार्टमेंट ओनर्स अपेक्स असोसिएशन या रहिवाशी सोसायटीस त्री-पक्षीय कराराद्वारे अभिहस्तांतरित करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 1736/2024:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (अ) नुसार गट क्र.708/पी मौजे चिकलठाणा येथील मंजुर रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्र 5371.84 चौ.मी. क्षेत्र माय वर्ल्ड अपार्टमेंट ओनर्स अपेक्स असोसिएशन या रहिवाशी सोसायटीस त्री पक्षीय कराराद्वारे अभिहस्तांतरित करण्यासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1737/2024:-** **(कार्य.अभि.इमारत विभाग)** **(दि.27.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपुर्ण प्रकल्प जसे की, शहरातील विविध स्मारके, संग्रहालय, संशोधन केंद्रे, स्मशानभुमी इ.चा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन विकसीत करण्याकरीता औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (ASCDCL) या कार्यान्वयन यंत्रणेची महानगरपालिका पॅनलवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1453/2024 दि.28.06.2024 अन्वये प्रकल्प किंमतीच्या 1.50% मर्यादेत शुल्क विहीत करुन नियुक्ती करण्यास मान्यता प्राप्त आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अत्याधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञानाचा वापर करुन म्युझियम विकसीत करण्याच्या कामास शासन निर्णय क्रमांक/सावियो-2024/प्र.क्र.55/अजाक दि.14.03.2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार र.रु.25,66,19,567/- (18% जी.एस.टी.सह) इतक्या रक्कमेस शासनाची तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेतर्फे नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ASCDCL यांच्या मार्फत तयार करण्यात येऊन सदर विस्तृत प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक र.रु.25,66,14,431/- (18% जी.एस.टी.सह) यास राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाची अंतिम प्रशासकीय मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1632/2024 दि.05.10.2024 अन्वये प्राप्त मान्यतेनुसार सादर करण्यात आला आहे.

करीता, उक्त नमुद प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अत्याधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञानाचा वापर करुन म्युझीयम विकसीत करणे या प्रकल्पाकरीता विस्तृत प्रकल्प अहवाल आणि तद्नुषंगाने निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणेकरीता महानगरपालिका पॅनलवर नियुक्त ASCDCL या कार्यान्वियन यंत्रणेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन प्रकल्प किंमतीच्या म्हणजेच र.रु.25,66,14,431/- च्या 1.50% मर्यादेत म्हणजेच र.रु.38,49,216/- एवढे शुल्क अपेक्षित असुन यास मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1737/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अत्याधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञानाचा वापर करुन म्युझीयम विकसीत करणे या प्रकल्पाकरीता विस्तृत प्रकल्प अहवाल आणि तद्नुषंगाने निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणेकरीता महानगरपालिका पॅनलवर नियुक्त ASCDCL या कार्यान्वियन यंत्रणेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन प्रकल्प किंमतीच्या म्हणजेच र.रु.25,66,14,431/- च्या 1.50% मर्यादेत म्हणजेच र.रु.38,49,216/- एवढे शुल्क अपेक्षित असुन यास मंजुरी बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1738/2024:-</u> (गुंठेवारी विभाग)** **(दि.30.12.2024)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 दि.13.03.2021 रोजीच्या राजपत्रान्वये अंमलात आला. सदर अधिनियमाची अंमलबजावणी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने प्रस्ताव क्र.1585/ 2024 दि.13.09.2024 ने गुंठेवारी नियमितीकरणासाठी दर निश्चित केले. गुंठेवारी नियमिती करणासाठी 200.00 चौ.मी.क्षेत्रापर्यंतच्या निवासी वापराच्या मिळकतीसाठी फक्त विकास आकार (Betterment Charges) मध्ये 50% सवलत देणे बाबत ठराव क्र.1585/2024 दि.13.09.2024 नुसार पारीत करण्यात आला आहे. ही सवलत दि.31.12.2024 पर्यंत देण्यात आली आहे. सदर ठराव पारीत झाल्यानंतर नियमितीकरणासाठी गुंठेवारी प्रस्तावाच्या संख्येत मागील आर्थिक वर्ष 2023-24 च्या तुलनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असुन आजपावेतो एकुण 36.66 कोटी रुपये एवढा महसुल प्राप्त झाला आहे. सदर सवलत ही दि.31.12.2024रोजी संपुष्टात येत आहे. मिळकतधारकांचा वाढता प्रतिसाद पाहता मिळकतधारकांना नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने 200.00 चौ.मी.भुखंड क्षेत्रापर्यंतच्या निवासी वापरासाठी विकास खर्चात (Betterment Charges) मध्ये देण्यात येणारी 50% ची सवलत ही या आर्थिक वर्षात दि.31.03.2025 पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1738/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम-2001 (सुधारणा) 2021 अंतर्गत 200.00 चौ.मी.भुखंड क्षेत्रापर्यंतच्या निवासी वापरासाठी विकास खर्चात (Betterment Charges) मध्ये देण्यात येणारी 50% ची सवलत ही या आर्थिक वर्षात दि.31.03.2025 पर्यंत वाढविण्याच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1739/2024:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.30.12.2024)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योनोच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडी पासून शहरापर्यंतची योजनेची कामे सातारा देवळाई, पश्चिम, पुर्व व मध्य मतदार संघातील ड्रेनेज योजनेचे कामे इ.” या विवक्षित कामाकरीता मा.स्थायी समितीचा ठराव क्र.1454/2024 दि.28.06.2024 अन्वये कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2257 दि.01.07.2024 अन्वये श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना सेवा करार पध्दतीने अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.31.12.2024 रोजी संपलेली असुन

उक्त कामासाठी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याचा अभिप्राय शहर अभियंता यांनी दिलेला आहे.

करीता, श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडी पासून शहरापर्यंतची योजनेची कामे सातारा देवळाई, पश्चिम, मतदार संघातील ड्रेनेज योजनेचे कामे इ." या विवक्षित कामाकरीता दि.03.01.2025 ते दि.02.07.0.2025 या कालावधीसाठी आदेश दि.01.07.2024 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1739/2024:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.काशीनाथ मुरलीधर फालक, कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना "छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत समन्वयक म्हणुन काम करणे, शहरातील वितरण व्यवस्था व जायकवाडी पासून शहरापर्यंतची योजनेची कामे सातारा देवळाई, पश्चिम, मतदार संघातील ड्रेनेज योजनेचे कामे इ." या विवक्षित कामाकरीता दि.03.01.2025 ते दि.02.07.0.2025 या कालावधीसाठी आदेश दि.01.07.2024 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1740/2025:-</u> (यांत्रिकी विभाग)** **(दि.01.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 च्या धर्ती वर महाराष्ट्र राज्यामध्ये स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 ची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. या अभियानाअंतर्गत राज्यातील सर्व शहरे कचरा मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट असुन या अंतगत शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन व शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करणे समाविष्ठ आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.स्वमअ-2024/सीएन-853129 (25)/नवि-34 दि.04.10.2024 नुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस ट्रान्सफर स्टेशन उभारणी करण्यासाठी र.रु.32,04,43,965/- च्या निधीला मान्यता प्राप्त आहे. त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये एन-12 हडको, रमानगर, शिवाजीनगर, सेंट्रलनाका, चिकलठाणा, एमआयडीसी व कांचनवाडी इ.06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशनची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर 06 ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा उभारणी करण्याच्या दृष्टिने (स्थापत्य कामाशिवाय) दरपत्रके मागविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे.हायवा (इंडिया) प्रा.लि. | र.रु.3,79,77,180/- |
| 2. | मे.टीपीएस इन्फ्रास्ट्रक्चर लि. | र.रु.4,11,00,000/- |
| 3. | मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. | र.रु.4,37,08,970/- |
| 4. | मे.अकिशा इंजिनिअरींग सोल्युशन सर्व्हीसेस प्रा.लि. | र.रु.4,62,00,000/- |
| 5. | मे.गोविंदम इन्व्हायरो इंजिनिअरींग प्रा.लि. | र.रु.4,77,00,000/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे.हायवा (इंडिया) प्रा.लि.यांचे दर कमी असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत. सदरील दरपत्रकात प्रस्तावित प्रत्येक ठिकाणी खालील प्रमाणे यंत्रणा उभारणी करणे समाविष्ठ आहे.

1. Fixed Compactor-02 Nos.
2. Container Traversing Systems (for roll-on-roll-off)-02 Nos.
3. Truck Mounted Hookloader on 28 ton GVW Chasis-02 Nos.

4. Containers having 20 CuM capacity-04 Nos.

शहरामध्ये ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या कामासाठी प्राप्त न्युनतम दरपत्रकानुसार प्रत्येक ठिकाणी र.रु.3,79,77,180/- प्रमाणे प्रस्तावित 06 ठिकाणी र.रु.22,78,63,080/- खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवुन ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा उभारणी करण्यात येईल.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये विविध 06 ठिकाणी 1 वर्ष वारंटीसह ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या करीता र.रु.22,78,63,080/- रक्कमेचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1740/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये विविध 06 ठिकाणी 1 वर्ष वारंटी सह ट्रान्सफर स्टेशन यंत्रणा पुरवठा करणे, उभारणी करणे (स्थापत्य कामाशिवाय) या करीता र.रु.22,78,63,080/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1741/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.01.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेअंतर्गत तांत्रिक विभाग हा कार्यान्वयन व अंमलबजावणी करणारा विभाग असुन शहरातील विविध महत्वाच्या योजना, प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरीकांच्या तक्रारींचे निरसण करणे इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडते. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमुद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यांपैकी बहुतांश कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे महत्वपुण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्या साठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापने वर तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असुन तांत्रिक स्वरुपाची कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे. तसेच उक्त तांत्रिक कामे पुर्ण करण्यासाठी जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिकाऱ्यांची अत्यंत कमतरता भासत आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील शहर अभियंता विभागांतर्गत मंजुर रेखांकनातील स्वयं विकास पध्दतीने कामे करणे (Self Development) साठी स्थापित एक खिडकी योजनेची कामे करणे, विभागातील प्रशासकीय कामे करणे सुरु असुन या कामांसाठी अनुभवी उपअभियंत्याची आवश्यकता आहे. सध्या श्री.सुहास पुरुषोत्तम जोशी, उपअभियंता (स्थापत्य) हे काम करीत असुन ते दि.31.12.2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार असुन त्यांना तांत्रिक कामांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे – मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत – त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करतांना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीनकरण करता येणार नाही.

करीता, "शहर अभियंता विभागा अंतर्गत मंजुर रेखांकनातील स्वयं विकास पध्दतीने कामे करणे (Self Development) साठी स्थापित एक खिडकी योजनेची कामे करणे, विभागातील प्रशासकीय कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.सुहास पुरुषोत्तम जोशी, उपअभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमतः

06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्य पध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1741/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "शहर अभियंता विभागा अंतर्गत मंजुर रेखांकनातील स्वयं विकास पध्दतीने कामे करणे (Self Development) साठी स्थापित एक खिडकी योजनेची कामे करणे, विभागातील प्रशासकीय कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.सुहास पुरुषोत्तम जोशी, उपअभियंता (स्थापत्य) (सेवानिवृत्त) यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणुक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1742/2025:-** **(कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.01.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन अनुदान रस्ते प्रकल्प विभागाअंतर्गत औरंगाबाद शहरातील अमरप्रित हॉटेल (बाळासाहेब ठाकरे म्युरल चौक) ते एकता चौक रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे र.रु.6,49,79,353/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मान्यते अंती सदरील कामाचा कार्यदिश मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा 09.13% कमी दराने पारीत करण्यात आला आहे.

प्रस्तावित काम करत असतांना सदरील रस्त्यावरील सखल भागात पावसाचे पाण्यामुळे रस्ता खराब होण्याची शक्यता असल्यामुळे अशा ठिकाणी डांबरीकरण ऐवजी रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, डांबरीकरणाची आयुष्यमान वाढविण्याच्या दृष्टिने डांबरीकरणावर लिक्वीड सिलकोट करणे अस्तित्वा तील रस्ता दुभाजकास रंगकाम करणे इ.तत्सम कामे करणे करीता संबंधीत पी.एम.सी.यांच्या सह प्रत्यक्ष स्थळ पाहणी अंती सुचित केल्यानुसार तसेच सदरील बाबींचा समावेश मुळ अंदाज पत्रकात नसल्यामुळे सदरील कामांची पी.एम.सी.यांनी अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.50,84,470/- चे सादर केले आहे. सदरील बाबींवर होणारा खर्च या कामातील इतर बाबींच्या बचत रक्कमेतून मुळ मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादेतच करण्यात येणार आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे सदरील कामाच्या अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.50,84,470/- मान्यतेस्तव तथा मान्यतेअंती सदरील काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचेकडून मंजुर निविदा दर 9.13% कमी दराने करुन घेणेच्या कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1742/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सदरील कामाच्या अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक र.रु.50,84,470/- मान्यतेस्तव तथा मान्यतेअंती सदरील कामाचे मुळ कंत्राटदार मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे कडून मंजुर निविदा दर 9.13% कमी दराने करुन घेणेच्या कार्योत्तर मान्यतेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1743/2025:-** **(कर निर्धारक संकलक विभाग)** **(दि.01.01.2025)**

आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके अंतर्गत मालमत्ता कर पाणीपट्टी वसुली संबंधीत माहितीचे संकलन व मुल्यमापन करण्यासाठी Mobile Application For a Tax Collection (यापुढे टॅक्स ॲप) तयार करण्याची आवश्यकता होती. त्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने ठराव क्र.1633/2024 दि.07.10.2024

नुसार सुधारित अर्थसंकल्पात टॅक्स ॲप खरेदी करण्यासाठी र.रु.60.00 लक्ष एवढी तरतुद करण्यात आली आहे.

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव व अर्थसंकल्पातील तरतुदीच्या अधिन राहून निश्चित करण्यात आलेल्या Technical Evalution Matrix नुसार टॅक्स ॲप तयार करुन पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार (1) साई कॉम्प्युटर्स, (2) आरंभ इनोव्हेशन व (3) कोअर प्रोजेक्ट इंजिनियर्स एन्ड कन्स्लटंट अशा एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

सदर निविदाधारकांच्या सादरीकरणानंतर तांत्रिक गुणांकन करण्यात आले आहेत. तसेच गुणांचे फॉरम्युलेशन करुन तीनही निविदाधारकांची श्रेणी निश्चित करण्यात आली आहे. अंतिम गुणांकना नुसार (1) साई कॉम्प्युटर्स यांना 83.90, (2) आरंभ इनोव्हेशन यांना 86.1 आणि (3) कोअर प्रोजेक्ट इंजिनियर्स एन्ड कन्स्लटंट यांना 49.90 गुण मिळालेले आहेत.

आरंभ इनोव्हेशन यांना सर्वोच्च (एन-1) 86.1 गुण आहे. संबंधीत एजन्सीला Mobile Application For a Tax Collection विकसित करणे, पुरवठा करणे व पुढील तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती इ.निविदेत नमुद केलेल्या कामांकरीता र.रु.75.00 लक्षाची निविदा आरंभ इनोव्हेशन यांना देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1743/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता कर वसुली विभागासाठी टॅक्स ॲप विकसित करण्या करीता आरंभ इनोव्हेशन यांना सर्वोच्च (एन-1) 86.1 गुण आहे. संबंधीत एजन्सीला Mobile Application For a Tax Collection विकसित करणे, पुरवठा करणे व तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती इ.निविदेत नमुद केलेल्या कामांकरीता र.रु.75.00 लक्षाची निविदा आरंभ इनोव्हेशन यांना देण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1744/2025:-</u> (मुख्य पशुसंवर्धन विभाग)** **(दि.02.01.2025)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.रावसाहेब राणुजी जावळे, कनिष्ठ लिपीक, प्राणी संग्रहालय विभाग, मनपा, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वत:च्या आईच्या नामे राहीबाई राणुजी जावळे (मणक्याचा आजार) या आजारावर उपचारासाठी एम.आय.टी. हॉस्पीटल, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन र.रु.1,72,130/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष बहात्तर हजार एकशे तीस फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन (मणक्याचा आजार) या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.1,72,130/- इतका झाला असुन त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.67,940/- इतकी असुन 5% र.रु.8,606/- इतकी असुन एकुण र.रु.85,165/- संबंधीतास द्यावयाचे आहे.

संबंधीताने कमलनयन एम.आय.टी.हॉस्पीटल, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-2011/प्र.क्र. 333/1/राकवि-2, मंत्रालय, मुंबई -32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतीपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करिता श्री. रावसाहेब राणुजी जावळे, यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.85,165/- विशेष वाब म्हणून संबंधितास द्यावयाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1744/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.रावसाहेब राणुजी जावळे यांनी त्यांच्या स्वतःच्या आईच्या नामे. राहीबाई राणुजी जावळे (मणक्याचा आजार) आजारावर उपचारासाठी एम. आय.टी.हॉस्पिटल, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेतलेला आहे. एकुण केलेला खर्च र.रु.1,72,130/- इतका झाला

असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.67,940/- इतकी असून 5% र.रु.8,606/- इतकी असून एकुण र.रु.85,165/- संबंधीतास द्यावयाचे आहे.

करिता संबंधीतास अदा करावयाच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1745/2025:-** **(महिला व बाल कल्याण विभाग)** **(दि.02.01.2025)**

आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या अनुज्ञेय जागा जसे की, चौक, उद्यान, पटांगणे, उड्डाणपुला खालील ठिकाणे दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच सन्मानपूर्वक उपजिवीका करणे साठी जायंन्टस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर तर्फे आणि महानगरपालिकेतर्फे सहभाग व्हावा. असे आवाहन दि.05.11.2018 रोजीच्या बैठकीत मा.विभागीय आयुक्त व्दारे करण्यात आले होते. त्याअनुषंगाने दि.26.09.2024 रोजी जायंन्टस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर यांचे कडील प्राप्त निवेदनावर उपलब्धता आणि अनुज्ञेयता तपासून जायंन्टस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर यांना भाजीपाला, फळविक्री आणि दैनंदिन गरजा भागविणा-या वस्तू विक्रीसाठी दिव्यांग व्यक्तीस 3X3 मिटरचे छोटे तात्पूरते दुकान (कार्ट) बनवून देणेचा आणि त्याकरीता महानगरपालिका विनामुल्य जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो.

सदरील उपक्रमासाठी जायंन्टस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर डिझाइन व कार्ट तयार करण्याचा खर्च देईल, आणि आयुक्त महानगरपालिका ठरवेल त्याठिकाणी सुयोग्य जागा विनामुल्य उपलब्ध करुन देईल. तसेच दिव्यांग कक्ष महानगरपालिका यांचे मार्फत अंतिम झालेल्या दिव्यांगास सदरील कार्ट देण्यात येईल. या प्रस्तावानुसार 1. हेडगेवार हॉस्पीटल मागे मनपाच्या शाळेच्या संरक्षित भिंतीलगतची जागा आणि 2. संग्रामनगर मनपाच्या दवाखान्या जवळील जागा याचप्रमाणे व पुढील स्थळनिश्चीती आयुक्त महानगरपालिका यांचे मार्फत झाल्यानंतर व्दिपक्षीय सामंजस्य करार करण्यात येईल. करीता दोन्ही पक्षात नमूद अटी/शर्तीच्या अधिन राहून सामंजस्य करार करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1745/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिव्यांग कक्ष महानगरपालिका मार्फत अंतीम झालेल्या दिव्यांग व्यक्ती यांचे उदर्निवाहासाठी जायन्टस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर पायोनियर यांना प्रस्तावात नमुद दोन जागांसह व महानगरपालिकच्या अधिकार क्षेत्रातील विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या अनुज्ञेय जागा जसे की, चौक, उद्यान, पटांगणे, उड्डाण पुलाखालील आयुक्त महानगरपालिका यांनी स्थळनिश्चीत केलेल्या ठिकाणी 3 X 3 मिटरचे क्षेत्र जागा विनाशुल्क देण्यासाठी विहीत अटीशर्तीच्या अधिन राहून सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1746/2025:-** **( यांत्रिकी, पाणी पुरवठा विभाग)** **(दि.03.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजने वरील क्रांतीचौक पंपगृह (जायकवाडी) येथे 180 अ.श. क्षमतेचे एकुण 02 सेन्ट्रीफ्युगल पंप कार्यरत असुन या पंपाव्दारे गारखेडा येथील ESR भरणे तसेच सिंधी कॉलनी, बालाजीनगर व आकाशवाणी पर्यंतचा जालना रोड परिसर या भागात पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरील पंप सन 1978 पासून कार्यरत असुन या पंपांची 46 वर्षांची सर्व्हीस झाली आहे. त्यामुळे पंपांव्दारे मिळणारा डिस्चार्ज कमी होऊन एनर्जी लॉसचे प्रमाण वाढल्याने जास्तीचे वीज बिल येत आहे व पंपांची वारंवार दुरुस्ती करावी लागत असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच पंपांचे इम्पेलर घर्षनामुळे पूर्णतः खराब झाले असुन यामुळे पंप अचानक बंद होवून पाणी पुरवठा वितरण प्रणालीमध्ये व्यत्यय निर्माण होवु शकतो.

शहराचा पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता सद्यस्थितीतील पाणी पुरवठा प्रणाली सुस्थितीत कार्यान्वीत ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे उपरोक्त नमुद दोन 180 अ.श. सेन्ट्रीफ्युगल पंपांवरील भार कमी करण्याकरीता समान डिस्चार्ज असणारा एक नविन 150 अ.श.हॉरीझॉन्टल स्प्लीट केस सेन्ट्रीफ्युगल पंपसेट खरेदी करुन बसविणे आवश्यक आहे. जेणेकरुन नव्याने बसविण्यात येणारा पंप

जास्त काळ चालवून पुर्वीचे पंप स्टॅण्डबाय म्हणून वापरता येतील. याकरीता 150 अ.श. हॉरीझॉन्टल स्प्लीट केस सेन्ट्रीफ्युगल पंपसेट खरेदी करण्यासाठी नामांकीत कंपन्यामार्फत बजेटरी ऑफर्स मागवून अंदाजपत्रक तयार केले असता अंदाजपत्रकानुसार एकुण र.रु.26,25,236 + र.रु.4,72,542/- (18% GST) = र.रु.30,97,778/- खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च हा सन 2024-25 च्या अर्थसंकल्प "यंत्र देखभाल दुरुस्ती शहर" या लेखाशिर्षकाच्या तरतुदीतुन भागवावा लागेल.

करीता क्रांतीचौक पंपगृह (जायकवाडी) येथे 150 अ.श. हॉरोझॉन्टल स्प्लीट केस सेन्ट्रीफ्युगल पंपसेटचा पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे बाबत कामासाठी एकुण र.रु.30,97,778/- अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर. मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1746/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक पंपगृह (जायकवाडी) येथे 150 अ.श. हॉरीझॉन्टल स्प्लीट केस सेन्ट्रीफ्युगल पंपसेटचा पुरवठा करणे, बसविणे व यशस्वीरित्या चाचणी देणे बाबत कामासाठी एकुण र.रु.30,97,778/- अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1747/2025:-</u> (मालमत्ता विभाग)** **(दि.03.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा.स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी रिक्त असलेल्या 03 गाळ्यांची निविदा मागविण्यात आली. मागविण्यात आलेल्या निविदेत तांत्रिक बिडमध्ये 03 गाळांचे निविदा धारक पात्र झाले असून त्यांचे आर्थीक बिड खुले करण्यात आले त्याचा तपशील खालील प्रमाणे,

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>निविदा धारकाचे नांव</th><th>व्यापारी संकुलाचे नांव</th><th>दुकान क्र.</th><th>आधारभुत र.रु प्रती महा</th><th>निविदेत नमुद दर प्रतीमहा र.रु</th></tr>
<tr><td>1.</td><td>श्री. अजय विठ्ठल खोपे</td><td>जय टॉवर</td><td>01</td><td>रु.3000/-</td><td>रु.3,100/-</td></tr>
<tr><td>2.</td><td>श्री. अजय विठ्ठल खोपे</td><td>जय टॉवर</td><td>02</td><td>रु.3000/-</td><td>रु.3,100/-</td></tr>
<tr><td rowspan="2">3.</td><td>श्री अशोक देवराव साळवे</td><td rowspan="2">नाथ सुपर मार्केट</td><td rowspan="2">12</td><td rowspan="2">रु.13,700/-</td><td>रु.15,000/-</td></tr>
<tr><td>श्री अशोक देवराव साळवे</td><td>रु.14,000/-</td></tr>
</table>

उपरोक्त प्रमाणे आर्थीक बिड मध्ये सर्वाधिक दर नमुद करणारे निविदा धारक खालील प्रमाणे,

- श्री.अजय विठ्ठल खोपे यांचे जय टॉवर, व्यापारी संकुलातील गाळा क्र.01 साठी प्रती महा दर र.रु.3,100/-(जी.एस.टी.वगळून) प्राप्त झाले.
- श्री.अजय विठ्ठल खोपे यांचे जय टॉवर्स, व्यापारी संकुलातील गाळा क्र.02 साठी प्रती महा दर र.रु.3,100/- (जी.एस.टी. वगळून) प्राप्त झाले.
- श्री. सुमीत अशोक साळवे यांचे नाथ सुपर मार्केट, व्यापारी संकुलातील गाळा क्र.12 साठी प्रती महा दर र.रु.15,000/- (जी.एस.टी. वगळून) प्राप्त झाले.

त्याअनुषंगाने निविदेत नमुद सर्वाधिक प्रती महा दर नमुद करणारे निविदाधारक यांच्या सोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 03 वर्षाचा करारनामा करणेसाठीच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1747/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीचे विविध ठिकाणी रिक्त असलेल्या गाळ्यांची निविदेतील तांत्रिक बिड मध्ये पात्र निविदा धारकांचे आर्थीक बिड मधील खुले करण्यात आले त्यात सर्वाधिक दर नमुद करणाऱ्या निविदा धारकांचा तपशील खालील प्रमाणे.

- श्री.अजय विठ्ठल खोपे यांचे जय टॉवर, व्यापारी संकुलातील गाळा क्र.01 साठी प्रतीमाह दर र.रु.3,100/-(जी.एस.टी. वगळून) प्राप्त झाले.
- श्री.अजय विठ्ठल खोपे यांचे जय टॉवर्स, व्यापारी संकुलातील गाळा क्र.02 साठी प्रतीमाह दर र.रु.3,100/-(जी.एस.टी. वगळून) प्राप्त झाले.

- श्री.सुमीत अशोक साळवे यांचे नाथ सुपर मार्केट, व्यापारी संकुलातील गाळा क्र.12 साठी प्रतीमाह दर र.रु.15,000/- (जी.एस.टी.वगळून) प्राप्त झाले.

उपरोक्त प्रमाणे निविदेत सर्वाधिक प्रती दर नमुद करणाऱ्या निविदा धारकासोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 03 वर्षांचा करारनामा करणेसाठी मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1748/2025:- (मालमत्ता विभाग)** **(दि.03.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा. स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकीस 75/25 टक्के विकास योजना आरक्षाणतून रिलायन्स मॉल इमारत मधील रिक्त 03 हॉलसाठी निविदा मागविण्यात आलेली आहे. त्यात तळमजल्यावरील पुर्व बाजूस आलेल्या हॉलसाठी दोन निविदा धारकांनी सहभाग घेतला असून त्याचा तपशील खालील प्रमाणे,

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | प्राप्त निविदा | आधारभुत रक्कम | निविदेत नमुद दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. किरण बाबासाहेब पारधे | 02 | रु.39,910/- | रु.41,234/- |
| 2. | श्रीमती शेख शाहीन शेख अखिल | | | रु.40,110/- |

उपरोक्त प्रमाणे रिलायन्स मॉल येथील तळमजल्यावरील पुर्व बाजूस असलेल्या हॉलसाठी श्री.किरण बाबासाहेब पारधे यांची प्रती महा सर्वाधिक दर र.रु.41,234/- (जी.एस.टी. वगळून) ची निविदा प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने निविदेच्या अटी/शर्ती प्रमाणे 10 वर्षाचा करारनामा करणे साठीच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1748/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिलायन्स मॉल येथील तळमजल्यावरील पुर्व बाजूस असलेल्या हॉलसाठी श्री.किरण बाबासाहेब पारधे यांनी निविदेत सर्वाधिक प्रती महा दर र.रु.41,234/-(जी.एस.टी. वगळून) नमुद केले आहे. त्याअनुषंगाने श्री.किरण बाबासाहेब पारधे यांच्यासोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 10 वर्षाचा करारनामा करणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1749/2025:- (कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.03.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, किलेअर्क येथील करुणा बौध्दविहार व श्री.सुधाकरराव भुईगळ सामाजिक सभागृहाचे नुतनीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-2023 नुसार र.रु.74,98,557/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील कामास सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मधील विकास योजने अंतर्गत भूखंड संरक्षण या लेखाशिर्ष अंतर्गत र.रु.75.00 लक्ष तरतूद उपलब्ध करुन देणेसह सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.74,98,557/ मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1749/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किलेअर्क येथील करुणा बौध्दविहार व सुधाकरराव भुईगळ सामाजिक सभागृहाचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी सुधारित अर्थसंकल्प 2024-25 मध्ये र.रु.75.00 लक्ष तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत असून या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.74,98,557/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1750/2025:- (कार्यकारी अभियंता विद्‌युत विभाग)** **(दि.03.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत गुलमंडी येथील जेथलिया टॉवर जवळ असलेल्या विद्‌युत उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी व वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहेत. विशेषतः गुलमंडी ते दिवाण देवडी रोड, गुलमंडी ते टिळकपथ जाणारा रोड व जेथलिया टॉवर ते दलालवाडी रोड या मार्गावर वीज वाहिनीच्या ताणामुळे रहदारीला अडचण निर्माण होऊ लागली आहे.

सदर अंदाजपत्रकाच्या कामासाठी महावितरण कंपनीने निर्धारित केलेली र.रु.५६,८१.२९२/- असून, या कामासाठी सुसंगत तांत्रिक आणि वित्तीय प्रस्ताव तयार केले आहेत. यामध्ये वीज वाहिनींचे सुरक्षित स्थलांतर, जोडणीची नवीन व्यवस्था, तसेच आवश्यक सुधारणा आणि सुरक्षेसाठी लागणारी सामग्री यांचा समावेश आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र.जिनिस/जिवायो/2023-24/778 दि.14.02.2024 अंतर्गत जिल्हयातील नागरी क्षेत्रातील सेवा सुविधांसाठी विशेष अतिरीक्त नियतव्यय तरतुद प्रस्तावित करण्यात आलेले आहे व यासाठी र.रु.7 कोटीचा निधी प्राप्त झालेला आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत विकसीत होत असणा-या रस्त्यांच्या मध्ये अडथळा निर्माण करणारे डि.टी.सी.स्थंलातरीत करण्याचे काम महानगरपालिकेतर्फे म.रा.वि.वि. कंपनीस 1.3% देखरेख शुल्क भरणा करण्यात येणार आहे. त्यानुसार गुलमंडी येथील जेथलिया टॉवर जवळ असलेल्या विद्‌युत उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या कामाबाबत म.रा.वि.वि.कंपनीकडून 1.3% Supervision Charges अंतर्गत अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

तरी र.रु.56,81,292/- चा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1750/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील स्मार्ट सिटी अंतर्गत नविन रस्त्यामध्ये अडथळा ठरणारे गुलमंडी येथील जेथलिया टॉवर जवळ असलेल्या विद्‌युत उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या त्वरीत शिफ्ट करण्यासाठी रक्कम अंदाजपत्रकीय र.रु.56,81,292/- रुपये सर्वानुमते मान्यता देण्यात येते, मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1751/2025:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.06.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा. स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालकेस 75/25 टक्के विकास योजना आरक्षाणत प्राप्त रिलायन्स मॉल इमारत मधील वाहनतळाची निविदा मागविण्यात आलेली होती. त्यात तीन निविदा धारकांनी सहभाग घेतला होता, त्यातील काझी आफरीन हे तांत्रीक बिडमध्ये अपात्र झाल्या असून उर्वरीत दोन निविदा धारकांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | प्राप्त निविदा | आधारभुत रक्कम | निविदेत नमुद दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | श्रीमती शेख शाहीन शेख अखिल | 02 | रु.1,44,000/- | रु.1,50,000/- |
| 2. | श्री. किरण बाबासाहेब पारधे | | | रु.1,47,000/- |

उपरोक्त प्रमाणे रिलायन्स मॉल येथील वाहनतळासाठी श्रीमती शेख शाहीन शेख अखिल यांची सर्वाधिक वार्षीक दर र.रु.1,50,000/- (जी.एस.टी.वगळून) ची निविदा प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे श्रीमती शेख शाहीन शेख अखिल यांच्यासोबत तीन वर्षाचा करारनामा करणेसाठीच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1751/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रिलायन्स मॉल येथील वाहनतळसाठी श्रीमती शेख शाहीन शेख अखिल यांनी निविदेत सर्वाधिक वार्षीक दर र.रु.1,50,000/- नमुद केले आहे. त्याअनुषंगाने श्रीमती शेख शाहीन शेख अखिल यांच्यासोबत निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे तीन वर्षाचा करारनामा करणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1752/2025:-** **(मालमत्ता विभाग)** **(दि.07.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा. स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या

मालकीचे असलेले नेहरु भवन छत्रपती संभाजीनगर येथील स्वअर्जीत धर्तीवर महानगरपालिकेतर्फे गाळे, ॲन्कर शॉप, कार्यालये बांधण्यात येत आहे. सदर ठिकाणी असलेल्या तळमजला व पहिल्या मजल्यावरील गाळ्यांची व ॲन्कर शॉपची निविदा मागविण्यात आली होती.

मागविण्यात आलेल्या निविदेतील आर्थीक लिफाफा खुला केला असता प्राप्त दर खालील प्रमाणे,

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | गाळा क्रमांक | निविदा प्राप्त संख्या | आधारभुत र.रु. | निविदेत नमुद दर र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | सय्यद नोमान नवीद अख्तर | 16 | 01 | रु.19,46,512/- | रु.20,00,000/- |
| 2. | सय्यद नोमान नवीद अख्तर | 17 | 01 | रु.20,48,960/- | रु.21,00,000/- |

- गाळा क्र.16 साठी सय्यद नोमान नवीद अख्तर यांनी सर्वाधिक दर र.रु.20,00,000/- निविदेत नमुद केले आहे.
- गाळा क्र.17 साठी सय्यद नोमान नवीद अख्तर यांनी सर्वाधिक दर र.रु.21,00,000/- निविदेत नमुद केले आहे.

त्याअनुषंगाने निविदेत नमुद सर्वाधिक बोलीधारकास निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 30 वर्षाचा करारनामा करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1752/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु भवनसाठी मागविण्यात आलेल्या निविदेत खालील निविदा धारकांनी सर्वाधिक दर नमुद केले आहेत.

- गाळा क्र.16 साठी सय्यद नोमान नवीद अख्तर यांनी सर्वाधिक दर र.रु.20,00,000/- निविदेत नमुद केले आहे.
- गाळा क्र.17 साठी सय्यद नोमान नवीद अख्तर यांनी सर्वाधिक दर र.रु.21,00,000/- निविदेत नमुद केले आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त सर्वाधिक दर नमुद करणाऱ्या निविदाधारकास निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे 30 वर्षाचा करारनामा करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1753/2025:-</u> (कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.07.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, साकेतनगर, पेठेनगर भावसिंगपुरा येथे असलेला अस्तित्वातील उंचावरील जलकुंभ सन 1987 मध्ये बांधलेला असुन 1.5 लक्ष लिटर क्षमतेचा आहे. सदर जलकुंभ निष्काषीत करणे बाबत येथील नागरीकांना निवेदन देऊन विनंती केलेली आहे. हा जलकुंभ मागच्या 25 वर्षापासुन वापरात नाही. सदर जलकुंभ सध्या जिर्ण स्थितीत आहे. सदर जलकुंभ पडल्यास जिवीत हानी होऊ शकते. तसेच सद्यास्थितीत शहराकरीता सुरु असलेल्या वाढीव पाणी पुरवठा योजनेमध्ये सुध्दा या जलकुंभाचा भविष्यात वापर करण्यात येणार नाही. त्यामुळे सदर जलकुंभ निष्काषीत करणे योग्य होईल.

करीता साकेतनगर, पेठेनगर भावसिंगपुरा येथे असलेला जुना व जिर्ण झालेला उंचावरील जलकुंभ निष्काषीत करण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1753/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, साकेतनगर, पेठेनगर भावसिंगपुरा येथे असलेला 1.5 लक्ष लिटर क्षमतेचा जुना व जिर्ण झालेला उंचावरील जलकुंभ निष्काषीत करण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1754/2025:-</u> (कार्यकारी अभियांता रस्ते विभाग)** **(दि.07.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबादच्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या सिडको मंजूर रेखांकनातील 11 मीटर रुंद रस्त्याचे जालना रोड ते मा.उच्च न्यायालयाचे पुर्व बाजुचे मुख्य गेट पर्यंत मा.न्यायालयाच्या जागेत 07 मी रुंदीकरणाचे काम कॉंक्रीट रस्ता व कंपाऊड वॉलसह करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022 2023 नुसार र.रु.2,65,24,900/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारा

खर्च हा "अर्थसंकल्प सन 2024-25 मधील मंजुर रेखांकनात सुविधा पुरविणे पृष्ठ क्र. इ-28 अ.क्र.3(i) तरतुद र.रु.39.50 कोटी" मधुन प्रस्तावित आहे.

तरी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबादच्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या सिडको मंजुर रेखांकनातील 11 मीटर रुंद रस्त्याचे जालना रोड ते मा. उच्च न्यायालयाचे पूर्व बाजुचे मुख्य गेट पर्यंत मा.न्यायालयाच्या जागेत 07 मी रुंदीकरणाचे काम कॉंक्रीट रस्ता व कंपाऊड वॉलसह करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.2,65,24,900/- ला मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा. सर्व साधारण सभे समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर. मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1754/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबादच्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या सिडको मंजुर रेखांकनातील 11 मीटर रुंद रस्त्याचे जालना रोड ते मा. उच्च न्यायालयाचे पूर्व बाजुचे मुख्य गेट पर्यंत मा.न्यायालयाच्या जागेत 07 मी रुंदीकरणाचे काम कॉंक्रीट रस्ता व कंपाऊड वॉलसह करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.2,65,24,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1755/2025:-</u> (भांडार विभाग)** **(दि.08.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करण्याच्या संदर्भाने निविदा क्र.2024_AMCA 1120639_1 नुसार निविदा मागविण्यात आली. प्रथम वेळेस तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त तीन निविदाधारकांपैकी एकच निविदाधारक मे. संतोष रद्दी मार्ट (L1) यांना पात्र ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधिताचे प्राप्त निविदेतील दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | प्रमाण | मे.संतोष रद्दी मार्ट यांचे निविदेतील प्राप्त दर सर्व करांसाहित |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | वर्तमान पेपर रद्दी विक्री | प्रती किलो | 15.00 |
| 2 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईज (पांढरा कागद) | प्रती किलो | 12.50 |
| 3 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईज (पिवळा कागद [बांदा, फाईल पेंड ई.]) | प्रती किलो | 7.00 |

प्राप्त निविदेतील कमी दराच्या अनुषंगाने केंद्रीय खरेदी समिती समक्ष दि.01.01.2025 रोजी मे.संतोष रद्दी मार्ट यांच्या सोबत दर वाटाघाटी करण्यात आली. दर वाटाघाटी समिती समोर पुरवठा धारकाने लेखी संमती पत्र देवून वाटाघाटी अंती मंजूर दराने नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र पेपर रद्दी खरेदी करण्यास तयार असल्याबाबत पत्र दिलेले आहे. त्यानुसार केंद्रीय खरेदी समितीने खालील दरानुसार निविदा स्विकृतीस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | प्रमाण | मे.संतोष रद्दी मार्ट यांचे निविदेतील प्राप्त दर सर्व करांसाहित | वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | वर्तमान पेपर रद्दी विक्री | प्रती किलो | 15.00 | 15.50 |
| 2 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईज (पांढरा कागद) | प्रती किलो | 12.50 | 13.00 |
| 3 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईज (पिवळा कागद [बांदा, फाईल पेंड ई.]) | प्रती किलो | 7.00 | 7.00 |

केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केल्यानुसार स्तंभ 5 मध्ये दर्शविलेल्या दरानुसार नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करणेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. करीता पुरवठादार मे.संतोष रद्दी मार्ट यांचे वाटाघाटी अंती मंजूर केलेल्या दरानुसार नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करण्याचा निविदा स्विकृतीचा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1755/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करण्याच्या संदर्भाने निविदा क्र.2024_AMCA 1120639_1 निविदा मागविण्यात आली. प्राप्त तीन निविदा धारकांपैकी एकच निविदाधारक मे.संतोष रद्दी मार्ट (L1) यांना पात्र ठरविण्यात आलेले आहे त्यानुसार केंद्रीय खरेदी समितीने खालील दरानुसार निविदा स्विकृतीस शिफारस केली आहे. मान्यता देण्यात येते.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | प्रमाण | मे.संतोष रद्दी मार्ट यांचे निविदेतील प्राप्त दर सर्व करांसाहित | वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| 1 | वर्तमान पेपर रद्दी विक्री | प्रती किलो | 15.00 | 15.50 |
| 2 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईज (पांढरा कागद) | प्रती किलो | 12.50 | 13.00 |
| 3 | जुने व नष्ट करावयाचे अभिलेखे, A-4 साईण (पिवळा कागद [बांदा, फाईल पेंड ई.]) | प्रती किलो | 7.00 | 7.00 |

केंद्रीय खरेदी समितीने शिफारस केल्यानुसार स्तंभ 5 मध्ये दर्शविलेल्या दरानुसार नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करणेस मंजूरी प्रदान करण्यात येते. तसेच पुरवठादार मे.संतोष रद्दी मार्ट यांचे वाटाघाटी अंती मंजूर केलेल्या दरानुसार नष्ट करावयाचे अभिलेखे आणि वर्तमानपत्र विक्री करण्याचा निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्य करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1756/2025:-** **(कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.08.01.2025)**

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.1,65,996/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,49,396/- आहे. त्यापैकी 5% र.रु.9,431/- (एकुण दाखल केलेलेदेयक र.रु.1,88,628/-च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,39,965/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणचाळीस हजार नऊशे पासष्ठ फक्त) देय आहे.

सदरल आजार (ॲन्जीओग्राफी/ॲन्जीओप्लास्टी) या शासन मान्य आकस्मिक आजारामध्ये येतो. परंतु उपचार केलेले रुग्णालय शासनमान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादी समाविष्ठ नाही.

त्यामुळे संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहुन र.रु.1,00,000/- मंजुर करण्यात येऊन 5% र.रु.5,000/- महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित देय र.रु.95,000/- अदा करण्यास आरोग्य वैद्यकीय आधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

तथापि, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी जा.क्र./मनपा/आस्था-1/2024/ 3312 दि.12.09.2024 अन्वये आदेशित केल्याप्रमाणे अतिरीक्त आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना कर्मचारी/अधिकारी यांची वैद्यकीय उपचाराकरीतर अग्रिम व वैद्यकीय देयक र.रु.1.50 लक्ष पर्यंत मंजुर करणे बाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत व र.रु.1.50 वरील वैद्यकीय देयकांसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती सिद्दीकी हिना कौसर अ.समी., शिक्षणसेवक, केंद्रीय प्राथमिक शाळा किराडपुरा नं.-1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्च अदा करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1770/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सिद्दीकी हिना कौसर अ,समी.,शिक्षणसेवक, केंद्रीय प्राथमिक शाळा किराडपुरा नं.-1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या पतीच्या (हृदयविकार) या आजारपणावर ॲपल हॉस्पिटल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केला असुन संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1771/2025:-</u> (शिक्षण विभाग)** **(दि.20.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती प्रतिभा पुरुषोत्तम गावंडे, सहशिक्षिका, केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी स्वत:च्या मुलाच्या (ताप/कावीळ) या आजारपणावर हायटेक आधार हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर युनिट, छत्रपती संभाजीनगर येथे दि.22.05.2024 ते दि.03.06.2024 या कालावधीत उपचार केला असून त्यासाठी एकुण र.रु.1,59,590/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणसाठ हजार पाचशे नव्वद फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.1,29,620/- असुन सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,16,658/- आहे. त्यापैकी 5% र.रु.8,479/- (एकुण दाखल केलेलेदेयक र.रु.1,69,590/-च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,08,179/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष आठ हजार एकशे एकोणऐंशी फक्त) देय आहे.

सदरल आजार (तीव्र उदर वेदना, रक्तासंबंधचे आजार) या शासन मान्य आकस्मिक आजारामध्ये येतो. परंतु उपचार केलेले रुग्णालय शासनमान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादी समाविष्ठ नाही.

त्यामुळे संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहुन र.रु.1,00,000/- मंजुर करण्यात येऊन 5% र.रु.5,000/- महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित देय र.रु.95,000/- अदा करण्यास आरोग्य वैद्यकीय आधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

तथापि, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी जा.क्र./मनपा/आस्था-1/2024/ 3312 दि.12.09.2024 अन्वये आदेशित केल्याप्रमाणे अतिरीक्त आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना कर्मचारी/अधिकारी यांची वैद्यकीय उपचाराकरीता अग्रिम व वैद्यकीय देयक र.रु.1.50 लक्ष पर्यंत मंजुर करणे बाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. व र.रु.1.50 वरील वैद्यकीय देयकांसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्रीमती प्रतिभा पुरुषोत्तम गावंडे, सहशिक्षिका, केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून प्रत्यक्ष देय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्च अदा करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1771/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती प्रतिभा पुरुषोत्तम गावंडे, सहशिक्षिका, केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी स्वतःच्या मुलाच्या आजार पणावर हायटेक आधार हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर युनिट, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केला असुन संबंधीतास शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1772/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.21.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.107 अंतर्गत पैठणरोड पासुन श्री.अट्टल यांच्या घरासमोरील साई आरो अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.49,97,344/- चे अंदाजपत्रक SSR 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे.

उक्त नमुद भागातील रस्ता हा मातीचा असल्यामुळे नागरीकांना रस्त्यांची मुलभुत सोय उपलब्ध करण्यासाठी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे.सदर अंदाजपत्रकात रस्त्याचे मजबुतीकरण करुन कॉंक्रीटीकरण करण्याचे काम प्रस्तावित आहे. सदरील कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 अंतर्गत पृष्ठ क्र. E-28 वरील मंजुर रेखांकनात मुलभुत सुविध पुरविणे (रस्ते) या लेखाशिर्ष अंतर्गत अ.क्र.03(i) वर र.रु.187.00 लक्ष तरतुद मधुन करता येईल.

करीता, वॉर्ड क्र.107 अंतर्गत पैठणरोड पासुन श्री.अट्टल यांच्या घरासमोरील साई आरो अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचा र.रु.49,97,344/- चा अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1772/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.107 अंतर्गत पैठणरोड पासुन श्री.अट्टल यांच्या घरा समोरील साई आरो अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचा र.रु.49,97,344/- चा अंदाजपत्रक मंजुरीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1773/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.21.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विविध विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी दि.24.03.2023रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन दि.05.04.2023 रोजी मुलाखती घेण्यात येऊन खालील पात्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची त्यांच्या नावा समोर दर्शविलेल्या विवक्षित कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र.764 दि.17.04.2023 नुसार कार्यालयीन

आदेश दि.20.04.2023 मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून 06 महिन्यांच्या कालावधी करीता सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती. तद्रंतर कामाची निकड लक्षात घेऊन पुनःश्च 06 महिन्यांसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | नियुक्त उमेदवारांचे नाव व पदनाम | कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | श्री.फारुख कमाल मो.अ.रशीद सिद्दीकी कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 1) जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/ 571 दि.20.04.2023<br>2) जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/ 1732 दि.07.11.2023<br>3) जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/ 2201 दि.25.06.2024 | विद्युत विभागाअंतर्गत निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे कार्यादेशा बाबतची कामे इ.दैनंदिन तांत्रिक कामांवर देखरेख करणे |

श्री.फारुख कमाल मो.अ.रशीद सिद्दीकी,कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांची रकाना क्र.3 मधील अ.क्र.3 च्या आदेशाची मुदत दि.08.11.2024 रोजी संपत असुन त्यांची वयाची 65 वर्षे पुर्ण झालेली आहे.

तथापि, शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/ 13 दि.17.12.2016 मधील मुद्दा क्र.8 नुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील. तथापि, ज्या व्यक्तीच्या सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे. असे मत असले त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या/प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 70 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील. असे नमुद आहे.

शहर अभियंता यांनी संबंधीतांची MSEDCL व CSMS दरम्यान समन्वय ठेऊन काम करुन घेण्यस मदत होत असल्याने त्यांच्या सेवा आवश्यक असल्याने मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे.

करीता, श्री.फारुख कमाल मो.अ.रशीद सिद्दीकी,कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांना उक्त तक्त्या तील रकाना क्र.4 मध्ये दर्शविलेल्या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने दि.24.03.2023 रोजी च्या जाहिरातीमध्ये व दि.20.04.2023 रोजीच्या कार्यालयन आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.11.11.2024 पासुन ते दि.09.04.2025 पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1773/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.फारुख कमाल मो.अ.रशीद सिद्दीकी,कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांना उक्त तक्त्यातील रकाना क्र.4 मध्ये दर्शविलेल्या विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने दि.224.03.2023 रोजीच्या जाहिरातीमध्ये व दि.20.04.2023 रोजीच्या कार्यालयन आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.11.11.2024 पासुन ते दि.09.04.2025 पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1774/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारी करण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळूज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक पर्यटन, व्यावसायीक दृष्ट्या शहर व शहरालगत वाहतुक रहदारी वाढली आहे. यामुळे महानगरपालिका हद्दीतील विकास योजना रस्ते विकसित करणे गरजेचे ठरत आहे.

यापुर्वी विधानसभा पश्चिम मतदार संघातील वाढती नागरी वसाहत पाहता, या भागातील एकुण 34 सिमेंट कॉंक्रीट/डांबरी रस्त्याचे कॅरिज-वे बांधणे आणि आवश्यक एकुण 06 ठिकाणी नव्याने

आर.सी.सी.बॉक्स कल्व्हर्ट बांधणेच्या प्रकल्पाचे, प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक र.रु.204.54 कोटी (18% जी.एस.टी.सह) चे तयार करुन यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1411/2024 दि.10.06.2024 अन्वये मान्यता व विधानसभा पुर्व व मध्य मतदार संघातील वाढती नागरी वसाहत पाहता, या भागातील एकुण 28 सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे कॅरिज-वे बांधणे आणि आवश्यक एकुण 58 ठिकाणी नव्याने आर.सी.सी.बॉक्स कल्व्हर्ट बांधणेच्या प्रकल्पाचे, प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक र.रु.111.285 कोटी (18% जी.एस.टी.सह) चे तयार करुन यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1412/2024 दि.10.06.2024 अन्वये मान्यता घेण्यात येऊन उक्त नमुद दोन्ही प्रकल्पास निधी उपलब्ध होणेसाठी शासनास पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.

तथापि, उक्त नमुद प्रकल्पांकरीता शासनाकडून निधी उपलब्ध झालेला नसल्यामुळे उक्त नमुद प्रकल्पातील सातारा-देवळाई, नक्षत्रवाडी, कांचनवाडी, ईटखेडा, पडेगाव, मिटमिटा, भावसिंगपुरा इ. भागातील (30 मी.,24 मी.,18 मी.,15 मी.,12मी.,09 मी.मंजुर वि.यो.रुंदी) प्रामुख्याने करावयाच्या उक्त नमुद मंजुर प्रस्तावातील व नव्याने समाविष्ठ करावयाचे एकुण 24 विकास योजना रस्त्यांचे (आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट व पुल बांधकामासह) कामाचे स्वतंत्र प्रकल्प अहवाल/अंदाजपत्रके तयार करुन या प्रकल्पाकरीता शासन निधी मागणी करण्याचे महानगरपालिकेच प्रयोजन आहे.

या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील सातारा-देवळाई परिसर, नक्षत्रवाडी, ईटखेडा, भावसिंगपुरा, पडेगाव, मिटमिटा इ.भागातील वाढते रहिवाशी क्षेत्र लक्षात घेऊन नागरीकांच्या हिताच्या दृष्टिने सुलभ वाहतुक रहदारीच्या दृष्टिने रोड नेटवर्क बळकट करण्याकरीता मंजुर विकास योजना आराखड्यानुसार या भागातील 24 मी.रुंद वि.यो.रस्ता (2x7.5 मी.),18 मी.रुंद वि.यो.रस्ता (1x9 मी.),15 मी.रुंद वि.यो.रस्ता(1x7 मी.)12 मी.रुंद वि.यो.रस्ता(1x7मी./5.5मी.) व महानुभाव आश्रम चौक, पैठणरोड ते मनपा हद्दीपर्यंत देवळाई चौक मार्गे 12 मी.रुंद सेवा रस्ता दोन्ही बाजुने 7.5 मी.रुंद व मा.उच्च न्यायालय ते मुकूंदवाडी पोलीस स्टेशन ते म्हाडा कॉलनी, सिडको या 12 मी.रुंद सेवा या रस्त्यांचे उपलब्ध लांबी व रुंदीनुसार कॅरिजये विकसित करण्याचे नियोजन असून भविष्यात निधी उपलब्धतेच्या अधीन राहून सदर विकास योजना नुसार रुंदीकरणासह विकसित करण्यात येतील.

सदर कामाचा प्रस्ताव हा प्रकल्पीय स्वरुपाचा असल्यामुळे महानगरपालिका पॅनलवर नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पी.एम.सी.) यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी. यांच्या मार्फत प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रके (PWD SSR 2022-23 & MJP DSR 2023-24) नुसार रक्कम रु.2,30,15,25,031/- (18% जी.एस.टी.सह) चे तयार करुन घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकांमध्ये Royalty, Testing Charges, 1% Insurance, 1.50% PMC Charges, 1% TPTA Charges, 3% Contingency Charges इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पामध्ये एकूण 25 विकास योजना रस्त्यांचा समावेश असून उक्त नमूद नुसार डांबरी/कॉंक्रीटद्वारे कॅरिज-वे विकसित करणे, तसेच काही ठिकाणी अस्तित्वातील जुने नळकांडी पुल जिर्ण झाल्यामुळे या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य होत नसल्यामुळे नव्याने आर.सी.सी. बॉक्स कल्वर्हट बांधणे/ पुल बांधणे इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावित कामांचा संक्षिप्त तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | लांबी(मी.) | रुंदी (मी.) | अं.प.र.रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | गट नं.101 येथील कादरी दवाखाना ते कत्तलखाना या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे डांबरीकरण करणे व आर.सी.सी. बॉक्स कल्वर्हट बांधणे. | 1900 | 2 X 7.5 | 18,82,68,303.00 |
| 2. | वसंत विहार, अग्रसेन विद्या मंदिर ते पैठण रोडला जोडणाऱ्या 24 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 600 | 2 X 7 | 5,72,50,642.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | पैठण रोड ते गोल्डन सिटी हॉस्पिटल ते दिशा संस्कृती या 60 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 750 | 2 X 7.5 | 8,98,36,650.00 |
| 4. | बीड बायपास ते गट नं.130 देवळाई येथील 15 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 700 | 7 | 3,07,15,708.00 |
| 5. | देवळाई येथील गट नं.100 ते गट नं.110 पर्यंतच्या 15 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे, | 700 | 7 | 3,07,15,708.00 |
| 6. | वार्ड क्र.15 मिटमिटा अंतर्गत देवगिरी व्हॅली येथील 12 मी. व 09 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 940 | 7& 5.5 | 2,70,54,950.00 |
| 7. | वार्ड क्र.115 सातारा गाव अंतर्गत बीड बायपास अथर्व क्लासिक ते संग्रामनगर पुला पर्यंतच्या 15 मी. रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे व आर.सी.सी. पावसाळी गटार बांधणे. | 1080 | 9 | 5,60,68,066.00 |
| 8. | महानुभाव आश्रम चौक, पैठण रोड ते महानगरपालिका हद्दीपर्यंत देवळाई चौक मार्गे पर्यंतच्या 12 मी.रुंद सर्व्हिस रोडचे (दक्षिण व उत्तर बाजू) सिमेंट कॉँक्रीट करणे, | 14200 | 2X7.5 | 59,91,86,404.00 |
| 9. | वार्ड क्र.14 पडेगांव अंतर्गत मुंबई-नाशिक हायचे ते सायली कॉलेज पर्यंतच्या 12 मी. रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 700 | 5.5 | 2,20,36,996.00 |
| 10. | वखार महामंडळ वेअर हाऊस, बीड बायपास या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे 36 मी.रुंद विकास योजना रस्त्यापर्यंत (नाथ व्हॅली रोड) डांबरीकरण करणे व पुल बांधणे. | 1150 | 2X7.5 | 13,75,61,423.00 |
| 11. | झोन क्र.०२ अंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले चौक औरंगपूरा ते सावरकर चौक, समर्थनगर मार्गे बाबुराव काळे चौक, निराला बाजार पर्यंतच्या 24 मी. रुंद वि. यो. रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 850 | 2X7.5 | 6,11,02,903.00 |
| 12. | झोन क्र.02 अंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले चौक औरंगपूरा ते मिलकॉर्नर पर्यंतच्या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 1050 | 2X7.5 | 7,56,42,705.00 |
| 13. | मा.उच्च न्यायालय ते मुकुंदवाडी पोलीस स्टेशन ते म्हाडा कॉलनी, सिडको पर्यंतच्या 15 मी.रुंद सेवा रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 3910 | 7.5 | 14,03,75,352.00 |
| 14. | बिएसएनएल ऑफिस ते जालना रोड या 15 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट कॉँक्रीट करणे. | 290 | 7 | 75,93,744.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15. | सोलापुर हायवे ते सातारा तांडा वस्ती मार्गे गट नं.238 व 246 या 24 मी. रुंद वि.यो. रस्त्याचे डांबरीकरण करणे व पुल बांधणे. | 1700 | 2X3.5 | 8,82,14,266.00 |
| 16. | चंपा चौक ते जालना रोड या 30 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे व आर.सी.सी.बॉक्स कल्वर्हट बांधणे. | 1400 | 2X7.5 | 11,34,61,819.00 |
| 17. | सातारा परिसरातील आमदार रोड ते दिशा नगरी पाठीमागील 36 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे, | 680 | 7 | 2,80,79,174.00 |
| 18. | गुरुकुल शाळा ते शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग पर्यंतच्या 12 मी.रुंद सेवा रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे व आर.सी.सी.बॉक्स कल्व्हर्ट बांधणे. | 1920 | 7 | 15,81,36,332.00 |
| 19. | मिटमिटा येथील गट नं.138, 139 व 155 भागातील 15 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे डांबरी करण करणे. | 800 | 7.5 | 3,52,60,224.00 |
| 20. | योहान हाऊसिंग सोसायटी, पडेगाव येथील गट नं.59, 62 व 63 अंतर्गत 15 मी. रुंद वि. यो. (एल-आकार) रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 1200 | 7.5 | 5,82,19,824.00 |
| 21. | पडेगाव येथील गट नं.59 ते गट नं.70 व गट नं.61 या 12 मी.रुंद वि.यो.(सी-आकार) रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 820 | 7.5 | 3,60,61,756.00 |
| 22. | पडेगाव सब स्टेशन ते नाशिक हायवे मार्गे सफारी पार्क या 30 मी.रुंद वि.यो रस्त्याचे डांबरीकरण करणे व पुल बांधणे. | 2000 | 7.5 | 10,01,09,147.00 |
| 23. | सातारा परिसरातील कमलनयन बजाज हॉस्पिटल ते सुधाकरनगर या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे व पुल बांधणे. | 2000 | 10.5 | 10,39,35,259.00 |
| 24. | जिल्हा सत्र न्यायालय ते कोकणवाडी चौक या 24 मी.रुंद वि.यो.रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे व आर.सी.सी. बॉक्स कल्व्हर्ट बांधणे. | 560 | 2X3 | 2,61,68,359.00 |
| 25. | वार्ड क्र.13 भिमनगर उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील 15 मीटर रुंद वि. यो. रस्त्याचे सिमेंट काँक्रीट करणे. | 915 | 7.5 | 3,04,69,317.00 |
| | एकुण | 42815 | | 2,30,15,25,031.00 |

करीता, उक्त नमूद केल्याप्रमाणे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील एकुण 25 विकास योजना रस्त्यांचे काँक्रीट/डांबराद्वारे बांधकाम करणे, आर.सी.सी.बॉक्स कल्व्हर्ट बांधणे, पुल बांधणेच्या कामाचे प्रकल्प अहवाल व एकत्रित अंदाजपत्रक र.रु.2,30,15,25,031/-(18% जी.एस.टी. सह) यास प्रशासकीय मंजूरी बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच सदर प्रकल्पाकरीता राज्य शासनाकडे

निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणे व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर आहे.

**ठराव क्रमांक 1774/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रात वाढती लोकसंख्या, निवासी विस्तारीकरण, शहरालगत शेंद्रा, बिडकीन, वाळूज येथील औद्योगिक विस्तारीकरण, शैक्षणिक, पर्यटन, व्यावसायीक दृष्टया शहर व शहरालगत वाढती रहदारी लक्षात घेऊन यापुर्वी मंजुर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1411/2024 व 1412/2024 नुसार अनुक्रमे रु.204.54 कोटी (18% जी.एस.टी.सह) व रु.111.285 कोटी (18% जी.एस.टी.सह) चा प्रकल्प अहवाल निथी उपलब्धतेसाठी शासनास सादर करण्यात आला होता परंतू सदर निधी शासनाकडून प्राप्त झालेला नसल्याचे नमूद आहे.

यामुळे उक्त नमूद प्रकल्पातील सातारा देवळाई, नक्षत्रवाडी, कांचनवाडी, ईटखेडा, पडेगाव, मिटमिटा, भावसिंगपुरा इत्यादी भागातील (30 मी.,24 मी.,18 मी.,15 मी.,12 मी.,09 मी.मंजुर वि.यो. रुंदी) प्रामुख्याने करावयाच्या उक्त नमूद मंजूर प्रस्तावातील व नव्याने समाविष्ट करावयाचे एकुण 25 विकास योजना रस्त्यांचे (आर.सी.सी.बॉक्स कल्व्हर्ट व पुल बांधकामासह) कामाकरीता नमूद पीएमसी यांच्या मार्फत स्वतंत्र प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रके र.रु.2,30,15,25,031/- (18% जी.एस.टी. सह) चे तयार करून घेण्यात आले असून यास प्रशासकीय मान्यता तसेच सदर प्रकल्पास निधी उपलब्धतेसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देण्यात येते. तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे व त्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येतात. मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1775/2025:- (उद्यान विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 अंतर्गत दि.14.02.2024 च्या प्रशासकीय मान्यतेने शहराच्या प्रमुख उद्यानात Multiply System ची उभारणी करणे (अंदाजपत्रकीय र.रु.9,96,81,714/-) या कामासाठी र.रु.996,81 लक्ष निधी प्राप्त आहे.

सदर कामासाठी विहीत कार्यपध्दतीने निविदा कार्यवाही पुर्ण करुन मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मे.झेनिथ स्पोटर्स, ता.वाई जि.सातारा यांना कार्यादेश पारीत करण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहराच्या विविध भागातील नागरी वसाहतीं मध्ये मुलभूत सोई-सुविधा पुरविण्याची कामे सातत्याने केली जातात. तथापि, मुले/तरुण वर्ग यांना जवळ च्या अंतरावर मोकळी जागा, खुली मैदाने उपलब्ध नसल्याने, शहरातील मुलांना आपल्या घरा जवळ खेळण्यासाठी जागा/मैदान आवश्यक सुविधेसह उपलब्ध करुन देणेसाठी महानगरपालिकेने “आम्हाला खेळू द्या” हा उपक्रम हाती घेतला आहे.

“आम्हाला खेळू द्या” या उपक्रमाअंतर्गत महानगरपालिका अर्थसंकल्पीय तरतुद, शासन निधी व बाह्यस्त्रोत माध्यमातुन विविध कामे करण्यात येत आहेत. सदर उपक्रमास गती/व्यापक रुप देणे करीता जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त निधी मधुन शहराच्या प्रमुख उद्यानासह महानगरपालिका शाळा, रेखांकन/गृहसंकुल योजनेतील खुल्या जागा, नियमित कर भरणा करणाऱ्या वसाहतींमधील खुल्या जागेत Multiply System बसविणेचा प्रस्ताव आहे.

करीता, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 अंतर्गत प्राप्त निधी र.रु.996.81 लक्ष मधुन शहराच्या प्रमुख उद्यानात Multiply System ची उभारणी करणे या कामा अंतर्गत शहरा तील प्रमुख उद्यानासह महानगरपालिका शाळा, रेखांकन/गृहसंकुल योजनेतील खुल्या जागा, नियमित कर भरणा करणाऱ्या वसाहतींमधील खुल्या जागा, नियमित इ.ठिकाणी Multiply System उभारणी करण्यास मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1775/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन 2023-24 अंतर्गत प्राप्त निधी र.रु.996.81 लक्ष मधुन शहराच्या प्रमुख उद्यानात Multiplay System ची उभारणी करणे या

कामांतर्गत शहरातील प्रमुख उद्यानांसह महानगरपालिका शाळा, रेखांकन/गृहसंकुल योजनेतील खुल्या जागा, नियमित कर भारणा करणाऱ्या वसाहतींमधील खुल्या जागा इत्यादी ठिकाणी Multiplay System उभारणी करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1776/2025:-</u>** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील खाम नदीचे पुनरुज्जीवनाचे काम मागील 03 वर्षापासून श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक हे करीत होते. सदर नदीची सफाई करून 750 टन प्लास्टिक व घनकचरा काढण्यात आलेला आहे. नदीचे खोलीकरण, रुंदीकरण व कठड्यांचे मजबुतीकरण करण्यात आले. तसेच नदीकाठी जागोजागी शेत तळे बांधून त्यांचे स्टोन पिचिंग करुन सुशोभीकरण करण्यात आले होते.

खाम नदी पुनरुज्जीवन प्रकल्पामुळे दरवर्षी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीस आळा बसला असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना जिवीत व आर्थिक नुकसानाचे प्रमाण कमी झालेले आहे. तसेच नदीकाठी हॉलीबॉल मैदान, महिलांसाठी खुले व्यायाम शाळा, मुलांसाठी स्पोर्ट पार्क, ज्येष्ठ नागरिकां साठी नाना-नानी पार्क, जॉगिंग ट्रॅक व इको-पार्क तयार करण्यात आलेले आहे. खाम नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक हे दि.31.05.2023 रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांनी सदर कामासाठी सेवानिवृत्तीनंतर सेवा देण्यास सहमती दिली होती. खाम नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी श्री.असदउल्ला खान यांचा प्रत्यक्ष कामांचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकलो.

त्यानुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53(3) च्या परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मा.स्थायी समितीचा ठराव क्र. 822. दि.19.06.2023 नुसार "खाम नदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम व स्वच्छता करणे" या विवक्षित कामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणून श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक (सेवानिवृत) यांची कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/902 दि.20.06.2023 च्या आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून सेवा करार पध्दतीने प्रथमतः 06 महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापि, सदर आदेशाची मुदत दि.19.12.2023 रोजी संपल्याने तसेच उपआयुक्त-5 तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांनी श्री.असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक यांना मुदतवाढ देणेबाबत कळविले होते.

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1199/2024. दि.02/02/2024 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/267 दि.08.02.2024 अन्वये त्यांना दि.22.12.2023 ते दि.21.06.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. सदर आदेशाची मुदत दि.21.06.2024 रोजी संपल्याने तसेच उप आयुक्त-5 तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख यांनी संबंधितांना मुदतवाढ देण्याबाबत कळविले होते.

त्यानुसार मा. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1463/2024. दि.03.07.2024 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2299 दि.05.07.2024 अन्वये त्यांना दि.26.06.2024 ते दि.25.12.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दि.25.12.2024 रोजी संपलेली असून उक्त विवक्षित कामासाठी त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे.

करिता “खाम नदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम व स्वच्छता करणे” या विवक्षित कामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणून श्री. असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक (सेवानिवृत) यांची कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/902 दि.20.06.2023 च्या आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दि.30.12.2024 ते दि.29.06.2025 पर्यंत नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1776/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, “खाम नदीचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम व स्वच्छता करणे” या विवक्षित कामाकरीता विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणून श्री. असदउल्ला खान, स्वच्छता निरीक्षक (सेवानिवृत्त) यांची कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/902 दि.20.06.2023 च्या

आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दि.30.12.2024 ते दि.29.06.2025 पर्यंत नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1777/2025:-</u> (आस्थापना-1 विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.17 डिसेंबर 2016 नुसार "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरिता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन पात्रता, अनुभवानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने घेण्याकरिता दि.22.07.2024 रोजी मुलाखत घेण्यासाठी गठीत निवड समिती सदस्यांनी मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांची जाहिराती मध्ये नमूद पात्रता व अनुभव इ. तपासण्यात आले.

त्यानुसार मुलाखतीअंती दि.22.07.2024 रोजी निवड समितीने उक्त विवक्षित कामासाठी श्री.रायबा भगवान पाटील, विभागीय अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त) यांच्या नावाची शिफारस केली. त्यानुषंगाने मा. स्थायी समितीने पारित केलेला ठराव क्र.1517/2024. दि.06.08.2024 अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) मधील विहित केल्यानुसार संबंधितांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2508 दि.06.08.2024 अन्वये प्रथमतः 06 महिन्यांच्या कालावधीकरिता सेवा करार पध्दतीने दि.08.07.2024 रोजीच्या जाहिरातीत नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणूक देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दि.05.02.2025 रोजी संपत आहे. सद्यस्थितीत सेवाप्रवेश नियमानुसार वा प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध नसल्याने तसेच उक्त कामासाठी त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे.

करिता "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री. रायबा भगवान पाटील, विभागीय अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2024/2508 दि.06.08.2024 रोजीच्या आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दि.10.02.2025 पासून 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1777/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.रायबा भगवान पाटील, विभागीय अग्निशमन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2508 दि.06.08.2024 रोजीच्या आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून दि.10.02.2025 पासून 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1778/2025:-</u> (कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे 2 जलशुध्दीकरण केंद्र आहेत. तसेच 56 दलली योजनेच्या पुनरुज्जीवन अंतर्गत 20 दलली पाणी परिमाण वाढलेले असल्याने फारोळा येथे जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 170 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत विविध टप्यांवर तुरटी ग्रेड-१, ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 व क्लोरीनचा वापर केला जातो. पाणी गाळण प्रक्रियेनंतर पाण्याचे निर्जंतुकीकरण करुन पाणी पिण्या योग्य करण्यासाठी क्लोरीनचा व ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा वापर प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरुपात केला जातो. प्रि-क्लोरीनेशन करीता 1 पीपी एम व पोस्ट क्लोरीनेशन करीता 3 पीपी एम इतक्या मात्रेची आवश्यकता आहे. फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे ब्लिचिंग पावडरचा वापर प्रि-क्लोरीनेशन करीता केला जातो. या करीता 1 पीपीएम इतकी मात्रा वापरावी लागते. पावसाळ्याच्या

दिवसात तसेच धरणातील पाणी पातळी कमी झाल्यानंतर वापरावयाची मात्रा आवश्यकतेनुसार वाढविण्यात येते. शहर वितरण प्रणाली अंतर्गत हर्सल जलशुध्दीकरण केंद्र असून या केंद्रातून दररोज 11 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्याचप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव व वितरण प्रणाली अंतर्गत विविध जलकुंभांवर देखील ब्लिचिंग पावडरचा वापर केला जातो. दैनंदिन प्रक्रिया करण्यात येणारे पाणी परिमाण व आवश्यक मात्रा लक्षात घेता जलशुध्दीकरण केंद्र व इतर बाबींची वार्षिक मागणी 262 मे.टन इतकी आहे. या मागणी अंतर्गत 56 दलली योजनेचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर वाढ होणाऱ्या पाणी परिमाणाचा समावेश केलेला नाही.

सदरील पुरवठ्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुचितील साहित्य पुरवठ्यातील दरानुसार तयार करण्यात आले आहे. कामाची अंदाजपत्रकीय र.रु.83,47,320/- इतकी असून सदरील पुरवठ्याचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षका तून प्रस्तावीत करण्यात आला आहे. करीता अंदाजपत्रक र.रु.83,47,320/- चे मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1778/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचिंग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.83,47,320/- किंमतीचे मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1779/2025:-** **(कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे 100 व 56 दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असुन या दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 150 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच 56 दलली योजनेच्या पुनरुज्जीवन अंतर्गत 20 दलली पाणी परिमाण वाढलेले असल्याने फारोळा येथे जलशुध्दीकरण केंद्रात दररोज 170 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत प्रामुख्याने तुरटी, ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅस चा वापर विविध टप्प्यांवर केला जातो. अशुध्द पाण्यात गढुळतेचे प्रमाण जास्त असते. पाण्यातील गढुळता कमी करण्या साठी प्रामुख्याने तुरटी ग्रेड-1 चा वापर केला जातो. जायकवाडी उद्धवावरुन येणाऱ्या पाण्यात गढुळतेचे प्रमाण कमी असते तथापी सरासरी 10 पी पी एम इतकी तुरटी मात्रा वर्षभर द्यावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात धरणात नवीन पाण्याची आवक वाढल्यानंतर पाण्याच्या गढुळतेत प्रचंड वाढ होते. त्यावेळेस तुरटीची मात्रा वाढवावी लागते. या सर्व बाबींचा विचार करता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राची 6 महिन्यांची मागणी ही 510 में टन इतकी आहे.

पाणी पुरवठा विभागाने प्रायोगिक तत्वावर तुरटी ग्रेड-1 ऐवजी द्रवरुप तुरटी ग्रेड-5 चा वापर करण्यासाठी 110 मे.टनाची निविदा कार्यवाही पूर्ण केली असून निविदा मंजुरी अंतर्गत आहे. घनरुप तुरटी ऐवजी द्रवरुप तुरटीचा वापर ठरावीक कालावधीत फायदेशिर ठरल्यास द्रवरुप तुरटी पुरवठ्याचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्यात येईल. यामुळे वार्षिक तुरटी पुरवठ्याऐवजी 6 महिन्याकरीता आवश्यक असलेल्या पुरवठ्याच्या या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा मंडळाच्या सन 2023-24 च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्याच्या दरानुसार तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु.51,93,534/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातुन प्रस्तावीत करण्यात आला आहे. करीता अंदाजपत्रक र.रु.51,93,534/- चे मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1779/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता तुरटी ग्रेड-1 चा पुरवठा करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.51,93,534/-किंमतीचे मंजूर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1780/2025:-</u> (कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.22.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेस शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मार्गस्थ ग्राहक म्हणून ठोक स्वरुपात (Bulk) पाणी पुरवठा केला जातो. सदरील नळजोडणी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या कालावधीपासून आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा योजना सन 1996 पासून हस्तांतरीत झाल्यानंतर मार्गस्थ ग्राहकांची पाणीपट्टीची आकारणी व वसुली महानगरपालिके मार्फत करण्यात येते. दि.01.10.2014 ते दि.11.09.2016 या कालावधीत योजना ACWUCL या कन्सेशनरला हस्तांतरीत करण्यात आली होती. या कालावधीत ACWUCL यांचेकडून पाणीपट्टी वसुली करण्यात आली.

मार्गस्थ ग्राहकांची जलमापक यंत्राच्या नोंदीनुसार मासिक देयके दिली जातात. मार्गस्थ ग्राहकांना महानगरपालिके समवेत करारनामा करावा लागतो. या करारनाम्यातील तरतुदीनुसार ग्राहकाने विहीत मुदतीत देयक अदा केले नाही तर 18% दराने विलंब शुल्काची आकारणी केली जाते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेट घेवून संस्थेस नोव्हेंबर 2016 ते मे 2024 दरम्यान आकारण्यात आलेले विलंब शुल्क माफ करणेबाबत मागणी केलेली आहे. यानुसार उपरोक्त कालावधीत

| | | |
|---|---|---|
| अ) | निव्वळ पाणीवापर नोव्हेंबर-2016 ते मे 2024 (डी.पी.सी. वगळून) | रु.3.85,74,887/- |
| ब) | ऑक्टोबर 2016 पूर्वीची थकबाकी | रु.4,61,889.00 |
| क) | विलंबशुल्क (डी.पी.सी.) | रु.56,23,983/- |
| | **एकूण** | **रु.4,46,60,759/-** |
| ड) | रक्कम अदा नोव्हेंबर-2016 ते मे 2024 (डी.पी.सी. वगळून) | रु.3,81,96,301/- |
| इ) | एकूण थकबाकी मे 2024 अखेर | रु.64,64,458/- |

उपरोक्त थकबाकीमध्ये विलंब शुल्क र.रु.56,23,983/- चा समावेश आहे. संस्थेने दि.18.05.2024 रोजी पत्र देवून यापुर्वी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार डी.पी.सी. वगळता निव्वळ पाणीपट्टी र.रु.31,45,628/- चा भरणा महानगरपालिका लेखा विभागात पावती क्र.29032024/10/57232 दि.29.03.2024 अन्वये केलेला आहे. अनुषंगाने दि.22.07.2024 रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डी.पी.सी.चार्जेस माफ करणे संदर्भाने बैठक संपन्न झाली. या बैठकीकरीता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच विभाग प्रमुख उपस्थित होते. मा. अतिरिक्त आयुक्त-1, मा. शहर अभियंता, मा. करमुल्य निर्धारक व संकलक तसेच कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा देखील उपस्थित होते. बैठकीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या देयकाबाबत तसेच करारनाम्यातील तरतुदींबाबत सविस्तर चर्चा झाली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मार्गस्थ ग्राहक असून या ग्राहकांना करारनाम्यातील तरतुदी नुसार विलंब शुल्काची आकारणी केली जात असल्याचे स्पष्ट केले. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी संस्था ही शासकीय शैक्षणिक संस्था असून अभियांत्रिकी क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करते. त्याचप्रमाणे कोविड काळात शैक्षणिक संस्था बंद असल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या कोविड काळाच्या दरम्यान संस्थेने आपले वस्तीगृह महानगरपालिकेस कोविड सेंटरसाठी उपलब्ध करुन दिले होते. याबाबी लक्षात घेवून पाणीपट्टी व आकारण्यात आलेले विलंब शुल्क माफ करावे अशी मागणी केली. करीता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचे मे-2024 अखेर विलंब शुल्क र.रु.56,23,983/- माफ करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1780/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मार्गस्थ ग्राहक म्हणून असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ही संस्था शासकीय संस्था असून ज्ञानदानाचे कार्य करते. तसेच कोविड-19 च्या काळात संस्थेने महानगरपालिकेस सहकार्य केलेले असल्याने व कोविड-19 कालावधी लक्षात घेता या संस्थेस पाणीपट्टी देयकात नोव्हेंबर 2016 ते मे 2024 दरम्यान आकारण्यात आलेले विलंब शुल्क र.रु.56,23,983/- माफ करण्यात येते. मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1781/2025:- (सहा.आयुक्त झोन क्र.09 विभाग)** **(दि.23.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती जिजाबाई रामदास थोरात, सफाई मजुर, झोन क्र.09, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी स्वतः आजारपणावर युनायटेड सिग्मा हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असुन एकुण र.रु.2,05,859/- इतका खर्च केलेला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन संबंधित कर्मचारी यांच्या पोटाचे तिव्र विकार या आजारावर उपचारार्थ खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | एकुण खर्च | र.रु.2,05,859/- |
| 2 | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | र.रु.28,347/- |
| 3 | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | र.रु.1,77,512/- |
| 4 | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.2 वर) | र.रु.1,59,760/- |
| 5 | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1 च्या रक्कमेवर) | र.रु.10,292/- |
| 6 | संबंधितास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | र.रु.1,49,458/- |
| 7 | संबंधितास देण्यात आलेली अग्रिम रक्कम | र.रु.1,50,000/- |
| 8 | एकुण निव्ळ देय रक्कम<br>(-) आलेली अग्रिम रक्कम<br>शिल्लक रक्कम | र.रु.1,49,458/-<br>र.रु.1,50000/-<br>र.रु. 532 |

वरील तक्ताप्रमाणे संबंधिताने अग्रिम र.रु.1,50,000/- मधून निव्वळ वैद्यकीय देयक परतावा र.रु.1,49,468/- वजा जाता उर्वरीत र.रु.532/- संबंधिताकडून मनपा फंडात जमा करुन घेणे योग्य.

संबंधिताने उपचार युनायटेड सिग्मा हॉस्पीटल हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट नाही. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिका-यांना शिफारस केलेली आहे. मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1781/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती जिजाबाई रामदास थोरात, स.मजुर, झोन क्र.०९, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.1,49,458/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष एकोणपन्नास हजार चारशे अठ्ठावन्न फक्त) संबंधिताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच संबंधिताने अग्रिम र.रु.1,50,000/- मधून निव्वळ वैद्यकीय देयक परतावा र.रु.1,49,468/- वजा जाता उर्वरीत र.रु.532/- संबंधिताकडून मनपा फंडात जमा करुन घेणे योग्य. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1782/2025:- (झोन क्र.01 विभाग)** **(दि.23.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संजय दर्यासिंग चव्हाण, सफाई मजूर, झोन क्र.1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी त्यांच्या स्वतःच्या पत्निच्या नामे श्रीमती मिना संजय चव्हाण Primi With Twins With Cardiomyopathy (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र बाबतचे आजार) या आजारावर मेडीकवर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे उपचार केलेला असून उपचारासाठी रु.1,86,667/- इतका खर्च केलेला आहे.

तथापि, संबंधिताने उपचार केलेले मेडीकवर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर, हे शासकीय रुग्णालय नसून संबंधितास अनुज्ञेय र.रु.1,22,714/- आहे. तसेच मेडीकवर हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/ मंत्रालय, मुंबई 32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत

यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट नाही. तथापि, दि.14.05.2023 च्या परिपत्रकानुसार शासन मान्य आजारासाठी खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास र.रु.1,00,000/- पर्यंतचा वैद्यकीय परतावा देता येतो व उपरोक्त खर्च र.रु.1,00,000/- रक्कमेच्या आत असून अनुज्ञेय र.रु.1,00,000/-आहे.

सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी र.रु.1,00,000/- च्या 5% र.रु.5000 मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- संबंधितास अदा करणेबाबत शिफारस केलेली आहे.

**ठराव क्रमांक 1782/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.संजय दर्यासिंग चव्हाण, सफाई मजूर, झोन क्र.1, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय र.रु.95,000/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्तावा समान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1783/2025:- (कार्यकारी अभियंता पा.पु विभाग)** **(दि.23.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गारखेडा एस.एफ.एस. येथुन एक्स्प्रेस जलवाहिनी मधुन होणारे बायपास पध्दतीच्या पाणी वितरणामध्ये सुधारणा करण्यासाठी गारखेडा एस.एफ.एस.या ठिकाणी संप व पंपहाऊस बांधण्याचे काम मजीप्राने जी.व्ही.पी.आर. मार्फत सुरु केले. तथापि जी.व्ही.पी.आर.कंपनीने संपचे काम केल्यानंतर पंप हाऊसच्या कामासाठी असमर्थता दर्शविली. त्यामुळे पंपहाऊसचे काम महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे. या करीता मजीप्राने मुळ संकल्पन व पंपहाऊसचे कामाचे अंदाजपत्रक व आर.सी.सी. डिझाईनस महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने निविदा कार्यवाही करुन सद्या काम प्रगतीपथावर आहे.

प्रत्यक्ष काम सुरु असतांना असे निदर्शनास आले की, आर.सी.सी.काँक्रीट व स्टील रिनफोर्समेंट या बाबींची Quantity मुळ निविदेत कमी असुन मंजुर आर.सी.सी.डिझाईन नुसार या बाबीच्या Quantity मध्ये वाढ होत आहे. त्यामुळे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

या कामासाठी र.रु.22,75,405/- (जी.एस.टी.सह) रक्कमेला प्रशासकीय मान्यता आहे. या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.26,89,800/- (जी.एस.टी.सह) चे तयार करण्यात आले आहे. सदर Quantity Variation मुळे होणारे वाढीव काम करणे आवश्यक असुन या कामासाठी मंजुर प्रशासकीय रक्कमे पेक्षा र.रु.4,14,395/- रक्कमेचा वाढीव खर्च होणार आहे. ही निविदा अंदाजपत्रकीय दराने मंजुर असुन Quantity Variation मुळे होणारे वाढीव काम सुध्दा निविदेच्या मंजुर दराने करण्यास तयार असल्याचे लेखीपत्र देऊन कंत्राटदाराने सहमती दिलेली आहे.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1783/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या कामासाठी र.रु.22,75,405/- (जी.एस.टी.सह) रक्कमेला प्रशासकीय मान्यता आहे. या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.26,89,800/- (जी.एस.टी.सह) चे तयार करण्याच्या प्रस्ताव मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1784/2025:- (मालमत्ता विभाग)** **(दि.23.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ब) नुसार मा. स्थायी समिती समोर खालील प्रस्ताव ठेवण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस 75/25 टक्के विकास योजना आरक्षाणतुन न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेय नगर विल्डींगमधील दुसऱ्या मजल्यावरील हॉलसाठी निविदा मागविण्यात आली होती. उक्त निविदेत दोन धारक प्राप्त झाले असून ते तांत्रीक बिडमध्ये पात्र झाले आहे. करीता त्यांचा तपशील खालील प्रमाणे,

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | प्राप्त निविदा | आधारभूत रक्कम प्रती महा | निविदेत नमुद प्रती महा दर रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | मिलींद रामकृष्ण गिते | 02 | रु.25,504/- | रु.25,900/- |
| 02 | काजी ईमतीयाज सोहेल काजी फवाद | | | रु.25,600/- |

उपरोक्त प्रमाणे न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेय नगर बिल्डींगमधील दुस-या मजल्यावरील हॉलसाठी मिलींद रामकृष्ण गिते यांचे सर्वाधिक प्रती महा दर र.रु.25,900/- प्राप्त झाले असून मिलींद रामकृष्ण गिते यांच्यासोबत निविदा अटी शर्ती प्रमाणे दहा वर्षाचा करारनामा करणेसाठीच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1784/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेयनगर बिल्डींगमधील दुसऱ्या मजल्यावरील हॉलसाठी मिलींद रामकृष्ण गिते यांचे सर्वाधिक प्रती महा दर र.रु.25,900/- प्राप्त झाले असून मिलींद रामकृष्ण गिते यांच्यासोबत निविदा अटी शर्ती प्रमाणे दहा वर्षाचा करारनामा करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1785/2025:- (घनकचरा विभाग)** **(दि.24.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्क चा एक भाग उपांग असलेल्या "आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांनी दि.07.01.2025 च्या पत्रान्वये शहरातील चार पुलांवर व्हर्टीकल उद्यान स्वखर्चाने विकसीत करण्याचा प्रस्ताव दिला आहे. वातावरणीय बदलांना सामोरे जाताना जैवविविधतेवर होणाऱ्या परिणामांवर मात करणाऱ्या उपाय योजनांसाठी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया काम करते. या मध्ये झाडे लावणे, तलावांचे पुनरुज्जीवन, घनकचरा व्यवस्थापनाची जनजागृती या क्षेत्रात एजन्सी काम करीत आहे.

शहर सौंदर्यीकरणात भर पडणे तसेच नदी/नाल्यांमध्ये कचरा टाकण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी महानगरपालिकेने शहराच्या विविध भागातील पुलांवर व्हर्टीकल गार्डन उभारणी केलेली आहे. या धर्तीवर छत्रपती संभाजीनगर शहरात प्रवेश करताना दर्शनी भागातील तसेच शहर अंतर्गत पर्यटकाची वर्दळ असलेल्या खालील नाल्यांवर स्वखचनि व्हर्टीकल गार्डन उभारणी करणेसाठी उक्त प्रस्ताव प्राप्त आहे.

1. चिकलठाणा मुख्य रस्त्यावरील पुल
2. मकईगेट येथील खामनदी वरील पुल
3. हर्सुल मुख्य रस्त्याच्या खामनदी वरील पुल
4. आरेफ कॉलनी येथील पुल

उक्त कामांसाठी (अ) Structural member, Civil work, इतर अनुषंगीक बाबी व त्याचे Specification ला शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेणे. (ब) महानगरपालिका अभियंत्याच्या निगराणी खाली काम करणे तसेच (क) काम पुर्ण केल्यानंतर त्याचे एक वर्ष संगोपन, देखभाल व दुरुस्ती करणे इत्यादी व इतर अनुषंगीक अटीवर परवानगी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांना देण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

करीता प्रस्तावीत चार पुलांवर स्वखर्चाने व्हर्टीकल गार्डन उभारणे कामी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांना परवानगी देणे तसेच सदर कामी आवश्यक अटी शर्ती ठरविणे, अनुषंगीक निर्णय घेणे आणि संबंधीत संस्थेसोबत द्विपक्षीय सामंजस्य करार करण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1785/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराच्या विविध भागातील (1) चिकलठाणा मुख्य रस्त्यावरील पुल (2) मकईगेट येथील खामनदी वरील पुल (3) हर्सल मुख्य रस्त्याच्या खामनदी वरील पुल (4) आरेफ कॉलनी येथील पुल इत्यादी चार पुलांवर स्वखचाने व्हटींकल गार्डन उभारणे कामी आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांना परवानगी देण्यास तसेच सदर कामी आवश्यक अटी शर्ती ठरविणे, अनुषंगीक निर्णय घेणे आणि संबंधीत संस्थे सोबत द्विपक्षीय सामंजस्य करार करण्यास आयुक्त यांना प्राधिकृत मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1786/2025:-** **(उपअभियंता जलनि:स्सारण विभाग)** **(दि.24.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.सलीम अलीसरोवर येथील 5 MLD क्षमेच्या STP ची आवश्यक दुरुस्ती करणे, उपकरणे बदलणे या कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1636/2024 दि.07.10.2024 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च STP देखभाल दुरुस्ती वर्ष सन 2024-25 या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येणार आहे.

या कामासाठी शासनाच्या संकेतस्थळावरुन निविदा मागविल्या असता, प्रथम वेळेस अंतिम दिनांकापर्यंत 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार निविदाधारक यांनी सादर केलेल्या कागदपत्रान्वये प्राप्त 02 निविदाधारकांपैकी एक निविदाधारक Ramsan Tech Services Pvt.Ltd. यांनी अपुर्ण दस्ताऐवजांची पुर्तता न केल्याने ते तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्याने उर्वरित दोन निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. पात्र दोन निविदाकारांपैकी सर्वात कमी दराची निविदा Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.80% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे.

| संदर्भ:- Tender ID : 2024_AMCA_1108221_1 | | |
|---|---|---|
| **अ.क्र** | **विवरण** | **शेरा** |
| 1. | विभागाचे नाव | कार्यकारी अभियंता, (जलनि:स्सारण) |
| 2. | कामाचे स्वरुप | डॉ.सलीम अलीसरोवर येथील 5 MLD क्षमेच्या STP ची आवश्यक दुरुस्ती करणे, उपकरणे बदलणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, अं.प.र.रु.6,51,98,280/-/- मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1636/2024 दि.07.10.2024 |
| | त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.1,94,62,498/- |
| 4. | अ) निविदा स्विकारण्याची मुदत | दि.07.10.2024 ते दि.14.10.2024 |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | दि.10.01.2025 |
| | क) निविदा काढण्याची वेळ? | प्रथम |
| | ड) एकुण प्राप्त निविदा | 03 (पात्र-2, अपात्र-1) |

(त्यापैकी पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे आहे)

| **अ. क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **निविदा र.रु.** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| | | | **र.रु.** | **टक्केवारी** |
| 1. | Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. | र.रु.1,94,62,498/- | र.रु.1,93,06,798/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.80% कमी दराने |
| 2. | Ideal Systems and services | र.रु.1,94,62,498/- | र.रु.1,96,57,123/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.00% जास्त दराने |

| **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | **शेरा** |
|---|---|---|
| 1. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | क) असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 2. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षका वर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | STP देखभाल दुरुस्ती वर्ष सन 2024-25 या लेखाशिर्षका अंतर्गत |
| 3. | सदर कामास खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 4. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 5. | सोबत मान्य पुर्वगणक पत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

उक्त निविदाकारांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd.यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.80% कमी दराची आहे. करीता सर्वात कमी दराची निविदा Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची असुन ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.80% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1786/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.सलीम अलीसरोवर येथील 5 MLD क्षमेच्या STP ची आवश्यक दुरुस्ती करणे, उपकरणे बदलणे या कामाच्या प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ही Lifefirst Concepts & Technologies Pvt.Ltd. यांची असुन ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.80% कमी दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1787/2025:- (कार्य.अभि.रस्ते विभाग)** **(दि.24.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुकूंदवाडी मनपा प्राथमिक शाळेची संरक्षित भींत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक SSR 2022-233 नुसार तयार करण्यात आलेल्या र.रु.3630668/- चे अंदाजपत्रक व ठरावास मा.प्रशासक महोदय यांचीमान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर प्राप्त आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1. | श्री.जयकिशन बाळासाहेब शिंदे | अं.प.दरापेक्षा 3.00% कमी |
| 2. | मे.विक्रम कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदापैकी, तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.00% कमी दराची निविदा श्री.जयकिशन बाळासाहेब शिंदे यांची आहे तरी श्री.जयकिशन बाळासाहेब शिंदे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा तरी 3.00% कमी दराची निविदा बाबतचा मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवावयाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1787/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकूंदवाडी मनपा प्राथमिक शाळेची संरक्षित भींत बांधणे या कामाची श्री.जयकिशन बाळासाहेब शिंदे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा तरी 3.00% कमी दराची निविदा मंजुरी बाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1788/2025:- (कर निर्धारक व संकलक विभाग)** **(दि.28.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.64,61,268/- चे तयार करुन यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1282 /2024 अन्वये दि.23.02.2024 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च सन 2023-24 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध तरतुद र.रु.5.00 कोटी मधुन प्रस्तावित आहे. सदर कामाची विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून श्री.सिध्दीकी जलिसोद्दीन मोइजोद्दीन यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 5.89 टक्के कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.1358/2024 अन्वये दि.13.03.2024 रोजी मंजुरी देण्यात आलेली असुन कंत्राटदारास दि.15.03.2024 रोजी कार्यादेश देऊन काम पुर्ण झालेले असुन सदर कामाचे दि.17 सप्टेंबर 2024 रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन झालेले आहे.

कामास सुरुवात केल्यानंतर मुळ प्रस्तावामध्ये वेळोवेळी वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार वास्तु विशारद यांनी आवश्यकतेनुसार बदल केलेले असुन यामध्ये साधारणत: केसेट ए.सी.फोरवे व वनवे,

स्पीट ए.सी.,अस्तित्वातील शौचालयाचे नुतनीकरण करणे, फर्निचरच्या कामाचा दर्जा वाढविणे ॲल्युमिनियम खिडक्या बसविणे, लाईट फिटींगमध्ये लेनर लाईट लावणे इ.अतिरिक्त बाबी व मुळ अंदाजपत्रकातील काही बाबींमध्ये वाढ झालेली आहे. यामध्ये मॅट फ्लोरिंग, राफ्टर, विद्युतची कामे करणे व फर्निचरच्या कामामध्ये वाढ झालेली असल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक कामाच्या अतिरीक्त बाबींसह र.रु.96,23,257/- अंदाजपत्रक जी.एस.टी.सह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या दरसुचीनुसार तयार करणेत आले आहे. सदर अंदाजपत्रक कार्योत्तर मान्यतेस्तव.

तसेच मुळ निविदा र.रु.52,31,795/- असुन मंजुर निविदाअंदाजपत्रक रक्कमेपेक्षा 5.89 टक्के कमी दराची असल्याने श्री.सिध्दीकी जलिसोद्दीन मोइजोद्दीन कंत्राटदार यांनी पत्र देऊन सदर Quantity Variation ची कामे ही मंजुर निविदा 5.89 टक्के कमी दराने करण्यास तयार असल्याचे लेखी सहमती कळविली आहे.

करीता सदर कामे कंत्राटदार श्री.सिध्दीकी जलिसोद्दीन मोइजोद्दीन यांच्याकडून करुन घेण्यात आले असल्याने सुधारित अंदाजपत्रक Quantity Variation मुळे होणारी वाढीव कामासह र.रु.96,23,257/- मान्यतेसह सदर कामे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.89 टक्के कमी दराने करुन घेण्याच्या कार्योत्तर मान्यता मिळणेचा प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 1788/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुधारित अंदाजपत्रकास अतिरीक्त बाबींसह र.रु.96,23,257/- मान्यता देण्यात येत असुन सदर कामे कंत्राटदार श्री.सिध्दीकी जलिसोद्दीन मोइजोद्दीन यांच्याकडून यापुर्वीचे मंजुर दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.89 टक्के कमी दराने करुन घेण्यात आले असल्याने कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1789/2025:-</u> (यांत्रिकी वाहने विभाग)** **(दि.28.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहर हे मराठवाड्याची राजधानी असुन शहराची लोकसंख्या साधारणत: र.रु.17 लक्ष आहे. शहर महानगरपालिकेच्या एकुण झोन-10 क्षेत्रांमध्ये विभागलेले असुन महापालिका हद्दीत साधारणत: 1700 कि.मी.अंतराचे लहान-मोठे रस्ते आहेत. शहरा तील रस्त्यावर जोरदार पाऊस,अपघात, डेनेजलाईन दुरुस्ती, पाणी पुरवठा लाईन दुरुस्ती इ.कारणांमुळे खड्डे पडतात. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे रहयदारीला अडथळा होतो तसेच धुळीचे प्रमाण देखील वाढते.

वॉर्ड अभियंता मार्फत खड्डे बुजविण्याचे काम करण्यात येते. मात्र या कामाला जास्त कालावधी लागतो. तसेच मॅन्युअली खड्डे बुजविण्यामुळे पॅच जास्त दिवस टिकत नाही. या पार्श्वभुमीवर पॉट होल पॅचिंग मशिन खरेदी केल्यास रस्त्यावर पडणार, खड्डे तात्काळ बुजविणे शक्य होणार आहे. पॉट होल पॅचिंग मशिन खरेदी करण्यासाठी जीईएम पोर्टलवर तपासणी केली असता, सदर प्रकारचे मशिन जीईएम पोर्टलवर उपलब्ध नसल्याने निदर्शनास आले आहे. त्यामुळे उत्पादक कंपन्यांकडून दरपत्रके मागविली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | दर |
|---|---|---|
| 1. | मे.टीपीएस इन्फ्रास्ट्रक्चर लि. | र.रु.1,60,55,000/- |
| 2. | मे.अंकिशा इंजिनिअरींग सोल्युशन सर्व्हीसेस प्रा.लि. | र.रु.1,90,65,000/- |
| 3. | मे.गोविंदम इन्व्हायरो इंजिनिअरींग प्रा.लि. | र.रु.2,09,71,500/- |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या मे.टीपीएस इन्फ्रास्ट्रक्चर लि.यांचे दर कमी असल्यामुळे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत. अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवुन 01 पॉट होल पॅचिंग मशिन खरेदी करण्यात येईल. सदरील खर्च महानगरपालिकेच्या सन 2024-25 वर्षातील "नवीन वाहने खरेदी" या लेखाशिर्षातुन भागविण्यात येईल.

करीता, छत्रपती संभाजीनगर शहरातील रस्ते खड्डे मुक्त ठेवण्यासाठी 1 पॉट होल पॅचिंग मशिन खरेदी करणे या कामाकरीता र.रु.1,60,55,000/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1789/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील रस्ते खड्डे मुक्त ठेवण्यासाठी 1 पॉट होल पॅचिंग मशिन महानगरपालिकेच्या सन 2024-25 वर्षातील “नवीन वाहने खरेदी” या लेखाशिर्षातुन खरेदी करण्यासाठी र.रु.18,71,95,200/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1790/2025:- (क्रिडा विभाग)** **(दि.29.01.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्रिडा संकुल येथे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या मान्यतेने मागील दोन वर्षापासुन लोकमत APL क्रिकेट स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा मधून अनेक खेळाडू IPL (Indian Premier League) क्रिकेट स्पर्धेच्या निवड चाचणी करीता पात्र झाले असुन या स्पर्धमध्ये छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सह ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली प्रतिभा दाखविण्याची संधी मिळत असल्याने खेळाडुंचा आत्मविश्वास तर वाढेलच त्या सोबतच त्यांना दरवर्षी स्पर्धा मध्ये सहभागी होऊन प्रसिध्दी सुध्दा प्राप्त होते.

दि.1 ते 9 फेब्रुवारी 2025 (09 दिवस) सलग क्रिकेट स्पर्धासाठी व पुढील सन-2035 दरम्यन दरवर्षी होणाऱ्या लोकमत APL साठी क्रिडांगण मोफत उपलब्ध करुन देणे बाबत आयोजक यांनी विनंती केली आहे. त्या अनुषंगाने वरील पमाणे लोकमत APL व छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सन-2025 ते सन 2035 दरम्यान होणाऱ्या क्रिकेट स्पर्धा करीता खालील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देणे योग्य वाटते.

**अटी व शर्ती :-**

1. लोकमत APL क्रिकेट स्पर्धा करीता छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन लेखी स्वरुपात मान्यता असणे अनिवार्य राहील.
2. क्रिडांगण फक्त मॅचेस दरम्यान मोफत राहील, पुर्व तयारी व स्पर्धा संपन्न झाल्यानंतर साहित्य काढणेसाठी किती दिवसांचा कालावधी लागेल त्याची लेखी पत्र व त्यानुसार शुल्काचा भरणा करणे अनिवार्य राहिल.
3. स्पर्धा दरम्यान साऊंड सिस्टीमचा वापर स्थानिक पोलीस कार्यालयाची परवानगी घेऊन व त्यांचा नियमानुसार वापर करावा.
4. स्पर्धा दरम्यान डॉक्टर, फिजीओ, वैद्यकीय पथक व कार्डिओ ॲम्ब्युलन्स मॅच सुरु ते संपेपर्यंत थांबविणे आवश्यक राहील. गाडी येणे व जाणे साठीचा रस्ता हा मोकळा असणे आवश्यक राहील.
5. स्पर्धेसाठी आयोजक यांना दरवर्षी उपलब्ध असलेल्या तारखा देण्यात येईल. एकदा दिलेली स्पर्धेच्या तारखा बदलता येणार नाही. त्यासाठी 4 महिन्यापुर्वी अर्ज करणे अनिवार्य राहील.
6. स्पर्धा दरम्यान खेळाडुंना दुखापत झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आयोजकांची राहील छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकाची राहणार नाही.
7. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर क्रिडांगणाची स्वच्छता करुन देणे अनिवार्य राहील.
8. स्पर्धा दरम्यान डिझेल व विद्युत पुरवठा महानगरपालिका मार्फत करण्यात येईल.
9. स्पर्धेच्या प्रसिध्दीसाठी बॅनर व वृत्तमानपत्रात महानगरपालिकेचे नाव व लोगो असणे आवश्यक राहील.
10. स्पर्धा दरम्यान येणाऱ्या मान्यवरांच्या सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही आयोजकांची राहील. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची राहणारी नाही.
11. अ.क्र.1 ते10 प्रमाणे सर्व अटी व शर्तीचे पालन आयोजक यांनी काटेकोरपणे पालन करावे. नसता, पुढील वर्षी क्रिडांगण स्पर्धेसाठी उपलब्ध करुन देता येणार नाही.

**ठराव क्रमांक 1790/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व लोकमत मिडीया प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने दि.29 ते 31 जानेवारी दरम्यान स्पर्धेची पुर्व तयारी व दि.1 ते 9 फेब्रुवारी 2025 रोजी दरम्यान APL क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेस छत्रपती संभाजीनगर महानगरपालिके मार्फत स्पर्धेसाठी सन 2035 पर्यंत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्रिडाप संकुल व स्पर्धा दरम्यान विद्युत पुरवठा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1791/2025:-** **(बी.ओ.टी.विभाग)** **(दि.29.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पीरबाजार, जुना उस्मानपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीची जागा CTS No.16564,16565 व 16566 ज्याचे क्षेत्रफळ अनुक्रमे 5.20 चौ.मी. व 751.70 चौ.मी.असे एकुण 789.10 चौ.मी.जागेत बीओटी प्रकल्पाचे विकास कामे हाती घ्यावयाचे नियोजन आहे. प्रस्तावित न.भु.क्र. 16564,16565 व 16566 यासाठी मुल्यदर 2024 अनुसार र.रु.23000/- प्रति चौ.मी. एवढे आहेत. त्यानुसार बीओटी तत्वावरील बहुमजली इमारत बांधेणसाठी प्रस्तावित राहील. प्रकल्पात भाजीमंडी, चिकन/मटन मार्केट आणि व्यापारी संकुल याप्रमाणे विकास कामे घेण्यासाठी नियोजन आहे.

प्रस्तावित प्रकल्प संदर्भाने बीओटी समितीची दि.05.10.2024 अनुसार मान्यता प्राप्त आहे. बीओटी तत्वावर उभारणेबाबत प्रकल्पाची विकास कामे विकास नियंत्रण नियमावली अनुसार अनुज्ञेय बांधीव क्षेत्रासाठी आराखडा अंतिम करुन नियमोचित कार्यवाही करणे करीता मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1791/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पीर बाजार जुना उस्मानपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीची जागा CTS No. 16564, 16565 व 16566 ज्याचे क्षेत्र अनुक्रमे 5.20 चौ.मी, 32.20 चौ.मी व 751.70 चौ.मी असे एकूण 789.10 चौ.मी जागेत बीओटी प्रकल्पाचे विकास कामे हाती घ्यावयाचे नियोजन आहे. प्रस्तावित न.भु.क्र.16564, 16565 व 16566 यासाठी मुल्यदर 2024 अनुसार रु. 23000/- प्रति चौ.मी. एवढे आहेत त्यानुसार बीओटी तत्वावरील बहुमजली इमारत बांधणेसाठी प्रस्तावित राहील. प्रकल्पात भाजी मंडी, चिकन/मटन मार्केट आणि व्यापारी संकुल याप्रमाणे विकास कामे घेणेसाठी नियोजन आहे. जागेत बीओटी तत्त्वावर राबविणेसाठी तसेच प्रकल्पात मंजुरी प्रदान करण्यात येते. मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1792/2025:-** **(पा.पु जायकवाडी यांत्रिकी विभाग)** **(दि.29.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यंत्र देखभाल दुरूस्ती जायकवाडी विभाग या लेखाशीर्षामधुन महानगरपालिकेच्या नवीन जायकवाडी पंपगृह येथील 490 अ.श.व्ही.टी.पंपासाठी सुट्या भागांचा पुरवठा करणे या कामासाठी एकुण र.रु.27,81,875/-+5,00,738/- (GST 18%)=32,82,613/- च्या अंदाज पत्रकास मा.प्रशासक यांची मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्या नंतर ई-निविदा विभागमार्फत जाहीर ई-निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा रक्कम (रुपये) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | मे.अमित इंजिनिअर्स, छत्रपती संभाजीनगर. | 27,81,598.81/- | 0.01%ने कमी |
| 2. | मे.तिरुपती ईलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर. | 28,63,386.00/- | 2.93%ने जास्त |
| 3. | मे.असांसो लाईट्स, छत्रपती संभाजीनगर. | 28,79,242.70/- | 3.50%ने जास्त |

प्राप्त 03 निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.अमित इंजिनिअर्स, छत्रपती संभाजीनगर यांची असून, ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.01% ने कमी म्हणजेच र.रु.27,81,598.81/- रकमेची आहे. करीता कमी दराची निविदा स्विकृत करणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1792/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेतील प्राप्त न्युनतम दराची मे.अमित इंजिनिअर्स, छत्रपती संभाजीनगर यांची अंदाजपत्रकीय दराप्रमाणे र.रु.27,81,598.81/- रक्कमेची निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1793/2025:-** **(शहर अभियंता विभाग)** **(दि.30.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात असलेल्या विविध वसाहतींपैकी 50 टक्के दलित समाजाची लोकसंख्या असलेल्या वसाहतीमधील नागरीकांना मुलभुत सोई-सुविधा पुरविणे क्रमप्राप्त असून यासाठी महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता या कामांना एकत्रित रित्या महानगरपालिका अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे सदरील कामांसाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत शासन स्तरावरुन निधी उपलब्ध झाल्यास सदरील कामे महानगरपालिका हद्दीत नागरी दलित वस्ती अंतर्गत करणे शक्य होऊन सदरील वसाहतींचा मुलभूत विकास होऊन नागरिकांना आवश्यक मुलभूत सोईसुविधा प्राप्त होतील. या करीता महानगरपालिका प्रशासनामार्फत शहरामधील ज्या नागरी वसाहतींची लोकसंख्यामध्ये 50 टक्के पेक्षा जास्त दलित वसाहतींची लोकसंख्या आहे. अशा विविध नागरी दलित वसाहतीमधील आवश्यक असलेली प्रस्तावित कामे व त्यांचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च (रु.लाखात) |
|---|---|---|
| 1. | ब्रिजवाडी येथील शाळा विकसित करणे, रिटेनिंग वॉल व कम्पाऊंड वॉल बांधणे. | 500 |
| 2. | वार्ड क्र.13 भिमनगर, अंतर्गत निसर्ग कॉलनी येथे बॉक्स कलव्हर्ट पुल बांधणे | 100 |
| 3. | वार्ड क्र.16 भावसिंगपुरा (दक्षिण) येथील साठे चौक जवळ बॉक्स कलव्हर्ट पुल बांधणे. | 50 |
| 4. | वार्ड क्र.16 भावसिंगपुरा (दक्षिण) अंतर्गत केटी हाईटस लगत बॉक्स कलव्हर्ट पुल बांधणे. | 40 |
| 5. | रमानगर येथील स्मशानभूमी विकसित करणे. | 50 |
| 6. | क्रांतिनगर ते कोकणवाडी नाल्या करीता आरसीसी खुली गटार बांधणे. | 75 |
| 7. | नागसेननगर, मिलीदनगर येथील हॉस्पीटल/सभागृह विकसित करणे. | 100 |
| 8. | मिलींदनगर येथील खुली जागा विकसित करणे. | 25 |
| 9. | चिकलठाणा येथिल मातंग समाजाचे स्मशानभुमि विकसित करणे. | 60 |
| 10. | राहुलनगर येथील स्मशानभुमि विकसित करणे. | 100 |
| 11. | गट नं.32 भावसिंगपुरा येथे 15 मीटर रुंद विकास योजना रस्त्यालगत च्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे. | 110 |
| 12. | गट नं.32 भावसिंगपुरा पेठेनगर येथील 15 मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे. | 320 |
| 13. | प्रियदर्शनि इंदिरानगर येथील स्मशानभूमि विकसित करणे | 192 |
| 14. | प्रियदर्शनी इंदिरानगर येथे ड्रेनेज लाईनचे नुतनीकरण व मजबुतीकरण करणे. | 48 |
| 15. | वार्ड क्र.113 अंतर्गत भारतनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | 49 |
| 16. | वार्ड क्र.111 अंतर्गत शंभुनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | 50 |
| 17. | महुनगरकडे जाणाऱ्या 15 मीटर विकास योजनारस्त्याचे व लगतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, | 150 |
| 18. | वार्ड क्र.111 अंतर्गत शंभुनगर येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | 75 |

| | | |
|---|---|---|
| 19. | वार्ड क्र.111 अंतर्गत प्रियदर्शनि इंदिरानगर अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. | 99 |
| 20. | वार्ड क्र.15 मिटमिटा अंतर्गत स्मशानुभुमी पासून ते महालक्ष्मी कोचिंग क्लासेस पर्यंत नाल्यास नाला रिटेनिंग वॉल बांधणे | 550 |
| 21. | वॉर्ड क्र.14 पडेगांव अंतर्गत रामगोपालनगर श्री चारनिया यांच्या घराजवळील नाल्यास नाला रिटेनिंग वॉल बांधणे. | 430 |
| 22. | सनी सेंटर ते मिसारवाडी हा 80 फुट रस्ता विकसित करणे. | 210 |
| 23. | संघर्षनगर येथे स्टॉर्म वॉटर गटार बांधणे. | 190 |
| 24. | हमालवाडा समोरील येथील 24 मीटर रुंद विकास रस्ता विकसित करणे. | 1350 |
| 25. | जालाननगर ते राहुलनगर स्टॉर्म वॉटर गटार बांधणे, | 120 |
| 26. | ग्रीनव्हॅली शेजारील स्ट्रॉम वॉटर नाला बांधणे. | 70 |
| 27. | रोजाबाग येथील मनपा शाळा विकसित करणे. | 50 |
| 28. | गरमपाणी येथे नविन हेल्थ सेंटर बांधणे. | 50 |
| 29. | हर्षनगर येथे नविन हेल्थ सेंटर बांधणे. | 250 |
| 30. | सातारा गावातील शाक्यनगर बौध्दविहाराचे सुशोभीकरण करणे. | 6 |
| 31. | सातारा गावातील शाक्यनगर मधील गल्ल्यांचे कॉंक्रिटीकरण करणे. | 23 |
| 32. | सातारा गावातील शाक्यनगर बौध्द समाज स्मशान भुमीचे कंपांऊड वॉल व विविध कामे करणे. | 60 |
| 33. | सातारा गावातील शंकरनगर येथील गल्ली नं.1 चे कॉंक्रिटीकरण करणे | 21 |
| 34. | शहरातील दलित वस्ती अंतर्गत असणाऱ्या हातपंपाचे सिमेंट काँक्रिट फाऊंडेशन दुरुस्ती व संलग्न काम करणे. | 12 |
| 35. | नारेगाव ब्रिजवाडी येथील सुखना नदीला संरक्षित भिंत बांधणे, | 500 |
| 36. | वॉर्ड क्र.14 पडेगाव अंतर्गत चिनार गार्डन जवळील ४५ मीटर डी.पी. रस्ता विकसित करणेबाबत (जुना डांबरी रस्ता) | 1500 |
| 37. | वॉर्ड क्र.17 विशालनगर येथील सम्यक क्रांती समाज मंदिर ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, वॉचमन रुम बांधणे व इतर कामे करणे. | 35 |
| 38. | वॉर्ड क्र.24 शाहबाजार अंतर्गत मातंग समाज स्मशानभुमी विकसित करणे. | 48 |
| | **एकूण रक्कम रुपये** | **रु.7668 लक्ष** |
| | **एकूण रक्कम रुपये सात हजार सहाशे अडूसष्ट लक्ष फक्त** | |

तरी वरीलप्रमाणे यादीत नमूद केलेल्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या नागरी वसाहतींची लोकसंख्यामध्ये 50 टक्के पेक्षा जास्त दलित वसाहतींची लोकसंख्या आहे. अशा विविध नागरी दलित वसाहतीमधील आवश्यक असलेली प्रस्तावित कामे व त्यांचा अंदाजित खर्च र.रु.7668.00 लक्ष इतका अपेक्षित असून या कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडे निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. याकरीता प्रशासना मार्फत सर्व कामे नियोजनबध्द पार पाडण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास मान्यता देणे योग्य.

करीता उपरोक्त एकूण 38 कामांकरीता महाराष्ट्र शासनाकडे अंदाजित खर्च र.रु.7668.00 लक्ष इतका निधी मागणी करण्यासाठीचा तसेच सदर कामे नियोजनबध्द पार पाडण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1793/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आगामी कालावधी मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रामधील ज्या नागरी वसाहतींची लोकसंख्यामध्ये 50 टक्के पेक्षा जास्त दलित वसाहतींची लोकसंख्या

आहे. अशा विविध नागरी दलित वसाहतीमधील आवश्यक असलेली प्रस्तावित एकूण 38 कामे करणे करीता र.रु.7668.00 लक्ष इतका खर्च अपेक्षित असून या कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडे निधी इतक्या निधीची मागणी संदर्भाने तसेच सदर कामे नियोजनबध्द पार पाडण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रस्तावास आवश्यक कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1794/2025:-** **(आस्थापना-1 विभाग)** **(दि.30.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “पाणीपट्टी कर निर्धारण अंतिम करणेसाठी झोन अधिकारी यांना सहाय्य करणे” या विवक्षित कामासाठी ठराव क्र.372/2022 दि.11.05.2022 अन्वये सहाय्यक म्हणून श्री.गणपत व्यंक्टराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त), महानगरपालिका परभणी यांची आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516. दि.11.05.2022 नुसार सेवा करार पध्दतीने विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमतः 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळवेतन व महागाईभत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाईभत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्या नंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.40,000/- (अक्षरी रक्कम रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर नियुक्ती करण्यात आलेली असून ते सदर पदावर दि.20.06.2022 रोजी झाले.

दि.11.05.2022 रोजीच्या आदेशाची मुदत दि.19.12.2022 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी तुर्तास संबंधितांची सेवा वसुली कामी इतर तांत्रिक कामासाठी आवश्यकता असल्याने 06 महिन्या साठी मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 637. दि.10.01.2023 अन्वये संबंधिताना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/52. दि.10.01.2023 नुसार 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.22.12.2022 ते दि.21.06.2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दि.10.01.2023 रोजीच्या आदेशाची मुदत दि.21.06.2023 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी संबंधिताद्वारे झोन कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे, बिल वाटप, जप्ती कामे नियंत्रण ठेवणे शक्य असल्याने त्यांना 06 महिन्यांकरिता मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषमाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.894 दि.31.07.2023 अन्वये संबंधितांना आदेश जा.क्र. मनपा/आस्था-1/2023/1163 दि.07.08.2023 नुसार 02 दिवसांचा तांत्रिक देऊन दि.26.06.2023 ते दि.25.12.2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि सदर आदेशाची मुदत दि.25.12.2023 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी सध्या वसुलीकामी महत्वपूर्ण कार्यवाही संबंधितांकडून काम उत्तम प्रकारे होत असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता. त्यानुषगाने मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1176/ 2024. दि.16.01.2024 अन्वये संबंधितांना आदेश मनपा/आस्था-1/2024/88 दि.17.01.2024 अन्वये दि.28.12.2023 ते दि.27.06.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. दि.17.01.2024 रोजीच्या आदेशाची मुदत दि.27.06.2024 रोजी संपल्याने उपआयुक्त (कर) यांनी त्यांना पुढील मुदतवाढ देण्याबाबत अभिप्राय दिलेला होता.

त्यानुषंगाने मा. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 1495/2024. दि. 18/07/2024 अन्य संबंधितांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2024/2371 दि.18/07/2024 अन्यये दि.01.07.2024 ते दि.31.12.2024 पर्यंत नियुक्ती देण्यात आलेली होती. तथापि, दि.18.07.2024 रोजीच्या आदेशाची मुदत दि.31.12.2024 रोजी संपलेली असून त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे.

करिता "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमता कर आणि पाणीपट्टी निर्धारण अंतिम करणेकरिता समन्वयक/सहाय्यक व इतर अनुषंगिक कार्य करणे" या विवक्षित कामा करीता श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत), महानगरपालिका परभणी यांची सेवा करार पध्दतीने आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516 दि.11.05.2022 रोजीच्या आदेशामध्ये नमूद

अटी व शर्तीच्या अधीन राहून, आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/761 दि.31.05.2023 अन्वये मंजूर केलेल्या मासिक परिश्रमिक मानधन, वाहन भत्ता व एच.आर.ए.सह दि.03.01.2025 ते दि.31.03.2025 या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1794/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमता कर आणि पाणीपट्टी निर्धारण अंतिम करणे" करिता समन्वयक/सहाय्यक व इतर अनुषंगिक कार्य करणे" या विवक्षित कामाकरीता श्री. गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत), महानगरपालिका परभणी यांची सेवा करार पध्दतीने आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/516. दि.11.05.2022 रोजीच्या आदेशामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून, आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2023/761 दि.31.05.2023 अन्वये मंजूर केलेल्या मासिक परिश्रमिक मानधन, वाहन भत्ता व एच.आर.ए.सह दि.03.01.2025 ते दि.31.03.2025 या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1795/2025:- (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.30.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत राज्यातील शाळेचा कायापालट करण्याचा निर्णय झाल्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे बनेवाडी व नारेगाव येथील शाळेची निवड झालेली असून त्यासाठी शासन निर्णय क्रमांक आदर्श-2023/प्र.क्र.81/एसडी-6 दि.09 जानेवारी 2024 नुसार र.रु.2.3568 कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यामधून बनेवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या परिसरात नविन शाळा इमारत बांधण्यांचे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांच्या मार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यांना Pre Tender Activities Post Tender Activities साठी एकूण प्रकल्प किमंतीच्या 1.50% इतके शुल्क अदा करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच Structural Engineers Consultancy चार्जेससाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या 0.50% इतके अदा करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता बनेवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या परिसरात नविन शाळा इमारत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ च्या एसएसआर नुसार तयार करण्यात आलेले आहे. करिता सदर कामाच्या र.रु.2,35,67,100/- इतकेच्या अंदाजपत्रकास तसेच वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांना Pre Tender Activities व Post Tender Activities साठी एकूण प्रकल्प किमंतीच्या 1.50% इतके शुल्क अदा करणे तसेच Structural Engineers Consultancy चार्जेससाठी एकूण प्रकल्प किंमतीच्या 0.50% इतके शुल्क देवून नकाशे, आराखडे व इतर निविदा विषयक कामे करून घेण्याच्या मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1795/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बनेवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या परिसरात नविन शाळा इमारत बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.2,35,67,100/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांना Pre Tender Activities Post Tender Activities साठी एकूण प्रकल्प किमंतीच्या 1.50% इतके शुल्क अदा करणे तसेच Structural Engineers Consultancy चार्जेससाठी एकूण प्रकल्प किमतीच्या 0.50% इतके शुल्क देवून नकाशे, आराखडे व इतर निविदा विषयक कामे करुन घेण्याच्या मंजुरीबाबतचा प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1796/2025:- (मालमत्ता विभाग)** **(दि.31.01.2025)**

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस सिडको अधिसुचित क्षेत्रातील सर्व रस्ते, खेळांची मैदाने, मोकळ्या जागा, बगीचे, झाडे, जमिनी अंतर्गत असलेल्या जलनिःसारण योजना, विद्‌युत वाहिन्या, पथदिवे, विद्‌युत उपगृहे

व सार्वजनिक स्वच्छतागृहे "जसे आहे तसे आहे" या तत्वावर नागरी सोयी-सुविधा हस्तांतरणा बाबत दि.03 मार्च 2006 रोजी करारनामा झालेला आहे.

त्याअनुषंगाने श्री.अनिल देवराव पोलकर यांनी प्लॉट क्र.एन-9, जे-6, ए/ए, संजय गांधी मार्केट त्यांच्या प्लॉट शेजारील 300 चौ.फुट खुल्या जागेवर अस्वच्छता असल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे सदरील जागेवर स्वखचनि वृक्षरोपन करुन सुशोभिकरण करणेसाठी सदरील जागेची मागणी केलेली आहे.

करिता श्री.अनिल देवराव पोलकर यांना उपरोक्त जागेवर वाणिज्य वापर न करता, फक्त सुशोभिकरण करणे करीता ना नफा ना तोटा या तत्वावर 05 वर्षाच्या कालावधीसाठी सदर जागेचा वापर करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 1796/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अनिल देवराव पोलकर यांनी प्लॉट क्र.एन-9, जे-6, ए/ए, संजय गांधी मार्केट त्यांच्या प्लॉट शेजारील 300 चौ.फुट खुल्या जागेवर वाणिज्य वापर न करणेच्या अटीस अधिन राहुन फक्त सुशोभिकरण करणे करीता ना नफा ना तोटा या तत्वावर 05 वर्षाच्या कालावधीसाठी सदर जागा देणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1797/2025:-</u> (उद्यान विभाग)** **(दि.31.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्योतीनगर, एस.बी.एच.कॉलनी परिसरात बँकर्स ग्राऊंड या नावाने महानगरपालिकेची खुली जागा आहे. जागेवर एक बॅडमिंटन हॉल असून, उर्वरीत जागा खुली आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि छत्रपती संभाजीनगर फर्स्ट, अप्लाईड इनोव्हेशन ॲण्ड टेक्नॉलॉजी यांच्या मध्ये झालेल्या द्विपक्षीय सामंजस्य करारानुसार, जागेचा सर्वांगीन विकास करणे साठी महानगरपालिकेतर्फे आवश्यक स्थापत्य विषयक कामे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

त्यानुसार बँकर्स ग्राऊंडला संरक्षक भिंत बांधणे, पाथवे तयार करणे, दगडी बांधकामातील ओटा, चैनलिंक फेन्सींग, गेट व संपुर्ण रंगकाम करणे इत्यादी कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या राज्य दरसुचीनुसार र.रु.49,08,981/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

प्रस्तावीत कामासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पातील उद्यान विभागासाठी असलेली आर्थिक तरतुद संपुष्टात आली आहे. करीता सन 2024-25 या आर्थिक वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पात "बागा देखभाल दुरुस्ती" लेखाशिर्षात आर्थिक तरतुद उपलब्ध करुन, कामाचा खर्च भागविण्याचा प्रस्ताव आहे.

करीता मनपाचे बँकर्स ग्राऊंड, SBH कॉलनी, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत स्थापत्य विषयक कामे करणे या कामाच्या र.रु.49,08,981/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 1797/2025:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाचे बँकर्स ग्राऊंड, SBH कॉलनी, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत स्थापत्य विषयक कामे करणे या कामाच्या र.रु.49,08,981/- च्या अंदाजपत्रकास आणि महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 मधील "बागा देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षात सुधारीत आर्थिक तरतुद उपलब्ध करुन, सदर कामाचा खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 1798/2025:-</u> (कार्यकारी अभियंता रस्ते विभाग)** **(दि.31.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.02 येथील अभिलेखा कक्षाची दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-2023 नुसार र.रु.38,18,979/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामास सुधारित अर्थसंकल्प सन 2024-25 मधील प्रशासकीय इमारत या लेखाशिर्ष अंतर्गत र.रु.40.00 लक्ष तरतूद उपलब्ध करुन देणेसह सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.38,18,979/ मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 1798/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा प्रशासकीय इमारत टप्पा क्र.02 येथील अभिलेखा कक्षाची दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे या कामासाठी सुधारित अर्थसंकल्प 2024-25 मध्ये र.रु.40.00 लक्ष तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत असून या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.38,18,979/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1799/2025:-** **(कार्यकारी अभियंता ड्रेनेज विभाग)** **(दि.31.01.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको बसस्टैंड अवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीतक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्या साठी सौंदर्यीकरण करणेचे काम सध्या प्रगतीपथावर असुन, सद्यस्थितीत 70 टक्के काम पूर्ण झालेले आहे. सिडको बसस्टँड येथील वसंतराव नाईक उड्डाणपुला खालील सर्व्हस रोड येथील स्थलांतरीत करावयाचा पुतळा कमी उंचीचा असुन 10 फुट उंचीचा मोठा पुतळा उभारण्याची मागणी सामाजिक संघटना व नागरीकांनी केलेली आहे.

त्यानुसार कामाचे अंदाजपत्रक कामासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुचीमध्ये सामावेश नसल्याने सदर बाबींचे चालु प्रचलित दर बाजारभावानुसार मागविण्यात आलेल्या दरानुसार र.रु.2802500/- (18% G.S.T. सह) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2024-25 च्या मधील लेखाशिर्ष पुतळे खरेदी व संगोपन मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.2802500/- मान्यते बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1799/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त प्रस्ताव सादर केल्याप्रमाणे सिडको बसस्टँड जवळील अक्षयदिप प्लाझा समोरील कोपऱ्यावर हरीतक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे या कामाचे र.रु.2802500/- चे अंदाजपत्रकास याद्वारे मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 1800/2025:-** **(कार्यकारी अभियंता इमारत विभाग)** **(दि.03.02.2025)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील चिकलठाणा औद्योगिक वसाहत येथील 1,11,980 चौ.मी.जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडीयम व क्रिडा संकुल विकसित करण्याचे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने नियोजन केले आहे.

सदर जागेमध्ये आतापर्यंत महानगरपालिकेतर्फे क्रिकेट खेळाचे मैदान व इतर संलग्न सुविधा विकसित करण्यात आलेल्या आहेत. आज स्थितीत त्याचा वापर सुरु असुन, शहरातील नागरीकांना त्याचा लाभ होत आहे. छत्रपती संभाजीनगर मराठवाड्याची औद्योगिक राजधानी असून आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ असल्याने येथे पर्यटकांची संख्या मोठी आहे. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची देखील नेमणूक करण्यात आली आहे.

सदरचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा संकुल विकसित झाल्यास आंतरराष्ट्रीय क्रिडा पर्यटन वाढीस हातभार लागु शकेल तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे, रणजी व इतर खेळांच्या स्पर्धा याठिकाणी घेणे शक्य होईल. याशिवाय शहर व परिसरातील नागरीक/उदयोन्मुख खेळाडू यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकेल. या माध्यमातुन शहराची जगाच्या पाठीवर असलेली ओळख अधिक अधोरेखित होईल.

या मंजुरीनंतर प्रस्तावित प्रमाणे प्रकल्पाचे सखोल नियोजन करून विषयांकीत काम हाती घेण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी ढोबळ मानाने सादर केलेल्या अंदाजपत्रक व संकल्प नकाशानुसार (Concept Plan) या प्रकल्पासाठी सुमारे र.रु.300 कोटी खर्च अपेक्षित आहे.

सदरचे काम 4 टप्प्यांतर्गत पुर्ण करणेचे नियोजन असुन या कामांतर्गत PMC मे. कोलाज डिझाईन प्रा. लि. यांची PMC स्वरुपाने नियुक्ती करण्यात आली आहे, महानगरपालिकेच्या सुचनेनुसार

कामाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत South Pavillion Building उभारणे व पोच रस्ता तयार करणे, या कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल र.रु.48,76,58,495/- नियुक्त PMC द्वारे तयार करून सादर करण्यात आला आहे,

सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर VIP Entry सहीत VIP Lobby व VIP Seating तसेच Players Lobby सह Food Court प्रस्तावित आहे. पहिल्या मजल्यावर देखील VIP Lobby, Players Lobby, Umpire Lounge व Dining व्यवस्था प्रस्तावित आहे. दुस-या मजल्यावर VIP Lobby व्यतिरीक्त दहा Corporate Boxes असुन BCCI कार्यालयाचा समावेश आहे. तिस-या मजल्यावर संपुर्ण लांबीची VIP Seating व दोन Players Lobby प्रस्तावित आहेत. एकुणच South Pavillion सर्व दृष्टीने परिपूर्ण अंशी इमारत प्रस्तावित आहे व लवकरच पूर्ण करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. सदर अंदाजपत्रकात खालील बाबी समाविष्ट आहेत :

| Sr.No. | Particulars | | Amount |
|---|---|---|---|
| **A** | **WORK PORTION** | | |
| 1. | SOUTH PAVILLION BUILDING | Rs. | 272,390,601.00 |
| 2. | ROAD AND STORM WATER DRAIN WORKS | Rs. | 17,364,246.00 |
| 3. | UNDERGRAOUND WATER TANK | Rs. | 6,351,317.00 |
| 4. | SEPTIC TANK | Rs. | 556.766.00 |
| | **TOTAL OF (A)=** | **Rs.** | **296,662,930.00** |
| | | | |
| **B** | **ROYALTY & Q.C.CHARGES** | | |
| 5. | SOUTH PAVILLON BUILDING | Rs. | 2,205,034.12 |
| 6. | UNDERGROUND WATER TANK & SEPTIC TANK | Rs. | 50,528.94 |
| | **TOTAL OF (B)=** | **Rs.** | **2,255,563.06** |
| | | | |
| **C** | **ELECTRICAL AND FIREFIGHTING WORKS** | | |
| 7. | PLUMBING WORKS | Rs. | 24,081,354.00 |
| 8. | FIRE FIGHTING WORKS | Rs. | 10,416,880.00 |
| 9. | HVAC WORKS | Rs. | 18,188,837.00 |
| 10. | ELECTRICAL & ELV WORKS-<br>(HT,LT,DG,CTV,FA,PA,NETWORKING, SOLAR ETC.) | Rs. | 42,329,409.00 |
| | **TOTAL OF (C)=** | **Rs.** | **95,016,480.00** |
| | | | |
| | **TOTAL OF (A)+(C) =** | **Rs.** | **391,679,410.00** |
| 11. | ADD:18% GST ON (A)&(C) | Rs. | 70,502,293.80 |
| 12. | ADD:18% CONTEGENCIES ON (A)&(C) | Rs. | 9,809,614.58 |
| 13. | ADD:1% TPTAON (A)&(C) | Rs. | 3,916,794.10 |
| 14. | ADD:1% LABOUR INSURANCE ON (A)&(C) | Rs. | 3,916,794.10 |
| 15. | ADD:2% CONSULTANCY CHARGES ON (A)&(C) | Rs. | 7,833,588.20 |
| | | | |
| | **TOTAL OF (D) =** | **Rs.** | **95,979,084.78** |
| | | | |
| | **TOTAL OF (A+B+C) =** | **Rs.** | **487,658,494.78** |
| | **OR SAY** | **Rs.** | **48,76Cr.** |

या अंदाजपत्रकात स्थापत्य कामे, विद्युत विषयक कामे, अग्निशमन विषयक कामे, प्लंबिंगची कामे तसेच Royalty charges, 18% GST, किरकोळ खर्चाची तरतुद, TPTA ची तरतुद, कामगार विमा, PMC यांचे सेवाशुल्क, या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

या एकुण रक्कमेपैकी निव्वळ ठरणारी निविदा र.रु.39,16,79,410/- ची निविदा काढण्यात येईल. सदर कामाचा खर्च प्रशासकीय प्रकल्प या लेखाशिर्षातुन मनपा अर्थसंकल्प सन 2024-25 व 2025-26 मधुन प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यासाठी विभागाकडून लेखा विभागास अंदाजित तरतुद

त्या त्या वर्षात कळविण्यात येईल. त्यास्तव या कामासाठी बी-1 निविदा काढणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

करिता चिकलठाणा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा संकुल उभारणे या कामाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत South Pavillion Building उभारणे व पोच रस्ता तयार करणे, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.48,76,58,495/- यांस मंजुरी देणे, तसेच ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-1 निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे या बाबींस मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 1800/2025:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिडा संकुल उभारणे या कामाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत South Pavillion Building उभारणे व पोच रस्ता तयार करणे, या कामाचे अंदाजपत्रक र.रु.48,76,58,495/- यांस मंजुरी देणे, तसेच ई-निविदेची कार्यवाही करणे, बी-। निविदा काढणे, तसेच या कामाच्या अनुषंगाने आता किंवा भविष्यात आवश्यक ते निर्णय घेणे किंवा त्यात बदल करणे बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांना प्रदान करणे, या बाबींस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरित/-**
**महापालिका सचिव**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरित/-**
**प्रशासक**
महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर